
टॉलस्टॉय

तीन दीर्घ कथा

अनुवाद : पंढरीनाथ रेगे





टॉलस्टॉय

तीन दीर्घ कथा

अनुवाद

पंढरीनाथ रेगे

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

: प्रकाशक :
रत्नाकर अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११०३०

: मुद्रक :
श्रीकांत मुद्रणालय
७११, सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

: अक्षरजुळणी :
शब्दरेखा टाईपसेटर्स
१२०४/१७, शिवाजीनगर
पुणे ४११००४

: मुखपृष्ठ :
सौ. सरिता धीमते

प्रकाशन क्रमांक : १०४९

प्रथमावृत्ती : १९८९
द्वितीयावृत्ती : २००१
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०
किंमत रु.५०/-

अनुक्रमणिका

चार शब्द

जगविख्यात रशियन कादंबरीकार कौंट लिओ टॉलस्टॉय यांच्या तीन दीर्घकथा या पुस्तकात संग्रहित केलेल्या आहेत. महान कादंबरीकार म्हणून टॉलस्टॉय जागतिक विश्ववाङ्मय क्षेत्रात महत्त्वाचे आहेत. विशेषत: 'वॉर अॅण्ड पीस' या महाकादंबरीने ते अग्रगण्य ठरले. त्या खालोखाल 'अॅना कॅरेनिना' ही त्यांची कादंबरीही श्रेष्ठ ठरली. पण कादंबऱ्यांप्रमाणेच त्यांनी अनेक सरस कथा व दीर्घकथा लिहिल्या आहेत. अशा तीन वैशिष्ट्यपूर्ण दीर्घकथा अनुवादित स्वरूपात इथे दिल्या असून, कथालेखक म्हणूनही टॉलस्टॉय किती समर्थ होते हे, या कथांचे भिन्न विषय, आशय व शैली यांवरून रसिक वाचकांच्या प्रत्ययाला येईल.

या पुस्तकात समाविष्ट केलेली 'माणसं कशावर जगतात?' ('वॉट मेन लिव्ह बाय?') ही पहिली कथा पीटर पॉपर प्रेस या अमेरिकी प्रकाशनाच्या स्वतंत्र इंग्लिश आवृत्तीवरून अनुवादित केली आहे. माणसं एकमेकांच्या करुणेवर- प्रेमावर जगतात, असं दाखवून देणारी ही कथा टॉलस्टॉयने १८८१ साली लिहिली. 'कक्षेबाहेर' ही दुसरी कथा 'कॉर्नी व्हॅसिल्येव' या इंग्लिश भाषांतरावरून अनुवादिली आहे. ही कथा टॉलस्टॉयने, त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात– १९०५ साली लिहिली. मनस्वी वृत्तीच्या एका जिद्दी पुरुषाच्या जीवनाची नियती कशी फरफट करते याचे हृदयद्रावक चित्रण या कथेत केलेलं आहे. तर 'त्या

रात्रीनंतर '' ही तिसरी कथा, मॉस्कोच्या रादुगा प्रकाशनाच्या, टॉलस्टॉयच्या निवडक कथांच्या संग्रहाच्या १९८३ सालच्या इंग्रजी आवृत्तीवरून अनुवादित केली आहे. ' आफ्टर दि बॉल ' (' द्वंद्वनृत्यानंतर ') असं मूळ नाव असलेली ही कथा टॉलस्टॉयनं १९०३ साली लिहिली असून, एका रानटी, अमानुष लष्करी शिक्षेचं दारूण चित्रण त्यानं या कथेत केलेलं आहे. हृदयाला पाझर फोडणारा तो भीषण प्रसंग प्रत्यक्ष पाहणाऱ्या एका तरूणाच्या जीवनाला कशी विलक्षण कलाटणी मिळते, हेही या कथेत दाखवून दिलेलं आहे.

या तीन अनुवादित कथा सकाळमधून आधी प्रसिध्द झाल्या होत्या. या तीन कथांखेरीज ' द क्रयुत्झर सोनाता ', ' द डेथ ऑफ् आयव्हॅन इल्यीच ', ' फादर सर्जिअस ' या त्याच्या कथा विशेष वाखाणल्या गेल्या आहेत.

अशाप्रकारे, या जगविख्यात कांदबरीकारानं कथाकार म्हणूनही आपल्या प्रतिभेचा वेगळा चमकदार पैलू वाङ्मयजगताच्या निदर्शनास आणून दिला आहे. अनेक नामवंत साहित्यिकांनी व समीक्षकांनी त्याच्या कथांचही गुणगान मुक्तकंठानं केलेलं आहे. मानवी जीवनाचं सूक्ष्म निरीक्षण व मानवाच्या संज्ञाप्रवाहाचं मार्मिक ज्ञान यांचं कलात्मक दर्शन त्याच्या कथांतून घडतं, अशी प्रशंसा रसिक जाणकारांनी केलेली आहे. या पुस्तकातील तीन कथा वानगीदाखल या गोष्टीचं प्रत्यंतर आणून देणाऱ्या आहेत.

१८२८ साली जन्मलेला टॉलस्टॉय विविधांगी दीर्घ आयुष्याचा उपभोग घेऊन अखेर १९०९ साली निधन पावला. आयुष्याच्या जवळजवळ अखेरीपर्यंत त्याचं कथालेखन चालू होतं हे विशेष.

— अनुवादक

१ माणसं कशावर जगतात ?

एक चांभार, आपल्या बायको – मुलांसह, एका शेतकऱ्याच्या घरात रहायचा. त्याला नव्हतं स्वत:चं घर, की स्वत:ची जमीन. केवळ चांभारकाम करून तो स्वत:चा आणि आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवायचा. ब्रेड महाग, तर कामाचा मोबदला माफक मिळायचा. त्यामुळं कामातून जी काही प्राप्ती होई, ती सारी जेवणाखाण्यात संपुष्टात येई. तो चांभार आणि त्याची बायको या दोघांत मिळून मेंढकातडीचा फक्त एकच डगला होता, अन् तोसुद्धा जीर्णशीर्ण होऊन गेलेला. मेंढ – कातडीचा नवा डगला विकत घेण्याची त्या चांभाराची इच्छा गेल्या वर्षापासून अपुरीच राहिली होती.

हिवाळा येईतो चांभारानं मेटाकुटीनं थोडे पैसे शिल्लक टाकले होते. तीन रूबल्सची नोट त्याच्या बायकोच्या संदुकीत लपवून ठेवलेली होती. त्याशिवाय गावच्या शेतकऱ्यांकडून पाच रूबल्स आणि पंचवीस कोपेक्स येणं होतं. (' रूबल्स ' म्हणजे त्या काळातलं दीडेक रुपयाचं रशियन चलन. ' कोपेक ' हा रूबलचा शंभरावा भाग.)

थंडीत एके दिवशी सकाळी, मेंढकातडं आणायला बाजारच्या गावाला जाण्यासाठी चांभार सज्ज झाला. अंगातल्या सदऱ्यावर, बायकोनं हल्लीच स्वत:साठी बनवलेलं गोधडीचं जाकीट त्यानं घातलं, आणि त्यावर बेल्टसह असलेला आपला कापडी डगला चढवला. तीन रूबल्सची नोट खिशात सारली. एक काठी तोडून घेतली. आणि न्याहारी करून तो घराबाहेर पडला. त्यानं मनाशी विचार केला :

" शेतकऱ्यांकडून यायचे असलेले पाच रूबल्स मी वसूल करीन. त्यांत माझ्याजवळचे तीन भरीला घालून मेंढकातडीच्या डगल्यासाठी मी कातडं खरेदी करीन. "

आणि प्रथम तो चांभार गावातल्या एका देणेकरी शेतकऱ्याच्या घराशी जाऊन ठेपला, तर तो घरी नव्हता. आठवड्याभरात आपल्या नवऱ्याला पैसे घेऊन पाठवते, असं आश्वासन त्याच्या बायकोनं दिलं. मग चांभार गेला दुसऱ्याकडं. या शेतकऱ्यानं देवाला स्मरून सांगितलं की, आपल्याकडं पैसे नाहीत. आपले बूट दुरुस्त करण्याचे वीस कोपेक्स तेवढे दिले त्यानं. आता चांभारानं विचार केला, की मेंढकातडं उधारीवर घ्यावं. पण कातड्यांचा दुकानदार ते द्यायला नकार देत म्हणाला," पैसे घेऊन ये, अन् काय हवं ते घेऊन जा. उधारीचा डोंगर कसा वाढत जातो, याची तुला कल्पना आहे का बाबा ? " अर्थात त्या दिवशी चांभाराचं काम काही झालं नाही. बूट दुरुस्तीचे अवघे वीस कोपेक्स काय ते मिळाले होते, शिवाय नवे तळवे लावायला म्हणून एकाचे जुने बूट घेऊन तो निघाला.

चांभार भारी हताश झाला. मिळालेले वीसच्या वीस कोपेक्स खर्च करून त्यानं ' व्होड्का ' ढोसली, आणि मेंढकातडं घेतल्याशिवाय तो घरच्या वाटेला लागला. बाजारगावी येताना थंडीच्या गारठ्यानं तो चांगलाच हैराण झाला होता, पण आता ' व्होड्का 'च्या रूपानं मद्य पोटात गेल्यानं त्याच्या अंगात उबदारपणा संचारला होता. एका हातातल्या लांबलचक काठीनं वाटेतल्या बर्फाच्या ढेकळांवर प्रहार करीत, आणि दुसऱ्या हातात लेसीसनी धरलेले बूट झुलवत तो वाटचाल करू लागला. चालताचालता तो स्वत:शीच बडबडू लागला –

" वा ! मेंढकातडीचा डगला अंगावर नसतानासुद्धा कसं उबदार वाटतंय ! अंगुस्तानभर दारु प्यायलो असेन ! पण ती माझ्या सगळ्या धमन्यांतून हुंदाडतेय्. म्हणजे मेंढकातड्याच्या डगल्याची गरजच

उरली नाही की. माझ्या सगळ्या विवंचना विसरून खुशाल ऐटीत चाललोय मी ! असा नामी पठ्ठ्या आहे मी. कसली चिंता करायची ? मेंढकातड्याचा डगला अंगावर नसतानासुद्धा मजेत चाललंय् माझं. मला गरजच नव्हती त्याची. मात्र एक बांधा आहे, आमच्या बाईसाहेब त्याबद्दल त्रागा करतील. ती उद्गारेल, ' एखाद्याचं काम तू करायचं अन् तुला खुशाल टोलवायचं. ही शरमेची गोष्ट आहे. ' थोडं सबुरीनं घ्यायचं, म्हणजे झालं ! शेतकऱ्याच्या बच्च्या,याद राख ! तू माझे पैसे आणून दिले नाहीस, तर देवाला स्मरून सांगतो, चक्क तुझ्या डोक्यावरची टोपी काढून घेतल्याखेरीज रहाणार नाही मी ! पैसे चुकते करण्याची कुठली तऱ्हा ही ?...लेकाचा चार कोपेक्स माझ्या हातावर टाकतो ! एवढ्या कोपेक्सनी काय होणार ? दारू पिऊन त्यांची वासलात लावायची, की झालं. ' पैशाअभावी टेकीस आलोय् ! ' म्हणतो लेकाचा. तू टेकीस आलायूस, अं ? आणि मीसुद्धा टेकीस आलोय्, याची कल्पना नाही का तुला ? तुला तर स्वत:चं घरदार, गुरंढोरं ... सारं काही आहे. आणि माझं जे काही आहे ते माझ्या अंगाखांद्यावर काय आहे तेवढंच. तुला लागणारं पीठ तू स्वत: पैदा करतोस, तर मला ते विकत आणावं लागतं. दर आठवड्याच्या पिठासाठी खर्चावे लागणारे तीन रूबल्स मिळतील तिथून पैदा करावेच लागतात मला. घरी जावं, तेव्हा सर्व ब्रेड संपलेला. काढा पुन्हा दीड रूबल. माझे पैसे का देववत नाहीत तुला ? नस्ती बकवास नकोय् मला ! '

रस्त्याच्या कोपऱ्याशी असलेल्या एका छोट्या ख्रिस्ती देवळाशी येऊन पोचेपर्यंत चांभाराची अशी बडबड चालली होती. तिथं त्या देवळालगत काहीतरी पांढरंशुभ्र झळकत असलेलं त्याच्या नजरेला पडलं. अगदी याच वेळी संधिप्रकाश पडू लागला होता. चांभारानं

डोळे अंमळ बारीक करून न्याहाळून पाहिलं. तरीगुद्धा ती चीज काय असावी. याचा बोध त्याला होईना.

'' कसला दगड तर तिथं नाही ? '' त्याच्या मनात विचारचक्र फिरू लागलं,'' एखादी गाय तर नसेल ? पण आकार गाईचा नाही दिसत. माणसासारखं डोकं दिसतंय त्या आकाराला. काहीतरी पांढरं किंवा भुरं दिसतंय्. पण अशा जागी माणूस काय करत असेल ? ''

तो जास्त जवळ सरकला. आता त्याला काय ते स्पष्ट दिसू लागलं. हा कसला अलौकिक मामला ? खरोखरच एक माणूस. अन् तोही चक्क उघडाबोडका. तिथं बसलेला होता. तो जिवंत होता की मेलेला. हे कुणी सांगावं ? तो त्या देवळाच्या भिंतीला टेकलेला होता. आणि त्याची बिलकुल हालचाल होत नव्हती. चांभाराला चमत्कारिक वाटलं. तो स्वत:शीच उद्गारला. '' कुणीतरी एका माणसाला ठार मारून. त्याला पार लुबाडून. इथं आणून बसवून ठेवलेलं दिसतंय्. या भानगडीत गुंतून न पडता. आपण आपल्या वाटेनं जावं हे बरं ! ''

आणि तो चांभार पुढं पावलं टाकू लागला. त्या देवळाच्या मागच्या बाजूला तो वळला. त्यामुळं तो माणूस आता नजरेला पडेनासा झाला. धर्मस्थानाला वळसा घालत. त्यानं कुतूहलानं वळून पाहिलं. तर तो माणूस जणू काही त्या चांभाराला पहाण्यासाठी. किंचित् पुढं सरकून. डोकावून पहात होता. चांभार अधिकच धास्तावून गेला. त्याच्या मनात विचार आला '' याच्यापाशी जावं. की याला बगल देऊन पुढं जावं ? याच्यापाशी जायचं. म्हणजे ... भलतंच त्यातून काहीतरी अनिष्ट. अशुभ घडायचं ! तो कोण आणि कसा काय माणूस आहे. हे कुणी सांगावं ? एखादं चांगलं काम योजून तो इथं आला नसेल खास ! माझी खात्री आहे. ऐखादे वेळी तो माझ्यावर झडप घालेल आणि माझा गळा दाबून. निकाल लावेल माझा. आणि समजा. तसं त्यानं नाही केलं. तरीगुद्धा अशा उघड्याबोडक्या माणसाला मी कसली

मदत करू शकणार ? माझ्या अंगावरचे फाटकेतुटके, उरलेसुरले कपडे काढून काही मी त्याला देऊ शकणार नाही, हे तर खरं. देव करो, आणि त्याच्याजवळून मी जाताना काही विपरीत न घडो, म्हणजे झालं ! ''

चांभारानं आपल्या पावलांचा वेग वाढवला. पण त्या देवळाकडून जाताजाता त्याची सदसद्विवेकबुद्धी त्याला डिवचू लागली. आणि रस्त्याच्या मध्यावरच तो थबकून उभा राहिला. '' कसली व्यथा जडली असेल या माणसाला ? '' तो स्वत:शीच उद्गारला, '' सायमन, काय चालवलंयूस तू ? इथं एक माणूस दैन्यावस्थेत मरायला टेकलाय् आणि तू धास्तावून त्याला डावलून चाललायूस ? श्रीमंत बनलायूस, होय ? लोक तुझी संपत्ती लुबाडतील, अशी भीती वाटतेय् की काय तुला ? छे: छे: ! सायमन, मागं फिर. असं वागणं बरं नव्हे ! ''

□

सायमन त्या माणसाजवळ गेला आणि त्याला न्याहाळून पाहू लागला. तो माणूस तरणाताठा, धट्टाकट्टा दिसला, त्याच्या अंगावर कुठं कसले ओरखडे उठलेले दिसत नव्हते. मात्र तो अर्धामुर्धा गारठलेला आणि भयग्रस्त दिसत होता खास. बिचारा भिंतीला टेकून बसला होता. सायमनकडं त्यानं पाहिलंसुद्धा नाही. डोळे वर करून बघण्याएवढं त्राणच नसावं त्याला बहुधा. सायमन त्याच्या अगदी निकट गेला आणि एकाएकी झोपेतून आत्ताच जाग आल्याप्रमाणं त्या माणसानं मान वळवली, डोळे उघडले आणि सायमनकडं पाहिलं. त्या नजरेनं त्या माणसाबद्दल सायमनच्या अंत:करणात करुणा दाटून आली. सायमननं आपल्या हातातले बूट जमिनीवर टाकले, अंगातल्या डगल्यावरचा पट्टा काढून त्या बुटावर ठेवला, आणि डगला अंगातून काढून घेतला.

'' बोलायला जमतंय् का थोडंतरी ? ''सायमननं विचारलं.
'' काही हरकत नाही. चल, हा घाल अंगात ! ''

सायमननं त्या माणसाचा बाहू धरला आणि त्याला उठून उभं रहायला मदत केली. तो माणूस उभा राहिला. तेव्हा सायमनला दिसून आलं की, त्याची देहयष्टी सडपातळ आणि नितळ असून त्याच्या हातापायांवर कुठंच ओरखडे वगैरे नाहीत. त्याचा चेहराही उल्हसित दिसला. सायमननं आपला डगला त्या माणसाच्या खांद्यावर टाकला, पण त्या माणसाला बाह्यांतून आपले हात नीट सरकवता येईनात. म्हणून सायमननं त्याचे हात बरोबर बाह्यांत घालून दिले, डगला खालपर्यंत ओढला, आणि डगल्याची बटणं लावून दिली. मग डगल्यावरचा पट्टाही बांधून दिला.

त्या माणसाचं उघडंबोडकं डोकं झाकायला म्हणून सायमननं आपल्या डोक्यावरची हॅटही काढली. पण त्याचं स्वत:चं माथं गारठ्यानं थंडगार पडू लागलं. तत्क्षणी त्याच्या मनात विचार आला : '' मला सबंध डोक्यावर टक्कल पडलंय, उलट याच्या डोक्यावर चांगले लांब केस आहेत. '' आणि त्यानं हॅट पुन्हा आपल्या डोक्यावर चढवली. '' त्यापेक्षा याला बूट घालायला दिले, तर अधिक चांगलं होईल ! '' तो उद्गारला.

आणि सायमननं त्याला खाली बसायला लावलं, आणि दुरुस्तीसाठी घेतलेले जुने बूट त्याच्या पायांत चढवले.

अशा प्रकारे त्याचा जामानिमा करून चांभार त्याला म्हणाला : '' हां,आता ठीक जमलं, भाई ! चल बघू, थोडं चालण्याचा प्रयत्न कर, म्हणजे अंगात ऊब येईल. मिनिटभरात तकवा येईल तुला. आपल्या आपण चालता येईल, असं वाटतं की नाही ? ''

तो माणूस उठून उभा राहिला. प्रेमळपणं त्यानं सायमनकडं पाहिलं. पण अवाक्षरसुध्दा तोंडातून काढणं जमलं नाही त्याला.

" बोलत का नाहीस तू ? सबंध हिवाळा इथं नाही काढता यायचा आपल्याला. घरी जायला हवं. आता असं कर, ही लाठी घे माझी. कमजोरपणा वाटत असेल, तर हिचा आधार घेऊन चाल. हं ! निघू या आपण ! "

तो माणूस चालायला लागला. तो सहजपणं चालत राहिला. कधीही मागं पडला नाही.

वाटचाल करताकरता सायमननं त्याला विचारलं : " कुठला तू ? "

" इकडचा नाही मी. "

" ते तर दिसतंच आहे, कारण इथं रहाणारा प्रत्येकजण माझ्या माहितीचा आहे. पण त्या मंदिराकडं कसा काय येऊन टेपलास तू ? "

" तें नाही सांगता येणार. "

" इथल्या लोकांनी त्रास दिलेला दिसतो तुला ! "

" कुणीसुद्धा त्रास दिला नाही. पण देवानं शासन केलंय् मला. "

" ते तर खरंच ! ईश्वरानं सगळंच व्यापलं आहे. आणि सर्वत्र आपणा सर्वांवर त्याचंच नियंत्रण चालतं. पण कुठं जायची इच्छा आहे तुझी ? "

" सगळं काही सारखंच आहे मला. "

सायमनला नवल वाटलं. हा माणूस मृदुभाषी आहे. कुणी लुच्चा, लबाड नाही दिसत. तरीसुद्धा आपली कसलीच माहिती हा सांगत नाही आहे. सायमनच्या मनात आलं : " या दुनियेत काय काय आणि कसल्या कसल्या गोष्टी चालतात याची फारच तुटपुंजी माहिती असते आपल्याला. " आणि त्या माणसाला तो म्हणाला : " हे बघ, माझ्या घरी चल आणि तिथं थोडी ऊब घे. "

सायमन चालत राहिला. आणि तो परका माणूसही त्याला न सोडता त्याच्या बाजूनं जात राहिला. गार वारा सुटला आणि तो सायमनच्या सदऱ्याच्या आत घुसला. त्यानं घेतलेल्या दारूचा अंमल आता पार उतरला होता. त्यामुळं त्याला थंडीचा कडाका जाणवू लागला. जोरजोरानं श्वासोच्छ्वास करत आणि अंगातलं बायकोचं जाकीट अंगाभोवती अधिक घट्ट लपेटून घेत तो पुढंपुढं चालत राहिला. तेवढ्यात त्याच्या मनात विचार आला : " त्या मेंढकातड्यापायी हा प्रसंग ओढवलाय बरं ! आपण मेंढकातडं आणायला म्हणून गेलो, अन् डगल्याशिवाय माघारी परतलो. एवढंच नव्हे, तर बरोबर एक नंगा माणूस घेऊन घरी जातोय ! आपल्या बुढ्या मॅट्रनाला हे काही मानवणार नाही. "

आणि आपली बायको मॅट्रना हिचा विचार मनात येताच तो अस्वस्थ होऊन गेला. पण त्या परक्या माणसाकडं नजर गेली, तेव्हा मंदिरापाशी त्या माणसानं आपल्याकडं कशा भावुक नजरेनं पाहिलं, तें त्याला आठवलं, आणि त्याचं अंत:करण उचंबळून आलं.

□

सायमनची बायको लौकर कामाला लागली होती. जळणाचं लाकूड छाटून ठेवलं, पाणी आणून भरलं, मुलांना खाऊ घातलं, आपणही थोडं खाल्लं. आणि ती विचार करू लागली " ब्रेड कधी बनवावा बरं ? आता की उद्या ? " कारण एक मोठाला तुकडा शिल्लक उरला होता.

तिच्या मनात आलं " बाजारच्या गावी सायमननं थोडंफार खाल्लं असलं, अन् रात्रीचं जेवण थोडक्यात आवरलं, तर उद्यापुरता ब्रेड उरेल. "

मॅट्रना ब्रेडचा तुकडा गोलगोल फिरवत मनाशी उद्गारली :

'' नाहीच मी ब्रेड बनवत आता. जेमतेम एका ब्रेडपुरतंच पीठ शिल्लक उरलंय्. शुक्रवारपर्यंत निभावून नेता येईल. ''

ब्रेड बाजूला ठेवला, आणि मॅट्रेना आपल्या नवऱ्याच्या सदऱ्याला ठिगळ शिवण्यासाठी टेबलाशी बसली. मग शिवतच राहिली. शिवताशिवता ती सारखी आपल्या नवऱ्याबद्दल, डगल्यासाठी तो मेंढकातडं विकत आणायला गेलाय् त्याबद्दल विचार करीत बसली.

'' मेंढकातडीवाल्यानं सायमनला फसवलं नाही, म्हणजे मिळवली. हो ! कारण आमची ही बुद्दूची स्वारी आहे कमालीची साधीभोळी. स्वत: कुणाला कधीसुद्धा फसवणार नाही, पण एखादं लहानगं पोरसुद्धा याला खुशाल टोलवील ! आठ रूबल्स, ही काही थोडीथोडकी रक्कम नाही. एवढ्या रकमेत मेंढकातड्याचा भलाचांगला डगला मिळायला हवा. अशा डगल्याअभावी गतसालचा हिवाळा शिकस्तीनं रेटून नेला मी. कुठंसुद्धा जाता आलं नाही मला. ओढ्यावरसुद्धा. आणि आत्ताची गोष्ट. ही स्वारी घरून गेलीय ती आमच्या जवळचे एकूणएक कपडे अंगावर चढवून. मला ल्यायला काहीसुद्धा उरलेलं नाही. यायला बराच उशीर झालाय् स्वारीला, एवढ्यात यायला हवी. माझा टिल्लू वाट चुकून कुठं भलतीकडं गेला नसला म्हणजे मिळवली. ''

मॅट्रेना विचारात अशी गढली असताना बाहेरच्या जिन्यावर खुसपूस झाली. कुणीतरी येत होतं. सुई हातातल्या सदऱ्याला खोचून ठेवून मॅट्रेना बाहेरच्या पडवीत गेली. तिनं पाहिलं, तर दोघेजण होते. सायमन आणि त्याच्या सोबत डोक्यावर हॅट नसलेला अन् फेल्टचे बूट घातलेला असा एक विचित्र माणूस.

अचानक तिनं नवऱ्याचा श्वास हेरला. '' हां ! अस्सं ! '' ती स्वत:शीच उद्गारली, '' दारू प्यालेली दिसतेय् स्वारीनं. '' आणि जेव्हा तिनं पाहिलं, की त्याच्या अंगावर डगला नसून केवळ जाकिट आहे, आणि त्याच्या हातात काहीसुद्धा नसून ओढलेल्या चेहऱ्यानं

तो घुमा राहिलाय्. तेव्हा तिच्या काळजात जळफळाट उडाला. तिचं मन म्हणू लागलं : " यानं पैसे दारूत उडवलेले दिसतायृत. आणि कुणातरी उडाणटप्पूबरोबर भटकंती करून, वर आपल्याबरोबर त्याला घरी आणण्यापर्यंत मजल गेलीय् याची. "

त्यांना आधी खोलीत जाऊ दिल्यानंतर मॅट्रेना आत आली. तो माणूस अनोळखी असून, तरुण अन् चिंताग्रस्त असल्याचं तिच्या लक्षात आलं. त्याचप्रमाणं त्याच्या अंगावर स्वत:चा कपडा नसून त्यानं घातलेला डगला आपलाच आहे, हेही ती समजून चुकली. खोलीत आल्यावर तो एकाच जागी थबकून उभा राहिला होता. तिथून हलला नाही की, डोळे वर करून त्यानं पाहिलं नाही. मॅट्रेनाच्या मनानं निष्कर्ष काढला : " भला माणूस दिसत नाही हा. त्याची भेदरलेली चर्याच सांगतेय्. "

भुवया आक्रसत मॅट्रेना भट्टीपाशी गेली, आणि ते दोघे आता काय करतात, याकडं लक्ष देत उभी राहीली.

सायमननं आपली हॅट काढली आणि सगळं काही ठीकठाक असल्यासारखा तो बाकावर बसला. म्हणाला, " हं ! ... मॅट्रेना ! चल, काहीतरी जेवायला वाढ आम्हाला. "

मॅट्रेना स्वत:शीच धुसफुसत भट्टीपाशीच ठाण देऊन उभी राहिली. काहीही झालं, तरी तिथून बिलकुल हलायचं नाही, असा जणू तिचा ठाम निर्धार होता. प्रथम तिनं एकाकडं पाहिलं, मग दुसऱ्याकडं आणि मान झटकली. एवढंच.

आपली बायको भारी संतापलीय् हे सायमननं ओळखलं. पण करायचं काय ? आपल्या लक्षात काहीसुद्धा आलं नाही, अशी बतावणी करत, त्यानं त्या परक्या माणसाचा हात धरून म्हटलं, " चल, ये भाई, बस असा ! काहीतरी जेवूखाऊ आपण. "

तो परका माणूस संकोचत, अंग चोरून बाकावर बसला. मग

सायमन बायकोला उद्देशून म्हणाला : " हं मॅट्रेना, काही शिजवलंयस की नाही ? "

मॅट्रेना चरफडत उद्गारली : " शिजवलंय की ! पण ते तुम्हा लोकांसाठी नाही. तू तुझी अक्कल दारूत बुडवून टाकलीयस, असं दिसतं. मेंढकातड्याचा डगला आणायला म्हणून तू गेलास आणि परतलास तो उलट स्वत:चा डगला घालवून. आणि या मुलखावेगळ्या सौद्यापोटी बरोबर घेऊन आलायस कुणातरी नंग्या भिकाऱ्याला. दारूड्यांच्या जोडगोळीला घालायला माझ्यापाशी जेवण नाही. "

" सबूर, मॅट्रेना ! तुझी जीभ फारच वळवळ करतेय्. पण हा माणूस कसा काय आहे, हे आधी जाणून घेशील की नाही ? "

" आपल्या पैशांची तू काय विल्हेवाट लावलीस, ते तूच आधी सांगायला हवं आहेस ! "

सायमननं आपल्या जाकिटात हात घातला आणि चाचपडून नोटा बाहेर काढल्या. मग त्यांची घडी उलगडून तो उद्गारला : " पैसे – हे पैसे ! पण त्रिफॉनोव्हनं काहीसुद्धा दिलं नाही. लौकरच आणून देतो म्हणाला. "

मॅट्रेनाच्या रागाचा पारा आणखी वाढला. मेंढकातड्याचा डगला न आणता, उलट आपला एकुलता एक डगला कुणातरी नंग्या बदमाशाला देऊन वर आणखी हा त्याला आपल्या बरोबर घरी घेऊन आला होता, हे तिला डाचत होतं.

टेबलावरचे पैसे तिनं उचलले, आणि अंगावरच्या कपड्यात नीट ठेवून दिले. मग ती ठासून म्हणाली : " माझ्याकडून जेवण नाही मिळायचं तुम्हांला. तुझ्याशी लगट करून येणाऱ्या सगळ्या नंग्या दारूड्यांची पोटपूजा करणं परवडण्यासारखं नाही. "

" छे छे ! मॅट्रेना, तुझ्या जिभेला लगाम घाल जरा. दुसऱ्याचं म्हणणं आधी ऐकून घे. "

" वा ! दारूड्या मूर्खोबाकडून शहाणपणाचे बोल ऐकायचे अं ? दारूपायी अक्कलहुशारी गमावून बसणाऱ्या शुंभा, तुझ्याशी लग्न करायला मी सुरुवातीला नकार दिला होता, तो अगदी योग्य होता म्हणायचा ! माझ्या आईनं मला एवढा कपडालत्ता दिला होता तर त्याची तू दारूपायी वासलात लावलीस. आता मेंढकातड्याचा डगला आणायला गेलास आणि ते पैसेही दारूत उडवलेस. "

आपण अवघ्या वीस कोपेक्सची दारू घेतली ही वस्तुस्थिती सायमनला आपल्या बायकोला समजावून द्यायची होती. त्या परक्या माणसाशी आपली कशी गाठ पडली हेही त्याला सांगायचं होतं. पण अवाक्षर बोलू द्यायला किंवा उत्तर द्यायला मॅट्रना त्याला वावच देत नव्हती. त्याच्या एका शब्दाला तिचे दोन शब्द झडत होते. एवढंच नव्हे, तर दहा वर्षांपूर्वी घडलेल्या गोष्टींचाही मारा ती त्याच्यावर करत होती.

मॅट्रना बोलबोल बोलली, आणि मग सायमनच्या अंगावर धावून जात तिनं त्याच्या जाकिटाची बाही पकडली. " माझं जाकीट देऊन टाक मला ! तेवढंच आहे माझ्यापाशी. तरीसुद्धा माझ्याकडनं घेऊन तू ते स्वत:च्या अंगावर चढवलंस. दे बघू आधी, लुतड्या कुतरड्या ! मरेनास का तू गारठून ! "

सायमन आपल्या अंगावरचं जाकीट ओढून काढू लागला. तर त्याची एक बाही भलत्या बाजूनं ओढली गेली. तेव्हा त्याच्या बायकोनं ते असं काही खेचून ओढलं, की ते शिवणीशी टरकून बरंचसं फाटलं. जाकीट हिसकावून घेऊन मॅट्रनानं ते आपल्या माथ्यावर टाकलं, आणि ती दरवाज्याकडं वळली. पण बाहेर जाताजाता ती थबकली. कारण तिच्या काळजात कुठंतरी खुपलेलं होतं. अजून बोलायच्या राहून गेलेल्या अपशब्दांच्या उकळ्या तिच्या मनात फुटत होत्या, आणि शिवाय हा परका माणूस कोण हे तिला जाणून घ्यायचं होतं.



त्या माणसानं डोळे वर करून मॅट्रेनाकडे पाहिलं आणि स्मितहास्य केलं.

□

निश्चलपणं उभं राहून मॅट्रेना म्हणाली : " हा माणूस भला असता तर उघडाबोडका राहिला नसता. याच्या अंगावर साधा सदरामुद्धा नाही, म्हणजे पहा. आणि तू सच्चेपणानं वागला असतास, तर असला फर्डा गडी तू कुठं पैदा केलास हे तू सांगितलं असतंस ! "

" सांगतो तर मग. मी आपला चाललो होतो. असाच ख्रिस्ताच्या छोट्या मंदिराजवळून गेलो, तर तिथं हा माणूस साफ उघडाबोडका अन् गारठलेला असा बसून राहिलेला होता. माणसानं उघडंबोडकं रहायला हे काही उन्हाळ्याचे दिवस नाहीत. देवानं मला याच्याकडं आणून सोडलं नसतं, तर याचा निकाल नसता का लागला ? अशा वेळी करायचं काय ? याला सोडून जाणं म्हणजे तशी क्षुल्लक का बाब होती ? अर्थात मी त्याचा पत्कर घेतला, कपड्यांनी त्याचं अंग झाकलं, आणि त्याला घरी घेऊन आलो. म्हणून म्हणतो – एवढा संताप करून घेऊ नकोस. पाप लागेल अशानं, मॅट्रेना. आपणही मरून जाऊ एक दिवस. "

आणखी थोडी कानउघाडणी करायचं मॅट्रेनाच्या मनात होतं, पण त्या परक्या माणसाकडं तिची नजर गेली, आणि ती मुकाट राहिली. तो परका माणूस बसून राहिला होता. पण जागचा हालला नव्हता. बाकाच्या अगदी कडेला बसला होता तो. त्यानं आपल्या गुडघ्यांवर दोन्ही हातांची घडी घातली होती, त्याची मान पुढं झुकून हनुवटी छातीला टेकली होती, त्यानं डोळे उघडले नव्हते, आणि त्याचा सबंध चेहरा दुमडलेला आणि सुरकुतलेला होता. जणू काय त्याला कशानं तरी गुदमरून टाकलं होतं. तेवढ्यात सायमन म्हणाला : " मॅट्रेना ! तुझ्यात देवाचा काहीच अंश नाही का ? "

ते वाक्य कानी पडताच मॅट्रेनानं पुन्हा त्या परक्या माणसाकडं

पाहिलं, आणि एकाएकी तिचं काळीज गलबललं. दरवाज्याकडं पाठ फिरवून ती भट्टी असलेल्या कोपऱ्याकडं वळली आणि तिनं जेवणाची तजवीज केली. टेबलावर कप ठेवून त्यात तिनं गरम सूप ओतलं. आणि ब्रेडचा उरलेला तुकडा आणून ठेवला. मग एक सुरी आणि दोन चमचे तिथं नेऊन ठेवले.

" आमच्याकडचा ब्रेड चाखून पहाता का ? " ती उद्गारली.

सायमननं त्या परक्या माणसाला कोपरानं किंचित धक्का देत म्हटलं," भल्या तरुणा, इथं बस असा. "

सायमननं ब्रेड कापला, सुपात कुस्करला आणि जेवायला सुरुवात केली. मॅट्रना मात्र टेबलाच्या कोपऱ्याशी बसली, आणि हाताच्या कोपरांवर हनुवटी टेकून त्या परक्या माणसाकडं बघत राहिली.

त्या माणसाबद्दल मॅट्रनाला आता करुणा तशीच आपुलकी वाटू लागली. आणि तो माणूस एकाएकी उल्हसित झाला. आपल्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या घालवून, डोळे वर करून त्यानं मॅट्रनाकडं पाहिलं आणि स्मितहास्य केलं.

" इथला नाही मी. "

" मग या रस्त्यानं कसा काय आलास ? "

" ते नाही मला सांगता यायचं. "

" कुणी लुबाडलंय् का तुला ? "

" देवानं शासन केलंय् मला. "

" अन् तू खुशाल उघडाबोडका पडून होतास ? "

" हां ! उघडाबोडका बसून गारठत होतो. सायमननं मला पाहिलं आणि माझ्यावर करुणा केली. त्यानं आपला डगला काढून माझ्या अंगावर घातला आणि इथं यायला लावलं मला. आणि इथं माझ्यावर दया करून तू मला खायलाप्यायला दिलंस. देव तुमचं भलं करो ! "

मॅट्रना जागची उठली, थोड्याच वेळापूर्वी दुरूस्त केलेला सायमनचा

जुना सदरा तिनं खिडकीवरून उचलला अन् तो त्या माणसाला दिला. शिवाय तिनं सायमनची कुठलीशी एक जुनी विजार शोधून काढली अन् तीही त्याला देऊन टाकली. म्हणाली : " घे हे कपडे ! तुला सदरा नाही हे मला दिसतंय्. हे कपडे घाल, अन् पोटमाळ्यावर नाहीतर भट्टीच्या वरच्या अंगाला – हवा तिथं झोप. "

त्या माणसानं डगला काढला, सदरा आणि विजार अंगावर चढवली, आणि तो पोटमाळ्यावर जाऊन पडला. मॅट्रेनानं दिवा विझवला, तो डगला घेतला आणि भट्टीच्या माथ्यावर नवऱ्याच्या बाजूला जाऊन ती लवंडली.

मॅट्रना डगला पांघरून घेऊन अंथरुणावर पडली खरी पण तिला झोप काही येईना. तिचं विचारचक्र त्या परक्या माणसाभोवतीच घोटाळत राहिलं.

उरलासुरला ब्रेड त्यानं खाऊन फस्त केलाय्, आणि उद्यासाठी ब्रेडच शिल्लक उरलेला नाही. त्याचप्रमाणं सदरा अन् विजार आपण त्याला देऊन टाकली. हे सारं मनात येताच ती अतिशय त्रस्त होऊन गेली. पण मग आपल्याकडं पाहून त्यानं केलेलं ते प्रसन्न स्मितहास्य तिला आठवलं. आणि त्याच्याबद्दलच्या आपुलकीनं तिचं हृदय उचंबळून आलं.

मॅट्रनाला बराच वेळ झोप येऊ शकली नाही. केवळ ध्यान देऊन ऐकत पडून राहिली ती. सायमनलाही झोप येत नव्हती. त्यानं डगला आपल्या बाजूला ओढून घेतला.

" सायमन ! "

" आं ? "

" आपण आपला उरलासुरला सगळा ब्रेड खाऊन बसलोय. आणखी बनवलेला नाही मी. उद्या कसं काय जमायचं समजत नाही. आपली शेजारीण मॅलानिया हिच्याकडून थोडं पीठ उसनं मागून आणावं

लागेल मला. ''

'' मिळेल त्यात समाधान मानून राहू. ''

पाठ टेकून ती मुकाट पडून राहिली.

'' हा माणूस भला आहे यात शंका नाही.पण स्वतःबद्दल तो काहीच कसं बोलत नाही ? ''

'' कदाचित तसं वागणं त्याला भाग पडत असेल ! ''

'' पण का ? ''

'' काय की... ''

'' आपल्याजवळ जे काही आहे ते त्याला आपण देतोय्. पण दुसरं कुणी आपल्याला काहीच कसं देत नाही ? ''

तिला काय उत्तर द्यावं हे सायमनला समजेना. '' आपण आपलं बोलणं आता पुरे करू या. '' एवढंच बोलला तो आणि दुसऱ्या अंगाला कुशीवर वळून झोपी गेला.

□

सकाळी सायमन उठला. मुलं झोपलेली होती, तर त्याची बायको शेजाऱ्याकडं पीठ उसनं मागायला गेली होती. फक्त आदल्या रात्री आलेला तो परका माणूस जुन्या सदऱ्या–विजारीत, बाकावर बसून वरच्या दिशेला पहात होता. आदल्या रात्रीपेक्षा त्याचा चेहरा जास्त तजेलदार दिसत होता. सायमन त्याला म्हणाला '' हे बघ, भल्या माणसा, पोट खायला मागतं आणि उघडं अंग कपडालत्ता. अर्थात अन्नवस्त्रासाठी तुला काम करायला हवं. कसला कामधंदा येतो तुला ?''

'' काहीसुद्धा करायचं माहीत नाही मला. ''

'' सायमन थक्क होऊन म्हणाला '' काही करायची इच्छा असली, तर माणसाला काहीही शिकता येईल. ''

'' सर्वच माणसं काम करतात. अर्थात मीही करीन. ''

'' नाव काय बरं तुझं ? ''

'' मायकेल. ''

'' हे बघ मायकेल, तू तुझी काहीच माहिती सांगत नाहीस आम्हांला. अर्थात तो तुझा प्रश्न आहे. पण तुला खायला हे हवंच. मी सांगेन तसं काम करशील, तर तुला जेवूखाऊ घालीन मी. ''

'' देव तुझा सांभाळ करो ! शिकेन मी. कसं करायचं ते दाखव मला. ''

मेण लावलेल्या दोऱ्याचा तुकडा घेऊन सायमननं तो आपल्या हाताच्या बोटांभोवती गुंडाळला आणि त्याची टोकं पिळायला सुरुवात केली.

मायकेलनं ते पाहून घेतलं. मग तो दोरा आपल्या बोटांभोवती गुंडाळून घेऊन त्याची टोकं त्यानं त्याच तऱ्हेनं पिळायला सुरुवात केली. मग सायमननं त्याला चामडं नितळ करून कसं दुमडायचं हे दाखवलं. मायकेलला ते लगेच समजून चुकलं. मग चामड्याचे तुकडे एकत्र कसे शिवायचे आणि सरळ कसे कातरायचे ते सायमननं दाखवून दिलं. हेही मायकेलच्या लगेच तत्काळ ध्यानी आलं.

जे जे काम सायमननं त्याला दाखवलं, ते ते त्याला लगेच समजलं. आणि अवघ्या तीन दिवसांनंतर तो असं काही सफाईनं काम करू लागला की, जणू काही आयुष्यभर तो तेच काम करीत आलाय्. हातून कसलीही चूक न होता तो काम करायचा. जेवायखायचाही अगदी थोडं. खंड पडू न देता, तो सतत सारखं काम करायचा, मुकाट रहायचा आणि नेहमी वरती पहायचा. तो कधीही रस्त्यावर गेला नाही. गरजेपेक्षा कधी अवाक्षर जास्त बोलला नाही की, गमतीनं बोलला – हसला नाही.

त्यांनी त्याला फक्त एकदाच स्मित हास्य करताना पाहिलं. ते कधी,

तर पहिल्या रात्री मॅट्रनानं त्याला जेवायला घातलं तेव्हा.

□

दिवसगत होत गेली, आठवडे सरत गेले, आणि वर्षही उलटून गेलं. मायकेल पूर्वीसारखा सायमनकडंच राहून काम करत राहिला होता. आणि सायमनच्या या कारागिराची कीर्ती पसरत गेली. लोक म्हणू लागले की, सायमनचा कारागीर मायकेल याच्यासारखे मोहक बांधणीचे अन् मजबूत बूट दुसऱ्याला कुणालाच बनवता येत नाहीत. त्या सबंध प्रदेशातले लोक बूट बनवून घेण्यासाठी सायमनकडं येऊ लागले. साहजिकच सायमनला त्याच्या धंद्यात बरकत आली.

एके दिवशी, हिवाळ्यात सायमन आणि मायकेल दोघेही एकत्र काम करत बसले होते. एवढ्यात तीन घोड्यांची एक घसरगाडी, तिच्या सगळ्या घंटा खणखणवीत, घराशी येऊन थडकली. त्यांनी खिडकीतून डोकावून पाहिलं, तर ती घसरगाडी त्यांच्या दरवाज्यापाशीच थांबली होती. एका तरुण नोकरानं पुढच्या बैठकीवरून खाली उडी घेतली आणि गाडीचं दार उघडलं. लोकरीचा डगला अंगाभोवती लपेटलेला एक बडा गृहस्थ गाडीतून खाली उतरला. गाडीबाहेर पडल्यावर तो सायमनच्या घराकडं गेला आणि जिना चढू लागला. मॅट्रना लगबगीनं पुढं सरसावली आणि तिनं घराचं दार सताड उघडून ठेवलं.

त्या ठेंगण्या दारातून आत पाऊत टाकताना, माथं खाली वाकवून तो बडा गृहस्थ आत शिरला. तो ताठ उभा राहिला, तेव्हा त्याचं डोकं छताला जवळ – जवळ टेकलं होतं. तर त्याच्या देहानं त्या खोलीचा एक सबंध कोपरा अडवला होता.

सायमन उठून उभा राहिला आणि त्यानं वाकवाकून अभिवादन केलं. असा बडा गृहस्थ आपल्या इथं आलेला पाहून तो भांबावून गेला. असा रुबाबदार गृहस्थ त्यानं कधीही पाहिला नव्हता. तसा सायमन

अगदी सडपातळ, मा[illegible] लिपडा. आणि मॅट्रना तर हाडकुळी होती. पण ही असामी कुठल्यातरी वेगळ्याच दुनियेतून आलेल्या अलौकिक व्यक्तीसारखी दिसत होती. त्याचा लाल गुबगुबीत चेहरा, बैलासारखी गर्दन त्याच्या सबंध शरीराची ठेवणच मुळी ओतीव लोखंडाची घडल्यासारखी दिसत होती.

तो बडा गृहस्थ धापा टाकीत होता. आपला लोकरी डगला काढून तो बाकावर बसला, आणि म्हणाला, '' मालक कोण आहे इथं ? ''

पुढं सरसावत सायमन म्हणाला. ''मी, साहेब. ''

त्या गृहस्थानं आपल्या बरोबरच्या पोराला ओरडून सांगितलं, '' फेडका, ते चामडं घेऊन ये बघू. ''

तो नोकर एक बंडल घेऊन धावतच आला. गृहस्थानं ते बंडल घेऊन टेबलावर ठेवलं, अन् म्हटलं, '' उघड बघू. '' पोऱ्यानं ते उघडलं.

आपल्या बोटांच्या टोकांनी ते चामडं ठोकत तो गृहस्थ सायमनला म्हणाला, '' हे बघ ! हे चामडं पाहिलंस ? ''

'' हो, सरकार. '' सायमन उत्तरला.

'' हे कोणत्या प्रकारचं चामडं आहे, ते सांगता येईल तुला ? ''

ते चामडं थोडं हाताळून बघत सायमन म्हणाला, '' उत्तमच आहे! ''

'' उत्तम आहे, अं ? वा ! खरंच जणू ! अरे मूर्खा, असलं चामडं आयुष्यात कधी बघायला मिळालं नसेल तुला. जर्मन माल आहे. वीस रूबल्स मोजलेत मी यासाठी. ''

हे ऐकून सायमन किंचित दचकला, अन् म्हणाला, '' असलं चामडं आमच्या नजरेला कुठून पडणार म्हणा ! ''

'' अर्थात नाहीच. अगदी बरोबर. आता मला सांग, माझ्यासाठी या चामड्याचे बूट बनवता येतील का तुला ? ''

" हो !बनवीन मी मेहरबान ! "

गृहस्थानं आपला आवाज चढवून त्याला सुनावलं." बनवशील अं ? पण चामडं कशा प्रकारचं आहे अन् ते तू कसं काय शिवणार हे नीट ध्यानी घे. हं ! माझे बूट तू असे शिवायला हवेस की, ते तब्बल वर्षभर टिकतील आणि शिवाय त्यांचा आकार बिघडता कामा नये किंवा त्यांची शिवण उसवता कामा नये. हे सारं तुला जमणार असेल, तरच हे चामडं घे अन् काप. नाहीतर चामडं घेऊन ते कापायच्या फंदात पडू नकोस. मी तुला आधीच बजावतोय् की, वर्ष उलटण्यापूर्वी बुटाचा आकार बिघडला किंवा सांध्यावरची शिवण उसवली, तर तुरुंगात डांबीन मी तुला. पण वर्षभरात त्याचा आकार कायम राहिला अन् शिवण टिकून राहिली, तर तुझ्या कामगिरीचे दहा रुबल्स देईन मी तुला. "

सायमन थोडासा धास्तावला. काय सांगावं याचा त्याला विचार पडला. त्यानं मायकेलकडं नजर वळवली, आणि एका कोपरानं त्याला ढोसत, कुजबुजत्या स्वरात विचारलं." काय भाई, तुला काय वाटतं ? "

" खुशाल घे हे काम " अशा अर्थी मायकेलनं आपली मान डोलावली.

सायमननं मायकेलचा सल्ला मानला, आणि आकार न गमावणारे, तसंच शिवण टिकवून धरणारे बूट बनवण्याचा पत्कर त्यानं घेतला. त्या गृहस्थानं आपल्या पोऱ्याला हाक मारली आणि आपल्या डाव्या पायातला बूट काढायला फर्मावलं. मग आपला तो पाय पुढं धरीत तो म्हणाला, " हं, घे माझं माप ! "

साधारणपणे सतरा इंच लांबीचा कागदाचा तुकडा सायमननं शिवून जुळवून घेतला. मग त्या गृहस्थाचा पाय नीट पाहून घेऊन गुडघे टेकले, गृहस्थाचा सुबक पायमोजा खराब होऊ नये म्हणून आपल्या अंगावरच्या

ॲप्रनला आपले हात नीट पुसून घेतले आणि माप घ्यायला सुरुवात केली. त्यानं पायाच्या तळव्याचं माप घेतलं, पावलाच्या वरच्या भागाचं माप घेतलं, आणि तो टाचेचं माप घेऊ लागला. पण मापाला घेतलेला कागद कमी पडला. कारण तंगडीचा भाग जाडजूड तुळईसारखा भला-भक्कम होता.

" नडगीवर चिमटा येऊ नये म्हणून खबरदारी घे, बरं का ! "गृहस्थ म्हणाला.

सायमननं मापासाठी कागदाचा आणखी एक तुकडा घेतला. गृहस्थ आता नीट सरसावून बसला. पायमोज्यातल्या बोटांची जरा चाळवाचाळव केली आणि त्यानं त्या झोपडीतल्या माणसांवरून नजर फिरवली. मायकेलकडं लक्ष जाताच त्यानं विचारलं," हा कोण बसलेला दिसतोय तिथं ? "

" उमेदवार आहे माझा. तोच शिवणार आहे बूट. "

" हे बघ ! " गृहस्थ मायकेलला सांगू लागला," नीट काळजी घेऊन शिवणकाम कर हं. अख्खं वर्ष टिकले पाहिजेत बूट. "

सायमनही मायकेलकडं पहात होता. तर मायकेलचं लक्ष त्या गृहस्थाकडं नव्हतं. उलट तो त्या गृहस्थाच्या पाठीमागच्या कोपऱ्यात टक लावून बघत होता. जणू काही त्याला तिथं कुणी तरी दिसत होतं. मायकेल असाच काही वेळ एकटक बघत राहिला आणि मग एकाएकी त्यानं स्मितहास्य केलं. त्याची मुद्रा उजळून निघाली.

" तुझे दात कशाला दाखवतो आहेस, मूर्खा ? "गृहस्थ ठणकावून म्हणाला," त्यापेक्षा काम वेळेत कसं होईल, याकडं लक्ष देशील तर बरं ! "

त्यावर मायकेल उत्तरला," जरूर पडेल तेव्हा ते तयार असतील. "

" ठीक आहे. "

त्या बड्या असामीनं आपला बूट आणि लोकरीचा डगला पुन्हा चढवला, हुंगल्यासारखं नाकानं थोडं सुक् – सुक् केलं, आणि ती दाराकडं वळली. पण या वेळी स्वारी डोकं वाकवायला विसरली. त्यामुळं दाराच्या वरच्या आडव्या पाटीवर तिचं डोकं आदळलं. शिव्याशाप देत स्वारीनं आपलं कपाळ जरासं चोळलं, आणि पायऱ्या उतरून ती खाली गेली. आपल्या घसरगाडीत जाऊन बसली, आणि दौडत निघाली.

ती बडी असामी निघून गेली. गेल्यावर सायमन म्हणाला, " खडकासारखा कणखर आहे लेकाचा. याचं डोकं आपटून दाराची पाटी जवळजवळ निखळायला आली पण स्वारीला जराशी कुठं दुखापत झाली एवढंच. "

तर मॅट्रेना म्हणाली, " त्याचं जीवनच असं आहे की, त्याला कणखर अन् कडक बनल्याखेरीज गत्यंतर नाही. अशा पाषाणावर प्रत्यक्ष मृत्यूचंसुद्धा काही चालणार नाही. "

□

सायमन मायकेलला म्हणाला, " आपण हे काम पत्करलंय् खरं. पण आपल्याला हे अखेर त्रासदायक तर ठरणार नाही ना ? माल महागडा आहे, अन् तो गृहस्थ तर कडक आहे. म्हणून म्हणतो – या कामात आपली काही चूक झाली तर ? आता असं पहा ! तुझी नजर माझ्यापेक्षा जास्त तीक्ष्ण आहे. तसंच तुझे हात मोजमापात अधिक कुशल आहेत. तूच हे चामडं काप. मी जोडणीचं काम करेन.'

मायकेलनं आज्ञेची अंमलबजावणी लगेच केली. बड्या गृहस्थाचं चामडं घेतलं, ते टेबलावर पसरलं, त्याची दुहेरी घडी केली, आणि आरी घेऊन तो ते कापायला लागला.

मॅट्रेना पुढं सरसावली आणि मायकेल चामडं कसं काय कापतो

ते निरखू लागली. ज्या प्रकारे तो चामडं कापत होता ते पाहून ती थक्क झाली. चांभारकाम पहाण्याचा तिला सराव होता. त्यामुळं तिच्या लक्षात आलं की, बुटांसाठी जसं चामडं कापतात, तसं मायकेलनं कापलेलं नाही; तर ते वर्तुळाकार कापलंय्. त्याबद्दल त्याच्याशी बोलावं असं एकदा तिच्या मनात आलं. पण तिनं विचार केला :' कदाचित असं असेल, की बड्या माणसांचे बूट कसे कापतात याची मला कल्पना नसेल. मायकेलला त्याबद्दल माझ्यापेक्षा खात्रीनं जास्त माहिती असेल. तेव्हा त्याच्या कामात लुडबूड करू नये हे बरं '।

तोवर मायकेलनं चामडं कापलं होतं. आता दोन्ही टोकं धरून तो तो शिवू लागला. पण बुटांसाठी दोन टोकं अलग करून शिवतात, तसं न करता, मेलेल्या माणसाच्या स्लिपर्ससाठी एकच टोक धरून शिवतात, तसं शिवणकाम चाललं होतं त्याचं.

हा प्रकार पाहूनही मॅट्रेना थक्क झाली; पण तरीसुद्धा तिनं त्याच्या कामात ढवळाढवळ केली नाही. मायकेल आपल्यापरी शिवत राहिला होता. अंधार पडू लागला होता. सायमन जेवण करायला म्हणून उठला, आणि त्यानं सभोवार नजर फिरवली. तर त्याला असं दिसलं की, त्या बड्या गृहस्थाच्या चामड्याचे बूट न बनवता, मायकेलनं चक्क स्लिपर्स बनवले होते.

दीर्घ सुस्कारा सोडत सायमन आपल्या मनाशी उद्गारला, ' कधीही एकसुद्धा चूक न करता जो मायकेल आमच्याबरोबर तब्बल वर्षभर काम करतोय्, त्यानंच या खेपेला कामाचा असा विचका करावा, याला काय म्हणावं ? त्या बड्या गृहस्थानं मजबूत तळव्याचे बूट बनवायला बजावलं होतं, आणि यानं तर तळव्याविना स्लिपर्स शिवलेयत. चामड्याची पार वासलात लावली यानं. आता त्या बड्या असामीला मी सांगू तरी काय ? या चामड्यासारखं दुसरं चामडं मी त्याला कदापि देऊ शकणार नाही.'

तो मायकेलला म्हणाला, " मित्रा, काय बरं केलंस तू हे ? माझा पुरता नाश केलास तू. त्या गृहस्थानं बूट बनवायला सांगून ठेवलं होतं. असं असताना तू हे काय शिवून बसलास ? "

त्या बुटांबद्दल सायमन मायकेलची कानउघाडणी करू लागला नाही तोच बाहेरच्या दाराच्या कडीशी कुणीतरी चाचपडल्याचा आवाज आला, आणि दार ठोठावलं गेलं. त्यांनी खिडकीतून डोकावून पाहिलं, तर खाली कुणीतरी घोड्यावरून आलंय आणि त्यानं आपला घोडा नुकताच बांधून ठेवलाय् असं त्यांना दिसलं. त्यांनी दरवाजा उघडला, आणि मघा त्या बड्या गृहस्थाबरोबर असलेला तो पोरगेलासा नोकर आत आला.

" चांगलं आरोग्य लाभो तुम्हाला, मंडळी ! "

" आरोग्यवान हो, बेटा ! काय गडबड आहे रे ?'

" त्या बुटांबद्दल बोलायला पाठवलंय् मला आमच्या मालकिणीनं. "

" बुटांबद्दल ? "

" हां, बुटांबद्दल. मालकाला गरज नाही आता त्या बुटांची. याउप्पर कधीही पाऊल टाकणार नाही तो. मरण पावलाय् ! "

" छे - छे ! असं कसं होईल ? "

" घरापर्यंतसुद्धा पोचला नाही तो जिवंतपणी. वाटेत गाडीतच मरण ओढवलं. गाडी घराशी जाऊन पोचली, तेव्हा त्याला बाहेर यायला मदत करायला म्हणून आम्ही पुढं सरसावलो, तर गारठून ताठ झाल्यासारखं त्याचं अवजड धूड गाडीत मरून पडलेलं दिसलं. शिकस्त करून गाडीतून खेचून बाहेर काढलं आम्ही त्याला. आता मालकिणीनं मला असं सांगून पाठवलंय, ' काय घडलंय् तें त्या चांभाराला जाऊन सांग. म्हणावं, मालकाला आता बुटांची जरुरी नाही. तेव्हा, बुटांसाठी म्हणून दिलेल्या चामड्याचे, त्याच्याच मापाचे स्लिपर्स त्याच्या पायांत

घालण्यासाठी बनवायचे. ' तसे ते शिवून तयार होईपर्यंत इथं थांबून, घेऊन जाणार आहे मी ते. त्यासाठीच आलोय् मी. ''

मायकेलनं टेबलावरचे, त्या चामड्याचे कापलेले तुकडे गोळा केले आणि गुंडाळून त्याचा गोळा बनवला. मग, पूर्ण तयार झालेले दोन्ही स्लिपर्स एकमेकांवर थोपटून त्यानं आपल्या ॲप्रननं पुसले, आणि ते त्या पोऱ्याकडं दिले. '' बराय्, मंडळी ! येतो मी. तुमचा दिवस बरेपणानं जावो ! ''असं म्हणून तो पोरगा निघून गेला.

□

आणखी एक वर्ष उलटलं, – दोन वर्षं निघून गेली. मायकेल सायमनपाशी राहिल्याला आता सहावं वर्ष चालू होतं. पूर्वीसारखाच रहात होता तो. कुठंही गेला नाही की, कुणा परक्या माणसाशी कधी काही बोलला नाही. आणि तेवढ्या त्या कालावधीत त्यानं अवघ्या दोन वेळा काय ते स्मितहास्य केलं होतं : एकदा मॅट्रनानं त्याला पहिल्यांदा जेवायला घातलं तेव्हा, आणि दुसऱ्यांदा - तो बडा गृहस्थ त्यांच्याकडं आला होता तेव्हा.

आपला कारागीर म्हणून मायकेलवर सायमन खूप होता. तो कुठून आला, याची चौकशी सायमन करेनासा झाला होता. एखाद्या दिवशी मायकेल आपणाला सोडून जाईल एवढीच धास्ती त्याला वाटायची.

एके दिवशी सारीजणं घरी बसली होती. घरची गृहिणी मॅट्रेना स्टोव्हवर लोखंडी कढई ठेवत होती, तर मुलं बाकांवर धावत पळत, खिडक्यांतून बाहेर बघत होती. सायमन एका खिडकीपाशी बसून चामड्याचं शिवणकाम करत होता, तर मायकेल दुसऱ्या खिडकीपाशी बसून एका बुटाची टाच ठोकत होता. तेवढ्यात त्या लहानग्या मुलांतला एक मुलगा बाकावरून मायकेलपाशी आला, आणि त्याच्या खांद्यावर टेकून खिडकीबाहेर पाहू लागला. तो एकाएकी उद्‌गारला,

" मायकेलकाका, बघ तर खरं. एक बाई आपल्या मुलांना घेऊन येतेय आपल्या घरी. तर त्या छोट्या मुलींतली एक किनई लंगडी आहे. "

त्या मुलाचे हे उद्‌गार कानी पडताच मायकेलनं आपल्या हातातलं काम टाकून दिलं आणि खिडकीकडं वळून, बाहेर रस्त्यावर डोकावून पाहिलं.

सायमनला अतिशय नवल वाटलं. मायकेलनं यापूर्वी चुकूनसुद्धा कधी रस्त्यावर नजर टाकली नव्हती. पण आता गडबडीनं खिडकीकडं जाऊन तो कशाकडं तरी पहात राहिला होता. सायमनही कुतूहलानं खिडकीबाहेर डोकावून पाहू लागला, तर एक कुलीन बाई सरळ आपल्या घराच्या दरवाज्याकडं येत असलेली त्याला दिसली. तिच्या अंगावरचे कपडे मोहक होते. आणि लोकरी कपड्यांत असलेल्या आणि माथ्याभोवती रुमाल बांधलेल्या दोन मुली तिनं आपल्या हाताशी धरल्या होत्या. त्या मुली म्हणजे दोन वाटाणे असावेत तशा होत्या. त्यांच्यातल्या एकीहून दुसरी मुलगी ओळखून काढता येण्यासारखी नव्हती, एवढं त्या दोघींत साम्य होतं. मात्र दोघींतली एकजण एका पायानं अधू होती. त्यामुळं ती चालताना लंगडत होती.

ती बाई जिना चढून पडवीत आली आणि दरवाज्याशी चाचपडू लागली, मग अंगच्या कुलपाचा मोगरा हुडकून काढून तिनं तो फिरवला आणि दार उघडलं. दोन्ही लहानग्या मुलींना पुढं सारत ती घरात आली.

" चांगलं आरोग्य लाभो तुम्हाला, मंडळी ! "

" या, या बाईसाहेब. काय काम काढलंत आमच्याकडं ?"

बाई एका खुर्चीवर बसली, तर त्या बुजऱ्या मुली तिच्या गुडघ्यांशी बिलगून उभ्या राहिल्या. ती भली माणसं नवल करत पहात राहिली.

" हं ! मी काय म्हणते, " बाई म्हणाली, " या मुलींसाठी उन्हाळ्याचे बूट शिवून द्याल का ? "

'' द्यायला काही हरकत नाही. तसं म्हणजे मुलांचे छोटे बूट बनवण्याची आमची प्रथा नाही. तरीपण बनवू, अलबत् बनवू. ते जोड चामड्याचे आणि तागाच्या कपड्याच्या अस्तराचे बनवता येतील. आमचा हा मायकेल या धंद्यात तरबेज आहे. ''

सायमननं मायकेलकडं दृष्टी फेकली, तर तो आपलं काम बाजूला सारून त्या मुलींकडं टक लावून बघत राहिला होता. त्याची नजर त्यांच्यावर खिळून राहिली होती.

मायकेलचा हा वेगळाच पवित्रा पाहून सायमनला विस्मय वाटला. त्या मुली लोभसवाण्या होत्या हे तर खरंच. काळ्याभोर डोळ्यांच्या, गोबऱ्या गालांच्या, गुलाबी चेहेऱ्यामोहऱ्याच्या तसंच त्यांचे लोकरीचे लहानसे कोट अन् झगे हेही अतिशय देखणे होते. तरीपण पूर्वीपासूनची त्यांची ओळख असल्यासारखं मायकेलनं उत्कटतेनं त्यांच्याकडं पहावं याचं सायमनला अप्रूप वाटलं.

पण आपणाला वाटणारा विस्मय बाजूला सारून सायमन, त्या बाईचं करायचं काम निश्चितपणं ठरवून घेण्याच्या दृष्टीनं तिच्याशी बोलणं करू लागला. त्यांनी काय ते ठरवलं आणि सायमन मापं घ्यायला सरसावला. तेव्हा त्या लंगड्या छोटुकलीला आपल्या मांडीवर घेऊन ती बाई म्हणाली, '' या छोटुकलीच्या आधारानंच माप घे म्हणजे झालं. हिच्या डाव्या पायासाठी एक बूट बनव, आणि उजव्या पायाच्या मापाचे तीन बनव. हो ! दोन्ही मुलींचे पाय सारख्याच आकाराचे आहेत. दोन वाटाणे एकसारखे असावेत तसे. जुळ्या आहेत ह्या. ''

ती इटुकली मापं घेऊन झाल्यावर, त्या लंगड्या छोटुकल्या मुलीला सायमननं विचारलं, '' कशामुळं झालं ग हे असं ? तशी तर तू गोंडस छोटुकली आहेस. अशीच जन्मलीस का तू ? ''

'' नाही नाही, '' ती बाई म्हणाली, '' हिच्या आईचंच कर्तृत्व ते. ''

आता मॅट्रेना जवळ सरसावली. ती बाई कोण याची, आणि त्या जुळ्यांसंबंधीची सगळी माहिती तिला जाणून घ्यायची होती. तिनं विचारलं, " म्हणजे ... तू त्यांची आई नव्हेस तर ? "

" हां ! मी यांची आई नाही. एवढंच नव्हे, तर कसलं नातंही लागत नाही यांचं – माझं. या मला अगदी परक्या होत्या. पण मी यांचा पत्कर घेऊन यांचा सांभाळ केला. "

" ही तुझी मुलं नाहीत, अं ? पण एवढं असून तुझी यांच्यावर भारी माया दिसते की ! "

" यांच्यावर माझी माया नसेल कशी ? माझ्या अंगावरचं दूध पाजून पोसलंय् मी या दोघींनाही. तसं माझं स्वतःचंही मूल होतं एक, पण देव घेऊन गेला त्याला. तरीसुद्धा यांच्यावर माझी जेवढी माया आहे, तेवढी माझ्या स्वतःच्या मुलांवरही करता आली नाही मला. "

□

ती बाई बोलू लागली, आणि तिनं सांगितलं ते असं, " या पोरक्या मुलींचे आईबाप आठवड्याभरात लागोपाठ वारले, त्या गोष्टीला आता सहाएक वर्षं झाली." ती म्हणाली, " बाप एका मंगळवारी मरण पावला, तर आईचं दफन लोकांनी लगतच्या शनिवारी केलं. ही दुर्दैवी इवलाली बछडी बापाच्या निधनानंतर तीन दिवसांनी जन्माला आली. आणि यांची आई यांना जन्म दिल्यानंतर धड दिवसभरही जगली नाही. माझा नवरा आणि मी त्या वेळी त्याच गावी रहात होतो. आम्ही त्यांचे शेजारी होतो. जवळजवळच रहायचो. या मुलांचा बाप एकलकोंडा होता. लाकूडतोड्याचं काम करायचा. तर एके दिवशी एक झाड मुळापासून तोडीत असताना ते अपघातानं थेट याच्याच अंगावर कोसळलं. तो एवढा चेचून निघाला की, लोक त्याला घरी आणून पोचवेपर्यंत त्यानं आपला आत्मा देवाच्या स्वाधीन केला. त्याच्या

बायकोनं त्याच आठवड्यात या दोन छोटुकल्यांना जन्म दिला. त्या घरात दारिद्र्य अन् एकाकीपणा याखेरीज काही नव्हतं. बिचारी आई अगदी एकटी होती. बाळंतपणाच्या वेळी तिथं कुणी नर्स नव्हती, की सुईण. एकाकीपणं तिनं यांना जन्म दिला, आणि एकाकीपणीच ती मरण पावली.

" सकाळी या शेजारणीची विचारपूस करायला म्हणून मी गेले. तिच्या झोपडीशी मी पोचते, तर बिचारी कधीची थंड पडली होती असं आढळून आलं. बाळंतपणाच्या यातना भोगताना तिनं या बछडीवरून नकळत लोळण घेतली हो ! या बछडीवरून तिनं लोळण घेतली अन् हिचा पाय मोडला, असंच म्हणायचंय् मला. भोवतालचे लोक जमले. त्यांनी तिचं प्रेत धुऊनपुसून ठाकठीक केलं, आणि खळगा खणून तिचं दफन केलं. सगळी भली माणसं होती. ही मुलं एकटी पडली होती. आता यांचं काय करायचं ? तिथल्या बायांमधे मीच काय ती एकटी लेकराला अंगावरचं दूध पाजणारी होते. आठेक आठवडे तरी माझ्या लाडक्या बाळाला अंगावरचं दूध पाजत होते मी. ह्या जुळ्या अर्भकांना तात्पुरतं मी माझ्या घरी नेलं. मग आसपासचे लोक, शेतकरी मंडळी एकत्र जमली. या मुलांची कशी काय तजवीज करायची याबद्दल त्यांनी कर – कर विचार केला, आणि मग ते मला म्हणाले, ' मरिया, या मुलांची काय व्यवस्था करायची हे आम्ही विचारविनिमय करून ठरवीतोवर या मुलांना तूर्त तुझ्यापाशीच ठेवून घे. '

" सुरुवातीला या धडधाकट मुलीला तेवढी मी दूध पाजायला स्तनाशी धरायची; अपाय झालेल्या मुलीला पाजायचीच नाही मुळी. हे मूल जगेल असं वाटत नव्हतं मला. पण लौकरच माझं मन मला टोचू लागलं : ' हा इवलासा लोभसवाणा मुखडा कोमेजून जात असलेला पहावतो तरी कसा तुला ? ' तेव्हा मग या मुलीलाही

अंगावर पाजू लागले मी. माझं स्वत:चं मूल अन् भरीला ही दोघं – अशा तिघांना अंगावरचं दूध पाजायची. त्यावेळी मी तरणीताठी अन् धष्टपुष्ट होते. आणि अन्नही चांगलं सकस मिळायचं मला. देवानं मला दूधही मुबलक दिलं होतं. एकाच वेळी दोघांना पाजायची मी. तोवर तिसरं मूल वाट बघत रहायचं. मग एकजणाला बाजूला सारून तिसऱ्याला पाजू लागायची मी. तिघांचंही पोषण करण्याची कुवत देवानं मला दिली होती. पण दुसऱ्या वर्षी माझ्या स्वत:च्या मुलाला मूठमाती द्यावी लागली मला. त्यानंतर एकपरी आमची उन्नती होऊ लागली होती. पण देवानं मला आणखी मुलं दिली नाहीत. सध्या आम्ही धान्यव्यापाऱ्याबरोबर गिरणीच्या जागीच रहातो. माझा नवरा चांगला पगार मिळवतो अन् आमचं आयुष्य मजेत चाललंय्. मात्र आम्हाला स्वत:चं मूलबाळ नाही. ही मुलं नसती, तर एकाकी जगणं कसं मानवलं असतं मला ? शिवाय यांचा किती लळा आहे मला ! यांच्याअभावी मेणाविना मेणबत्ती बनले असते मी. ''

एका हातानं त्या बाईनं त्या लंगड्या छोटुकलीला आपल्याजवळ कवळून घेतलं, आणि दुसऱ्या हातानं आपल्या गालांवरची आसवं पुसली.

'' म्हणजे ...'' मॅट्रेना म्हणाली, '' 'आपण आपल्या आईबापांखेरीज जगू शकतो, पण देवाच्या सोबतीशिवाय जगू नाही शकत,' अशी म्हण आहे, ती खरीच म्हणायची ! ''

अशा बऱ्याच गप्पा झाल्या, आणि ती बाई शेवटी जायला उठली.आणि सायमननं तिला दारापर्यंत पोचवलं, इतक्यात ती खोली प्रकाशानं उजळून निघाली, त्यांनी मायकेलकडं पाहिलं, तर तो आपल्या गुडघ्यांवर हातांची मिठी मारून बसला होता. स्मितहास्य करत त्यानं वरच्या दिशेला पाहिलं, आणि त्याच्याभोवती प्रकाशाचं तेजोवलय फाकलं.

□

त्याच्यापाशी जाऊन सायमननं विचारलं, " काय प्रकार आहे हा, मायकेल ?"

मायकेल उठून उभा राहिला आणि आपलं काम त्यानं बाजूला ठेवून दिलं. मग आपल्या अंगावरचा ॲप्रन काढून, त्यानं सायमनला आणि त्याच्या बायकोला मान लववून अभिवादन केलं, आणि म्हटलं, " मालक, मालकीणबाई, निरोप घेतो मी तुमचा आता. देवानं मला क्षमा केलीय्, तुम्हीसुद्धा मला क्षमा करायला हवी. "

आणि त्या चांभार पतीपत्नीच्या लक्षात आलं की, ते तेज मायकेलच्या अंगातून फाकलय्. त्याबरोबर उठून मायकेलला लवून अभिवादन करीत सायमन म्हणाला, " मायकेल, तू कुणी साधासुधा माणूस नाही आहेस, हे मी समजून चुकलोय्. तसंच तुला ठेवून घ्यायला मी समर्थ नाही, किंवा तुला कसले प्रश्न मी विचारणंही योग्य होणार नाही. तरी पण मला एकच गोष्ट सांग – तू मला आढळलास आणि मी तुला माझ्या घरी आणलं, तेव्हा तू एवढा खिन्न का होतास, ? तसंच माझ्या मॅट्रनानं पहिल्या रात्री तुला जेवायला घातलं, तेव्हा तू स्मितहास्य का केलंस ? आणि तेव्हापासून तुझी काया उजळायला लागली, हे कसं ? त्यानतंर, त्या बडया गृहस्थानं येऊन बूट बनवायला सांगितलं, तेव्हा पुन्हा - दुसऱ्यांदा तू स्मितहास्य केलंस. त्यावेळेपासून तू आणखी उजळून निघालास. आणि आता, ती बाई त्या मुलांना बूट बनवून घ्यायला म्हणून घेऊन आली, तेव्हा तू तिसऱ्यांदा मंदहास्य केलंस ? "आणि त्याबरोबरच तुझी काया भलतीच तेजस्वी बनली. तर मला सांग मायकेल, हा प्रकाश कुठून, कसा आला, आणि तीन खेपांना तू मंदहास्य का केलंस ? "

त्यावर मायकेल उत्तरला," देवानं मला शासन केलं होतं, तरी

त्यानं आता मला क्षमा केलीय् म्हणून माझ्या अंगातून प्रकाश फाकतोय्. तीन दैवी धडे शिकायला देवानं धाडलं होतं मला. म्हणून त्या तीन खेपांना मी मंदस्मित केलं. ते धडे शिकलोय् मी आता. तुझ्या बायकोनं माझ्यावर करुणा केली, तेव्हा मी पहिला धडा शिकलो, आणि पहिल्यांदा मंदसा हसलो. पुढं त्या बड्या गृहस्थानं बूट बनवायला सांगितले, तेव्हा दुसरा दैवी धडा शिकलो, आणि दुसऱ्यांदा स्मित केलं. त्यानंतर अगदी आत्ता, त्या मुलांना मी पाहिलं तेव्हा तिसरा दैवी धडा शिकलो, अन् मी तिसऱ्यांदा मंद हसलो.''

सायमननं विचारलं, '' पण मला असं सांग, मायकेल, देवानं तुला शिक्षा का केली, आणि हे दैवी धडे कोणते ?— हो ! मग मलाही शिकता येतील ते. ''

त्यावर मायकेल उत्तरला,'' मी आज्ञा पाळली नाही, म्हणून शासन केलं मला देवानं. स्वर्गात देवदूत होतो मी. एकदा देवानं एका स्त्रीचा आत्मा घेऊन यायला पाठवलं. तसा मी उड्डाण करून पृथ्वीवर आलो, तर आजारी पडलेली एक स्त्री मी पाहिली. नुकताच तिनं जुळ्या मुलींना जन्म दिला होता. आपल्या आईलगत त्यांची दुबळी हालचाल चालली होती. त्यांना छातीशी घेऊन दूध पाजण्याएवढं त्राण तिच्यात नव्हतं. मला पहाताच ती स्त्री समजून चुकली की तिचा आत्मा घेऊन जाण्यासाठी देवानं मला धाडलंय्. त्याबरोबर तिच्या डोळ्यांतून घळघळ आसवं झरू लागली, आणि रडतच ती मला म्हणाली, '' देवदूता, माझ्या नवऱ्याचं नुकतंच दफन केलंय्. जंगलातलं एक झाड अंगावर कोसळून जीव गेला त्याचा. माझ्या दुर्दैवी पोरक्या अर्भकांचं संगोपन करील अशी बहीण, चुलती, आई, आजी, — कुण्णी कुण्णी नात्याचं नाही माझ्या. म्हणून म्हणते – माझा दुबळा हतभागी जीव इतक्यात घेऊन जाऊ नको रे ! ही अर्भकं आपल्या पायांवर उभी राहितोवर त्यांचं संगोपन, लालनपालन करण्यापुरती मुभा दे मला.

बापही नाही अन् आईही नाही, अशी अर्भकं जगतील कशी, अन् वाढतील कशी ?' आणि मी त्या आईचं ऐकलं. एक मूल मी तिच्या छातीवर ठेवलं, तर दुसरं तिच्या हातांत दिलं. एवढं करून मी वर स्वर्गात देवाकडं गेलो.

'' उडत देवापाशी जाऊन त्याला म्हणालो,'' त्या दुर्दैवी आईचा आत्मा घेऊन येणं शक्य नाही मला. बाप झाड पडून ठार झाला, तर आईनं जुळ्या मुलांना जन्म दिलाय्. आपल्या कुडीतून जीव घेऊन न जाण्याबद्दल मला विनवीत ती म्हणाली,' माझी अर्भकं आपल्या पायांवर उभी राहीपर्यंत त्यांचं संगोपन, पालनपोषण करण्याची तेवढी मुभा दे मला. बापही नाही अन् आईही नाही, अशी अर्भकं जगतील कशी अन् वाढतील कशी ?' आणि म्हणून त्या दुर्दैवी आईचा आत्मा हिरावून घेतला नाही मी. '' तेव्हा देवानं मला निक्षून बजावलं, '' जा आणि त्या आईचा आत्मा आणून इथं सादर कर. तीन धडे शिकायला हवेत तुला. माणसांना काय दिलेलं आहे, माणसांना काय दिलेलं नाही, आणि माणसं कशावर जगतात ह्या गोष्टी तू शिकलास म्हणजे तू परत स्वर्गात येशील. '' मग मी परत उड्डाण करुन पृथ्वीवर आलो आणि त्या स्त्रीचा आत्मा काढून घेतला. ती अर्भकं तिच्या छातीवरून खाली पडली. तो मृतदेह बिछान्यावर मागल्यामागं पडला, तेव्हा त्यानं दोहोंतल्या एका अर्भकावर दाब दिला, अन् त्याचा पाय मोडला. मी त्या गावावरून उडालो, तो आत्मा घेऊन देवाकडं निघालो. तेवढ्यात थंडगार वाऱ्याच्या झोतानं मला गाठलं, माझे पंख खाली गळून पडले, आणि तो आत्मा एकटाच देवाकडं गेला. मी मात्र पृथ्वीवर रस्त्यालगत पडलो. ''

□

ज्याला आपण कपडे ल्यायला दिले, जेवू घातलं, आणि जो

आपल्या संगती राहिला, तो कोण होता ते आता सायमन आणि मॅट्रेना यांना कळून चुकलं. काहीशा धास्तीनं आणि काहीशा हर्षानं त्यांना रडू आलं. तेवढयात तो देवदूत म्हणाला:, '' त्या उघड्या मळ्यात मी एकटा अन् उघडाबोडका होतो. माणसाच्या गरजा काय असतात याची कल्पना त्याआधी मला कधीही नव्हती. भूक, थंडी, आणि माणूस असणं म्हणजे काय, याची कल्पना पूर्वी कधी नव्हती. मला अधिकाधिक भूक लागू लागली, मी गारठून जाऊ लागलो, आणि अशा स्थितीत काय करावं तेच मला सुचेना. मी आजूबाजूला पाहिलं, तर त्याच मळ्यात, देवासाठी उभारलेलं एक छोटंसं मंदिर माझ्या नजरेस पडलं. त्या देवालयाकडं मी गेलो. खरं तर त्यात निवारा घ्यायचा होता मला. पण ते देवालय कडी – कुलूप लावून बंद केलेलं होतं, आत जायला वावच नव्हता. तेव्हा, वाऱ्यापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी मी त्या देवालयाच्या आडोशाला बसकण मारली.

दिवस मावळत होता. माझी भूक वाढली, मी गारठू लागलो, आणि वेदनांनी त्रस्त झालो. तेवढ्यात एकाएकी, त्या बाजूला येणाऱ्या कुणातरी माणसाची चाहूल ऐकू आली मला. त्यानं हातात बूट धरले होतं, आणि तो स्वत:शीच बडबडत होता, माणूस असणं कसं असतं याची जाणीव होत असताना, पहिल्यांदाच हा माणसाचा प्रत्यक्ष चेहेरा माझ्या दृष्टीस पडला होता. तो चेहेरा पाहून मी एवढा भयभीत झालो, की, माझं तोंड मी झटकन् दुसरीकडं वळवलं. त्याची स्वत:शी चाललेली बडबड मात्र माझ्या कानी पडत होती. थंडीच्या गारठ्यात आपल्या शरीराचा बचाव करणार कसा, आणि आपल्या बायकोमुलांची तजवीज कशी करणार? - असे प्रश्न तो स्वत:लाच विचारत होता. त्याचं बोलणं ऐकून माझ्या मनात विचार आला, '' इथं मी गारठ्यानं अन् भुकेनं त्रस्त झालोय् पण हा माणूस काही उपयोगी पडणार नाही मला. कारण, थंडीपासून रक्षण करण्यासाठी स्वत:ला कपडे कसे पैदा

करायचे, आणि आपल्या कुटुंबाची ब्रेडची तजवीज कशी करायची, याचाच विचार पडलाय् याला.

" या माणसानं मला पाहिलं अन् तो गडबडला. मग त्याला जास्तच भीतीनं पछाडलं, आणि तो लगबगीनं पुढं चालू लागला. मी हताश झालो. तेवढ्यात, तो माणूस मागं वळल्याची चाहूल मी एकाएकी ऐकली. मी त्याच्याकडं पाहिलं, पण थोड्या वेळापूर्वी पाहिलेल्या माणसाशी याचं साम्य मला आढळेना. त्यावेळी त्याच्या चेहेऱ्यावर मृत्यूची अवकळा होती, पण आता अचानक त्याच्यात जिवंतपणा संचारलेला आढळला, आणि त्याच्या चेहेऱ्यात मला देवाचं दर्शन घडलं. तो माझ्यापाशी आला, मला त्यानं कपडे ल्यायला दिले, आणि आपल्या बरोबरच घेऊन मला त्यानं आपल्या घरी नेलं.

" मी त्याच्या घरात प्रवेश केला. त्याची बायको आम्हाला सामोरी आली आणि बोलायला लागली. ही स्त्री तिचा नवरा प्रथम वागला होता, त्याहीपेक्षा अधिक भयानक वाटली. तिच्या मुखातून मृत्यूचं पिशाच्च बरळत होतं. त्यामुळं तिच्या भोवतालच्या मृत्यूनं ग्रासलेल्या हवेत मला श्वास घेणंही मुष्कील झालं. मला गारव्यात हाकून द्यायचा तिचा मानस होता. आणि मी मनातून जाणून होतो, की, तिनं माझी हकालपट्टी केली, तर खुद्द तिचं मरण ओढवणार ! तेवढ्यात अचानक तिच्या नवऱ्यानं तिला देवाची आठवण करून दिली. त्याबरोबर त्या बाईत एकाएकी प्रचंड बदल घडून आला. आणि मग तिनं मला जेवायला घातलं, तेव्हा तिनं माझ्याकडं पाहिलं. अन् मी तिच्याकडं पाहिलं. तर तिच्यावरचा मृत्यूचा वचक आता उरला नव्हता. तिच्यात जीवन संचारलं होतं. तिच्यात मला देवाचं दर्शन घडलं. "

" तत्काळ मला देवाचा पहिला धडा आठवला, ' माणसांना काय दिलेलं आहे, हे तू शिकशील ! ' तेव्हा मला कळून चुकलं की, माणसांना माया दिलेली असून ती त्यांच्या हृदयांत वास करते.

वचन दिल्याप्रमाणं एकेक गोष्ट देव दृष्टोत्पत्तीस आणून देऊ लागलाय्. हे पाहून मी हरखून गेलो. आणि पहिल्यांदा स्मितहास्य केलं. तरीपण सगळ्या गोष्टी समजण्याची कुवत अजून माझ्यात नव्हती. ' माणसांना काय दिलेलं नाही. ' तसचं ' माणसं जगतात कशावर. ' या गोष्टींचा बोध अजून मला झाला नव्हता.

" तुमच्याबरोबर मी राहू लागलो, आणि असंच एक वर्ष उलटलं. मग तो बडा गृहस्थ आला आणि त्यानं स्वत:साठी बूट बनवायला सांगितले. बूट — वर्षभर टिकतील असे, आणि उसवणार किंवा फाटणार नाहीत असे. त्यावेळी मी त्याच्याकडं पाहिलं, तर त्याच्या पाठीमागं अचानक मला माझा पूर्वीचा सहकारी — यमदूत दिसला, मलाच तेवढा तो दूत दिसला. पण मी त्याला ओळखलं, मी हेही जाणून चुकलो की, सूर्य मावळायच्या आत त्या बड्या श्रीमंत माणसाचा आत्मा हा दूत घेऊन जाणार ! त्यावेळी मी मनाशी म्हटलं : ' हा माणूस वर्षभराचे संकल्प करतोय, पण आज रात्र पडण्यापूर्वीच आपण मरणार याची याला कल्पनासुद्धा नाही. ' यावेळी, देवानं सांगितलेला दुसरा धडा मला आठवला : ' माणसांना काय दिलेलं नाही, हे तू शिकशील !' मानवजातीला काय दिलं आहे हे मी आधीच जाणलं होतं. आता मनुष्यजातीला काय दिलेलं नाही हे मी जाणलं. आपल्या गरजा कोणत्या आहेत, हे ओळखण्याचं ज्ञान माणसांना दिलेलं नाही. आणि म्हणून यावेळी मी दुसऱ्यांदा स्मित केलं. माझा सहकारी दूत मला दिसला, आणि देवानं दुसरा धडा माझ्या दृष्टोत्पत्तीस आणून दिला म्हणून मला हर्ष झाला.

" तरीसुद्धा सर्व गोष्टी जाणण्याचं सामर्थ्य अजून माझ्यात नव्हतं. माणसं कशावर जगतात याचा बोध अजून मला झालेला नव्हता. आणि हा शेवटचा धडा देव माझ्या दृष्टोत्पत्तीस आणून देईपर्यंत मी वाट बघत राहिलो. मग माझ्या इथल्या सहाव्या वर्षी त्या जुळ्या मुलांना घेऊन

ती बाई आली. त्या मुलांना मी ओळखत होतो. त्यांना जिवंत ठेवण्यात आलं आहे, हे मी ओळखलं. हे समजून चुकताच मी मनाशी म्हणालो :
' आपल्या मुलांना वाचवण्यासाठी आपल्याला काही काळ जगू द्यावं, अशी विनवणी त्या आईनं मला केली होती. मीही तिचं म्हणणं बरोबर आहे, असं मानलं. बाप किंवा आईच्या अभावी मुलं जगणं अशक्य आहे, असं मलाही वाटलं. पण अहो आश्चर्यम् ! एका परक्या बाईनं त्यांचं पालनपोषण करून त्यांना वाढवलेलं दिसतंय् की ! ' आणि दुसऱ्याच्या मुलांसाठी त्या बाईनं जेव्हा आनंदाश्रू ढाळले, तेव्हा तिच्यातल्या जागृत देवाचं दर्शन मला घडलं. माणसं कशावर जगतात, याचा साक्षात्कार मला झाला; देवानं मला शेवटचा धडा दृष्टोत्पत्तीस आणून दिला, अन् मला क्षमा केली, हे मी जाणलं, तेव्हा मी तिसऱ्यांदा स्मितहास्य केलं. ''

आणि हां – हां म्हणता त्या देवदूताच्या अंगावरचे कपडे गळून पडले, आणि मानवाचे डोळे दिपवून टाकणारं प्रकाशमय वस्त्र त्याच्या अंगावर चढलं. आता तो अशा काही भयानकपणं बोलू लागला की, त्याचा स्वर खुद्द त्याच्यापासून न येता स्वर्गातून येतोय्, असं वाटत होतं. तो देवदूत म्हणाला, '' माणूस स्वत:पुरती काळजी करून जगत नाही, तर इतरांवर प्रेम करून जगतो, याचा मला बोध झाला. आपली मुलं जगण्यासाठी कोणत्या गोष्टीची जरुरी आहे, हे जाणण्याचं ज्ञान आईला दिलेलं नाही. तसंच आपल्याला कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, हे समजण्याचं ज्ञान त्या श्रीमंत गृहस्थाला दिलेलं नाही. आणि संध्याकाळी आपल्या जिवंत देहाला बुटांची गरज पडेल, की आपल्या मृत देहासाठी स्लिपर्स लागतील हे जाणण्याचं ज्ञान कोणत्याही माणसाला अवगत करून दिलेलं नाही.

'' माणूस म्हणून मी जेव्हा पृथ्वीवर येऊन दाखल झालो, तेव्हा माझी काळजी करून जगलो नाही मी; तर एका वाटसरूच्या अन्

त्याच्या बायकोच्या अंत:करणातल्या मायेनं. आणि माझ्याबद्दल दाखवलेल्या चांगुलपणानं अन् करुणेनं मला तगवलं. ती पोरकी अर्भकं जगली, ती त्यांनी स्वत:बद्दल कोणती काळजी घेतली म्हणून नव्हे, तर जी त्यांच्याशी चांगुलपणानं अन् दयाळूपणं वागली, त्या एका परक्या बाईच्या अंत:करणातील ममतेच्या बळावर. एकूण सर्वच माणसं, स्वत:पुरती काळजी केल्यानं नव्हे, तर इतरांना त्यांच्याबद्दल असलेल्या मायाममतेवर जगतात.

" देव माणसांना जीवन देतो अन् त्यांनी जगावं अशी इच्छा बाळगतो, हे मला आधीच ठाऊक होतं. पण आता मला कितीतरी जास्त गोष्टी समजून चुकल्या आहेत. मी जाणलंय् की, माणसांनी एकमेकांपासून अलग राहून जगावं, अशी देवाची इच्छा नाही. म्हणूनच त्यांच्यातला प्रत्येकजण एकटेपणानं राहिल्यास, त्याला कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, याचं ज्ञान त्यानं त्यांना अवगत करून दिलेलं नाही. त्यांनी संयुक्तपणं एकत्र रहावं, अशी त्याची इच्छा आहे, आणि म्हणून, एकमेकांच्या सुखासाठी ते उपकारक ठरणारं आहे, ही गोष्ट त्यानं त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आणून दिलेली आहे.

" मला आता हे कळून चुकलयं की, लोक केवळ आपलीच काळजी घेतात, तेव्हा ते जगत आहेत, असं फक्त दिसतं. पण इतरांवर प्रेम करणारेच खरंखुरं जीवन जगतात. जो प्रेमळ असतो त्याच्या ठिकाणी देव वास करतो, आणि तो देवाशी एकरूप होतो. कारण देव म्हणजेच प्रेम. " एवढं बोलून देवदूत अंतर्धान पावला.

सायमन भानावर आला, तेव्हा घरात त्याच्या कुटुंबियांशिवाय कुणीही नसल्याचं त्याला आढळून आलं.

★ ★ ★

२ कक्षेबाहेर ...

मागल्या खेपेला गावात आल्यावेळी कॉर्नी व्हॅसिलिव्हचं वय पन्नाशीवर होतं. पण एवढं असून त्याच्या केसांच्या झुलपांत शपथेला एकही पांढरा केस नसता सापडला. त्याची काळीभोर दाढी मात्र कानशिलाच्या बाजूंनी धूसर होत आली होती थोडी ! त्याच्या तुळतुळीत चेहऱ्यावर तांबूस तेज झळकत होतं, मानेचा कप्पा रुंद अन् मजबूत होता, आणि त्याच्या एकदंर देहयष्टीला एकप्रकारच्या शहरी, सुखासीन जीवनाची चमक मारत होती.

लष्करातील नोकरी संपवून, वीस वर्षांपूर्वी, परत येताना कॉर्नीनं बराच पैसा कमावून आणला होता, आल्यावर प्रथमत:च त्यानं एक दुकान उघडलं होतं. पण पुढं लौकरच दुकानाचा धंदा सोडून तो गुरांच्या धंद्यात पडला. चेकास गावाहून आणलेली गुरं मॉस्को शहरात नेऊन विकणं हाच त्याचा धंदा.

गयी या खेड्यातील, लोखंडी छपराच्या त्याच्या दगडी घरात त्याची म्हातारी आई, तरुण–सुंदर बायको आणि दोन मुलं (मुलगा नि मुलगी); त्याचप्रमाणं पंधरा वर्षांचा एक मुका, पोरका पुतण्या अन् एक मजूर ... असे राहत असत.

कॉर्नीचं दोनदा लग्न झालं होतं. त्याची पहिली बायको अशक्त अन् सदाची दुखणाईत असायची. मूलबाळ न होताच ती वारली. मग काही वर्षं विधुरावस्थेत घालवल्यावर, जवळच्याच खेड्यातल्या एका गरीब विधवेच्या बांधेसूद, देखण्या मुलीशी त्यानं पुनर्विवाह केला.

अखेर-अखेरच्या सौद्यात कॉर्नीचा बराच लाग साधला. जवळजवळ तीनेक हजार रुबल (चारेक हजार रुपये) मिळवले त्यानं. आणि तेवढ्यातच, अगदी हलाखीला आलेल्या एका गरजवंत जमीनदारानं, आपल्या जंगलाचा काही भाग स्वस्तात विक्रीस काढला आहे, असं एका शेजाऱ्याकडून त्याला कळलं. तर ते जंगल खरेदी करून, इमारतीच्या लाकडांचा धंदा करण्याचं त्यानं ठरवलं. कारण -शिपाईपेशा पत्करण्याआधी, इमारतीच्या लाकडांच्या एका व्यापाऱ्याकडं दुय्यम कारकून म्हणून त्यानं काम केलं होतं. म्हणून साहजिकच त्या धंद्याची त्याला चांगली माहिती झालेली होती.

आपल्या गयी गावी जाण्यासाठी तो जवळच्या रेल्वे स्टेशनावर उतरला. तिथं त्याला त्याच्याच गावचा कुस्मा नावाचा टांगेवाला भेटला. आपल्या हाडकुळ्या, केसाळ घोड्याच्या पोटापुरतं तरी भाडं मिळेल, या आशेनं, प्रत्येक आगगाडी गाठण्यासाठी कुस्मा गयीहून तिथंवर येई. कुस्मा गरीब असल्यानं पैसेवाल्या लोकांबद्दल त्याला थोडाफार मत्सर, तसाच तिरस्कार वाटायचा. त्यातून कॉर्नीवर तर त्याचा विशेष दात. आपल्या मनाशी का होईना, पण उद्धटपणं तो त्याला ' कॉर्नुष्का ' म्हणायचा.

अंगात एक आखूड कोट, त्यावर मेंढीच्या कातडीचा लांब वरकोट, आणि हातात एक बॅग ...अशा थाटात, आपलं गोलसर, फुगीर लठ्ठ पोट सावरीत, कॉर्नी स्टेशनच्या पायऱ्यांपाशी आला. आणि गाल फुगवून त्यानं एकदा सभोवार नजर फिरवली.

सकाळची वेळ होती. हवा सुंदर होती. तिच्यात थोडा गारवासुद्धा वाटत होता.

' काय विचित्र हवा आहे तरी !' असं कॉर्नी स्वत:शीच उद्‌गारत असतानाच त्यानं कुस्माला हेरलं. त्याच्याकडे वळत कॉर्नी त्याला म्हणाला : " काय कुस्मा ? चलतोस ना ? – आं ? "

'' एक रुबल पडेल बघा, साब ! ''

'' छट्‌ ! पाऊण रुबल म्हणजे खूप झाला. काय रे ?- आं ? ''

'' वा: साब ! खूप ! तुमच्यासारख्या पैसेवाल्यानं माझ्यासारख्या गरिबाचा पाव रुबल कापायला बघावं अं ? ...छान ! फक्कड. ! ''

'' बऽरं बुवाऽऽ !... ठीक..ठीक ! चल तर मग. '' असं म्हणत, आपला बाडबिस्तरा घेऊन कॉर्नी टांग्यात चढला. ऐसपैस बसला.

कुस्मा आपल्या बैठकीवर सावरून बसला.

'' हां !..चल्‌ आता लौकर, '' कॉर्नी ऊद्‌गारला.

स्टेशनलगतचे खाचखळगे ओलांडून टांगा सपाटशा सडकेवर आला.

'' काय कुस्मा ? गावात कसं काय – एकंदरीत ठीक चाललंय्‌ ना ? ... आमचं एक राहू द्या ...पण तुझी हालहवाल ठीक ना ? ''

'' बऱ्याची वार्ता अशी फारच थोडी, बघा ! ''

'' आमची म्हातारी काय म्हणते ? आहे ना अजून जीव धरून ? ''

'' हो, तर! वा ! ..त्या दिवशी चर्चमधे बघितली की मी तिला. म्हातारी खुशाल नि तुमची घरधनीण बी. ती तर मारे जोसात हाय्‌ तो नईन गडी ठेवल्यापासनं. ''

आणि एवढं बोलून कुस्मा अशा विलक्षण तऱ्हेनं, फिदीफिदी हसला, की ...कॉर्नीला ते थोडं चमत्कारिकच वाटलं.

'' हा कोण रे नवीन गडी, कुस्मा ? आमचा पीटर कुठं गेला मग ? ...ऑ ? ''

'' पीटर शीक हाय्‌, न्हवं का ? तेव्हापास्नं इव्हस्टिग्नी बेली ठेवलाय्‌ तिनं – आपलं म्हायेरगाव ते कामेनूका की काय तिथनं

आणून.

घरी असतेवेळी, बायकाबायकांत इव्हॅन्स्टिग्रीविषयी चाललेल्या गप्पा कॉर्नी नेहमी ऐकायचा.

" हां ! ...असं आहे बघा, साब ! " ..कुस्मा म्हणाला. " ह्या बाईमाणसांना लईलईच मोकाटपणा गवसलाय् बघा आताशा."

" अस्सं ...अस्सं ! ...अशी वार्ता आहे तर एकूण ! ...पण काय रे, तुझा हा घोडा आता बराच म्हातारा होत चाललाय् नाही ?" मुद्दाम विषयाला कलाटणी देण्याच्या दृष्टीनं कॉर्नी म्हणाला.

" मीच झालोय् म्हातारा. मग माझा घोडा तरी तरणाताठा कुठून असायला ? " त्या लिपड्या जनावरावर चाबकाचा एक फटकारा हाणीत कुस्मा उत्तरला.

अर्ध्याअधिक वाटेनंतर त्यांना एका टप्प्यावर एक हॉटेलवजा खानावळ लागली. कुस्माला थांबायला सांगून, कॉर्नी खाली उतरला अन् आत शिरला.

तेवढ्यात ...घोड्याला पाण्याच्या डोणीजवळ नेऊन, त्याच्यावरील सरंजाम नीटनेटका करण्यात कुस्मा गढून गेला. पण त्याचं ते वागणं वरवरचं होतं. खरं तर त्याचे कान कॉर्नीकडे लागले होते. कॉर्नीकडे तो सरळसरळ बघत नव्हता; तरीपण ...एखादं पेय घेण्यासाठी कॉर्नी आपल्याला बोलावील, अशी आशा त्याला राहूनराहून वाटत होती.

" अरे कुस्मा, चल ये की ...एखादं ग्लास घे. " उंबऱ्यावर येऊन कॉर्नीनं हाक दिली.

" आं ? ...हं ! ..राहूद्या – राहूद्या ...अं ...हा आलोच न्हवं का ! ..." आपल्याला विशेषसं अगत्य नसल्याची बतावणी करीत, कुस्मा पुटपुटला, आणि कॉर्नीच्या विनंतीला मान देण्याच्या मिषानं खानावळीत शिरला.

व्होड्काची एक बाटली मागवून कॉर्नीनं ती कुस्माच्या पुढ्यात

सारली. सकाळपासून पोटात काहीएक गेलं नसल्यानं, त्या कडक दारूच्या पहिल्याच ग्लासासरशी कुस्मावर नशेचा अंमल चढू लागला. आणि कॉर्नीकडे सरकत – सरकत, गावातल्या बोलबाल्यासंबंधी, कॉर्नीच्या कानात तो काहीबाही कुजबुजू लागला. अखेर – अखेर त्याचं बोलणं एवढ्यावर आलं, की ...कॉर्नीची बायको मार्फी ही, आपला पूर्वीचा प्रियकर गडी म्हणून ठेवून, त्याच्या संगतीत राहत असल्याचंही तो सांगून चुकला.

" लईऽऽ वाईट वाटतं बघा ...मला ...साब ! खरं म्हणजे तुमच्याबद्दल. " कुस्मा झिंगत – झिंगत सांगू लागला, " पण ...हे चिन्ह ...काही ...बरं न्हवं ! ...लोक तुम्हांला फिदिफिदी हसत्यात, तवा मी त्यांना म्हनतो ...' बाबांनो, अंमळ थोडका दम धरा. स्वता त्याला येऊद्या घरला !' ...असं हाय् बघा एकूण ...साब ! "

पाणीदार डोळ्यांवर कडसरलेल्या काळ्याभोर भुवया आकुंचित करून कॉर्नी कुस्माचं बोलणं शांतपणं ऐकत होता. मग आपलं पेय पिऊन संपवीत कॉर्नी त्याला म्हणाला : " घोड्याला अजून पाणी पाजायचंय् का तुला ? नाहीतर चल, निघूया आपण. "

आणि खानावळवाल्याचं बिल चुकतं करून कॉर्नी रस्त्यावर उतरला.

तिन्ही सांजा होता – होता कॉर्नी आपल्या घरी पोचला. रस्ताभर इव्हिस्टिग्नी बेलीविषयी त्याचे सारखे विचार चालले होते, तर तोच त्याला पहिल्यांदा, दारातच भेटला. कॉर्नीनं त्याला सहज हटकल्यासारखं केलं. इव्हस्टिग्नी घाईघाईनं बाजूला निघून गेला. तरी, गालफडं बसलेला त्याचा खप्पड चेहरा अन् केस पांढरे झालेल्या पापण्या कॉर्नीच्या नजरेतून निसटल्या नाहीत. चिंतातुरतेनं आपली मान खाली लववून तो जागच्याजागी क्षणभर स्तब्ध उभा राहिला. कुस्माचं बोलणं आठवून तो आपल्याशीच पुटपुटला: म्हातारडा लुच्चा दिसतोय् ! काहीतरीच बहकला वाटतं. पण ...नाही ...ते काही नाही. खरं काय

असेल, कुणास ठाऊक? ...खऱ्याखोट्याचा काय तो तलास लावायला हवा, एवढं खरं!...

कुस्मा अजून आपल्या टांग्यापाशी, घोड्याजवळच उभा होता. पलीकडं उभ्या असलेल्या इव्हस्टिग्नीकडं पाहिल्यासारखं करून त्यानं हळूच डोळे मिचकावले.

कॉर्नीनं इव्हस्टिग्नीकडं पुन्हा वळून विचारलं: "आमच्या इथं राहतोस वाटतं तू? ...अं? ...असं!"

"कुठंही झालं तरी काम करायचं," इव्हस्टिग्नी काहीशा बेफिकरीपणानंच उत्तरला.

"खोलीत शेगडी पेटवून ठेवलीय् ना रे?"

"हो! आहेत तर! माटवेव्हा तिथंच आहे की!" बेली बोलला.

कॉर्नी पायऱ्या चढून वर गेला. इतक्यात त्याचा आवाज ऐकून मार्फी माजघरापर्यंत आली होती. नवऱ्याकडे दृष्टी जाताच तिच्या मुखावर एकदम लाली उसळली. आणि नेहमीपेक्षा काहीशा अस्वभाविक प्रेमळपणानं त्याचं स्वागत करायला ती झटकन् पुढं झाली.

"आता– आताशा तर... वाट पाहायचं सोडूनच दिलं होतं आम्ही..." कॉर्नीच्या मागून खोलीत जात ती म्हणाली.

"अस्सं... अस्सं! ...बरं... पण... बाकी... दिवस मजेत गेले ना एकंदरीत? कसं काय चाललं होतं?"

"त्यात काय नवीन व्हायचंय? पूर्वीसारखंच चाललाय्!"

"आणि झगा ओढओढून सारखं दूध मागत असलेल्या आपल्या दोन वर्षांच्या मुलीला उचलून घेऊन, ती लांब– लांब पावलं टाकीत झपाझप माजघरात निघून गेली.

एवढ्यात फेल्टचा पातळ सपाता सरकावीत कॉर्नीची आई खोलीत आली. कॉर्नसारखेच त्याच्या आईचे डोळेही काळेभोर होते.

" मला भेटायला आलास होय ? ...देव तुझं बरं करो, बेटा ! " लटालटा कापत असलेली आपली मान डोलवीत ती म्हणाली.

कोणत्या कामानिमित्त आपल्याला घरी यावं लागलं, ते सारं त्यानं आपल्या आईला सांगितलं. तेवढ्यातच कुस्माची आठवण होऊन त्याचं भाडं चुकतं करायला तो लगेच बाहेर निघाला. त्यानं माजघराचा दरवाजा उघडला तोच – अगदी समोरच, अंगणाच्या दारात, मार्फी आणि इव्हस्टिग्नी, एकमेकांना अगदी खेटून बोलत उभी असल्याचं त्याला दिसलं. कॉर्नीला पाहताच इव्हस्टिग्नी लगेच अंगणापलीकडे सटकला, आणि मार्फी ...काहीतरी निमित्तानं दुसरीकडे वळली.

अगदी शांतपणं टांग्यातला आपला बाडबिस्तरा उचलून घेत, कॉर्नीनं, चहा पिण्यासाठी कुस्माला हाक मारली, आणि तो दिवाणखान्यात आला. चहा घेण्यापूर्वी, येताना बरोबर आणलेल्या जिनसा त्यानं वाटून दिल्या. आपल्या आईसाठी लोकरीची शाल, फेड्कासाठी चित्रांचं पुस्तक, आपल्या त्या मुक्या पुतण्यासाठी एक वास्कूट, आणि बायकोला चिटाचा कपडा ... अशा जिनसा त्यानं आणल्या होत्या.

चहा घेताना, कपाळावर आठ्या चढवून कॉर्नी अगदी शांत – स्तब्ध बसला होता. आपल्याला वास्कूट मिळाल्याच्या आनंदानं आपल्याशीच हर्षानं मुरडून सगळ्यांची करमणूक करणाऱ्या त्या मुक्या पुतण्याकडे दृष्टी जाताच मात्र, मधूनमधून उगाच कुठं हसत होता तेवढंच. त्या मुक्या मुलाचे आपले नाना तऱ्हेने चाळे चालले होते. ते वास्कूट पुन:पुन्हा दुमडायचं, उस्कटायचं, कुठं अंगात त्याची घाल–काढ करायची, तर कधी कॉर्नीकडं हसऱ्या डोळ्यांनी बघत, त्याच्या हाताचा मुका घ्यायचा. एकूण, आपल्याच हर्षानंदात तो मग्न होता.

चहा झाला. रात्रीची जेवणंपण होऊन चुकली. मग कॉर्नी आपल्या नेहमीच्या झोपायच्या खोलीत निघून गेला. (मार्फा अन् ती लहानगी मुलगी हीही त्याच खोलीत झोपत त्याच्याबरोबर.)

जेवणाच्या साहित्याची आवराआवर करण्यासाठी मार्फा अजून दिवाणखान्यातच होती. हातांची कोपरं टेबलावर टेकून कॉर्नी खोलीत अगदी एकटा – एकटाच बसून राहिला होता. बायकोविषयीचा त्याचा राग क्षणाक्षणानं वाढत चालला होता. विचारांनी डोक्यात माजवलेली वावटळ हुसकावून लावण्यासाठी, खिशातलं नोटबुक काढून, तो हिशेबाची जुळवाजुळवी करण्यात वेळ घालवू लागला

मधूनमधून दरवाज्याकडे दृष्टी वळवून तो दिवाणखान्यातल्या आवाजाचा कानोसा घेई !...

बाजूच्या खोलीचा दरवाजा उघडून कुणीतरी माजघरात शिरल्याचा भास त्याला वारंवार होई. पण ...बायकोचा काही पत्ता नव्हता !...अखेर एकदाची तिची पावलं ऐकू आली त्याला. दार ढकलून उघडलं गेलं, आणि आपल्या चिमुकल्या मुलीला कडेवर घेऊन मार्फा आत आली.

मार्फाचा सतेज गुलाबी चेहरा विलोभनीय दिसत होता. डोईला लाल रुमाल गुंडाळलेला; आणि खांद्यावर ओढणीवजा सुटं वस्त्र पेहरलेलं.

" प्रवासाच्या दगदगीमुळं बराच शीण आला असेल, नाही का ? " – त्याच्या घुम्या – कुढ्या वृत्तीकडे लक्ष नसल्यागत ती स्मितपूर्वक म्हणाली.

डोळे एकदा वर करून पाहण्यापलीकडे कॉर्नी काहीच बोलला नाही. सारा हिशेब लिहून झाला होता, तरी तो आपण हिशेब लिहिण्यातच गढून गेलो आहोत, अशी बतावणी करीत होता.

" बराच उशीर होत आलाय् हं ! " असं म्हणून, त्या लहानग्या मुलीला खाली उतरून ठेवीत, ती पार्टिशनच्या पलीकडे निघून गेली.

बिछाना अंथरून ती मुलीला थोपटून निजवीत असल्याचं कॉर्नीला ऐकू येत होतं.

' लोक हसतात बघा तुम्हांला !'- कुस्माचे शब्द त्याला आठवले. 'बस् ! दम धर म्हणावं आता !...' प्रयासानं श्वासोच्छ्वास करीत तो आपल्याशीच पुटपुटला.

— मग हळूच उठून त्यानं पेन्सिलीचा तुकडा आपल्या वास्कुटाच्या खिशात ठेवला, आणि तो त्या पार्टिशनच्या दाराकडे वळला. ख्रिस्ताच्या तसबिरीसमोर उभी राहून त्याची बायको प्रार्थना म्हणत होती. तो दारातच तिष्ठत उभा राहिला. मान लववून, नम्रपणानं प्रार्थना गुणगुणत तीही बराच वेळपर्यंत तशीच उभी राहिली होती. त्याला वाटलं – प्रार्थना संपली असूनही, प्रार्थना करीत असल्याचं ती हेतुपुरस्सर ढोंग करीत आहे !...शेवटी ख्रिस्तापुढं गुडघे टेकून तिनं नमन केलं, आणि प्रार्थनेचे कसलेसे शब्द झटपट पुटपुटून ती त्याच्याकडे वळली.

" अगाशा झोपतेय्." लहानग्या मुलीकडे हस्तक्षेप करीत ती म्हणाली; आणि उदास, गंभीर मुद्रेनं त्या करकऱ्या पलंगावर जाऊन बसली.

" बरेच दिवस झाले वाटतं, इव्हस्टिग्नीला इथं येऊन ?" — दारातून आत शिरत कॉर्नीनं प्रश्न केला.

मार्फा आपल्या केसांच्या जाडजूड, लठ्ठ लडींशी चाळा करीत राहिली होती. एक लठ्ठशी लड हळुवारपणं आपल्या वक्षस्थळावर आणून, ती आपल्या नाजूक बोटांनी उसवण्यास तिनं सुरुवात केली. आणि हसऱ्या पण भेदक नजरेनं ती त्याच्याकडे रोखून पाहू लागली.

" इव्हस्टिग्नी ?..काही बरोबर नाही आठवत !...पण..मला वाटतं...काहीतरी दोनतीन आठवडे उलटले असतील !"

" त्याच्याच संगतीत राहायचीस ना तू इतके दिवस ? "

हातांतली केसांची लड तिनं झटकन् खाली टाकली; पुन्हा उचलून घेतली नि ती पहिल्यासारखी उसवत बसली.

" इव्हस्टिग्रीच्या संगतीत राहायचं ?..खरंच !...काय तरी बाई कल्पना ?" ' इव्हस्टिग्री ' हा शब्द एका विशिष्ट झंकारी स्वरात उच्चारीत ती उद्गारली. " काय तरी लोकांचं सांगणं एकेक !...कोण म्हणाला असं ?-"

" तुझ्याकडून जाब पाहिजे मला. खरं की नाही हे? बोल ! हातांच्या मुठी आवळत तो हुकमी स्वरात म्हणाला.

" छट् ! भलतंच काहीतरी !... बूट काढू का मी तुमचे ? "

" प्रश्नाचं उत्तर दे आधी माझ्या ! " कॉर्नी खेकसून बोलला.

" काय तरी बाई गहजब बिचाऱ्यावर !... कुणी सांगितलं हे तुम्हांला असलं भलतचं काहीतरी ? "

माजघरात मारे गुजगोष्टी कसल्या चालल्या होत्या मग, मघा त्याच्याशी ? "

" कुठल्या गुजगोष्टी ? अंगणातल्या टबवर नवीन झाकण टाक, एवढंच काय ते म्हणाले मी. उगाच कशाला छळता मला ? "

" बऽऽघ ! खरं – खरं सांग काय ते. नाहीतर जीव घेईन बघ. कुलटा !...नादान कुठली ! "

आणि झिंज्या धरून त्यानं तिला खेचलं. कसेबसे तिनं आपले केस सोडवून घेतले. कष्टानं – त्रासानं तिचा चेहरा पिळवटलेला, ओढलेला दिसत होता.

" माझा जीव घ्यायचाय् का तुम्हांला ? आजपर्यंत तरी असं काय बरं केलंय् म्हणा, तुम्ही माझं ?...असं हे जिणं घालवायचं तरी कुठंवर ? "

" कस्संऽऽ घालवायचंऽऽऽ ? "

तेच शब्द फिरून उच्चारीत तो पुन्हा तिच्याकडे वळला.

" केस कशाला ओढता माझे ?... कशाला नाही - नाही ती नावं ठेवून जाचता उगाच ?... खरं आहे तुमचं..."

बोलणं पुरं करायला तिला अवधी तरी कुठं उरू दिला त्यानं ? दंडाला धरून, पलंगावरून त्यानं तिला खाली खेचली, आणि तिच्या कपाळावर, कुशीवर व छातीवर एकामागून एक सारखे बुक्के मारण्याचा त्यानं सपाटा लावला. मारपीट करण्याबरोबरच त्याच्या रागाचंही प्रमाण वाढत होतं. ती किंचाळू लागली...आणि आवेशाच्या भरात त्याला प्रतिकार करून, त्याच्यापासून स्वत:ला सोडवून घेण्याचा निकराचा प्रयत्न करू लागली !...पण..पण तो मुळी तिला सैलच सोडत नव्हता. तेवढ्यात ती चिमुरडी पोर उठली नि थेट आईला जाऊन बिलगली.

" मम्माऽऽऽ ! " तीही ओरडू लागली.

कॉर्नीनं त्या पोरीला आईपासून ओढून घेतलं, आणि एखाद्या मांजराच्या पोरासारखं बकोटीला धरून, दूर कोनाड्यात भिरकावून दिलं. ते पोर क्षणभर काय किंचाळलं असेल तेवढंच ! त्याचा आवाज लगेच बंद पडला.

" चांडाळा !...राक्षसा ! ! ठार मारलंस त्या पोरीला तू ! "असं आवेशानं ओरडत, मुलीकडे जाण्याचा प्रयत्न मार्फा करू लागली. पण तिला पुन्हा पकडून तिच्या छातीवर त्यानं असा जोराचा ठोसा हाणला, की ती मागल्यामागंच कोसळून पडली. आणि आता तिला ओरडण्याचंही त्राण उरलं नाही, पोराप्रमाणं तिचीही ओरड बंद पडली. इतक्यात ते पोर फिरून रडू लागलं, अगदी श्वास घेण्यासाठीसुद्धा क्षणमात्र न थांबता ते सारखं किंचाळू लागलं.

तेवढ्यात कॉर्नीची म्हातारी आई आली. तिची मान सारखी लटालटा कापत होती, पांढरे केस पिंजारलेले होते, अन् अंगाभोवती तिनं शाल

गुंडाळलेली होती.

कॉर्नी किंवा मार्फा – कुणाकडेही ढुंकूनसुद्धा न पाहता ती सरळ त्या पोरीकडे – कोपऱ्यात गेली; अन् गालांवरून उष्ण–उष्ण अश्रू ओघळत असलेल्या त्या मुलीला तिनं उचलून घेतलं.

नुकतंच झोपेतून उठलेल्या माणसाप्रमाणं, गोंधळल्यासारखा सभोवार पाहत कॉर्नी उभा होता. त्याला धाप लागलेली होती. आपण कुठं आहोत नि आपण हे काय करून बसलो, याची त्याला बिलकुल शुद्ध, जाणीव असलेली दिसत नव्हती.

कण्हत–कुंथत, बाहीनं चेहऱ्यावरचं रक्त पुसून काढीत, मार्फानं आपलं डोकं वर उचललं...

" दुष्टा !..राक्षसा !!.. " ती सारखी ओरडत सुटली. " इव्हस्टिग्नीच्या संगतीत मी राहत आलेय् नि राहत आहेही पण, मार ! ठारही मार मला मेल्या हवं तरं !.. अगाशा पण त्याचीच पोरगी आहे !– तुझी नाही !" आवेशासरशी ती चटकन् बोलून गेली अन् कॉर्नीचा पुढचा ठोसा चुकवण्यासाठी तिनं आपला दंड तोंडासमोर आडवा धरला.

पण कॉर्नीला आता कसल्याच गोष्टीचं, काहीच भान नसल्याचं दिसत होतं. आपल्या सभोवती भकास नजरेनं पाहत तो निश्चल उभा होता.

" बघ – काय केलंस ते पोरीला !..हात की रे मोडून टाकलास तिचा. " सांध्यापासून सुटून, बाजूला अलगत लोंबकळत असलेला त्या पोरीचा हात दाखवीत, म्हातारी कळवळून बोलली.

कॉर्नी मुकाटपणं माजघराकडे वळला, अन् तिथून थेट बाहेर चालता झाला.

आभाळात अभ्रं दाटली होती. हवा मुंद होती. जिकडेतिकडे दंवही बरंच पडलं होतं. त्याच्या ऊबदार गालांवर अन् कपाळावर हिमतुषारांचा सारखा वर्षाव होऊ लागला. तो खाली, उंबऱ्यावर बसला अन् बाजूच्या

कठड्यावर पडलेलं बर्फ मुठी भरभरून तोंडात सारू लागला. आतल्या दरवाज्यापलीकडून मार्फाचं कण्हणं अन् त्या लहानग्या पोरीचं किंचाळणं ऐकू येत होतं. त्या खोलीचा दरवाजा उघडल्याचा आवाज त्याच्या कानी पडला. आणि त्या चिमुरडीला घेऊन माजघरातून दिवाणखान्यात जाणाऱ्या आपल्या आईची चाहूलही त्याला लागली. तो जागचा उठला अन् पुन्हा खोलीत गेला. दिव्याची ज्योत त्यानं खाली केली, तसा टेबलावरचा प्रकाश अंधुक झाला. तो खोलीत आल्याचं पाहून मार्फा अधिकच मोठ्यानं कण्हू लागली. पण... हुं–की–चूं, न करता कॉर्नीनं सावकाशपणे कपडे चढवले, आणि कपडे भरून ठेवलेली पलंगाखालची बॅग काढून सुतळीच्या दोरानं चांगली बांधली.

" एवढी मारपीट करण्याएवढा तुझा असा काय मोठा गुन्हा केला मी ? " — दु:खातिशयानं मार्फा उद्गारली.

काहीएक प्रत्युत्तर न करता, आपली बॅग उचलून कॉर्नी सरळ दरवाज्याकडे वळला.

" बदमाश !...राक्षस !...थांबच तू...कायदेशीर इलाज केल्यावाचून नाही सोडत तुला !... " काहीशा खुनशी स्वरात ती उद्गारली.

तोंडावाटे अवाक्षर न काढता कॉर्नीनं पायानंच दरवाजा उघडला, अन् तो परत इतक्या जोरानं आदळला, की त्या धक्क्यासरशी बाजूच्या भिंतीही काही क्षण हादरल्या.

दिवाणखान्यात जाऊन कॉर्नीनं आपल्या मुक्या पुतण्याला झोपेतून उठवलं अन् टांग्याला घोडा जुंपायला सांगितलं. अर्धामुर्धा जागा झालेला बिचारा तो पोर, दोन्ही हातांनी डोकं खाजवीत आपल्या चुलत्याकडे आश्चर्यानं बघतच राहिला. अखेर, आपल्याला सांगितलेल्या कामगिरीचा एकदाचा त्याला उमज पडला. त्यानं आपले गरम, उबदार बूट चढवले, आणि मेंढीच्या कातडीचा फाटकातुटका

कोट अंगात घालून, कंदील घेऊन तो अंगणात निघून गेला.

लहानशा टांग्यात बसून ते फाटकाबाहेरच्या रस्त्याला लागेतोवर चांगलंच उजाडलं.

आगगाडी सुटण्याच्या पाचच मिनिटं आधी ते स्टेशनात जाऊन पोचले. तो मुका पोरगा कॉर्नीकडं सारखा पाहत होता. कॉर्नीनं तिकीट काढलं अन् बॅग घेऊन तो गाडीत चढला. गाडी हालली... आणि ती नजरेच्या टप्प्याबाहेर सरकत असतानाच कॉर्नीनं मान हालवून त्या मुक्या पोराचा निरोप घेतला.

☆ ☆ ☆

मार्फाच्या तोंडाला तर दुखापती झालेल्या होत्याच; पण त्याशिवाय तिच्या दोन बरगड्या मोडून, डोक्याला पण जखम झाली होती.

— पण मार्फाची देहयष्टी मजबूत नि निरोगी असल्यानं ती लौकरच बरी झाली. एवढंच नव्हे, तर सहा महिन्यांच्या अवधीत तिच्या दुखापतींचा मागमूसही उरला नाही. ती पोरगी मात्र हातानं अधू ती अधूच राहिली जन्मभर. तिच्या हाताची एकदोन हाडं मोडल्यानं तो वाकडा झाला, तो कायमचाच.

' त्या ' दिवसापासून कॉर्नीचा मुळी पत्ताच नव्हता. एवढंच काय, पण तो मेला की जिवंत आहे, याचीपण दाद नव्हती कुणाला !...

[२]

वरील गोष्टीला सतरा वर्षं होऊन गेली होती. शरदऋतू ओसरत आला होता. सूर्य पश्चिम क्षितिजाकडे अधिकाधिक कडसरत होता. आकाशात ढग जमले होते. चार वाजण्याच्या सुमारासच अंधुकअंधुक दिसण्यापेक्षा अधिक उजेड दिसेनासा झाला होता. हळूहळू दिशा अंधारून जात होत्या. गुरांमेंढरांचे कळप डोंगरांमाळांवरून गावाकडे

परतत होते. आणि राखणीचं तेवढं आपलं काम ' बजावून गुराखी लोक निघून गेल्यानं आता गुरं घराकडे वळवून नेण्याचं काम साहजिकच बायकांमुलांवर येऊन पडलं होतं.

गुरामेंढ्यांचा असाच एक कळप शेतातून वर चढून, खाचाखळग्यांच्या अन् चिखलमातीच्या रस्त्यातून आंद्रेइव्हका या गावाकडे परतत होता.

त्या कळपाच्या थोडं पुढं, मोठाली टोपी घातलेला, अन् ठिगळलेला नि उन्हापावसात काळवंडलेला, शेतकऱ्याच्या थाटाचा डगला अंगावर चढवलेला एक म्हातारा चालला होता. त्याच्या पाठुंगळीला चामड्याची मोठाली पिशवी होती. त्याचे सारे केस पिकलेले होते, फक्त भुवयांच्या दाट केसांनाच काय ती काळसरपणाची थोडी छटा मारत होती. त्याचे फाटके जड बूट भिजून अगदी ओलेचिंब बनले होते. तरीसुद्धा त्या दलदलीतून, कष्टानं झालं तरी, तो चिकाटीनं चालला होता. दरेक पावलागणिक, हातातल्या दांडक्यावर भार घालून आपला देह कसाबसा सावरीत होता तो !.

गुरांचा तो कळप अगदी जवळ आला तसा, आपल्या दंडुक्यावर भार देऊन तो टेकीत, तो थांबला. ओचा खोवून, अंगावर जाडीभरडी शाल लपेटलेली आणि पायांत पुरुषी थाटाचे बूट घातलेली एक तरुण स्त्री गुरं घराकडे वळवण्याचं काम करीत होती. मागं - मागं रेंगाळणाऱ्या मेंढ्यांना सरळ वाटेनं पुढंपुढं दामटीत, घाईघाईनं धावत-पळत होती ती. त्या म्हाताऱ्याच्या अगदी जवळ येताच, थांबून तिनं त्याच्याकडे एकदा आपादमस्तक न्याहाळून पाहिलं.• अन् वयोचित मृदू स्वरात तिनं त्याला आस्थेनं हाक दिली. ———

" काय — कसं काय आजोबा ? "

" बरांय् !..ठीक !.. "म्हातारा उत्तरला.

" रात्र तर होत आली. आता उतरणार कुठं तुम्ही,

आजोबा ? '' तिनं आस्थापूर्वक विचारलं.

'' कुठं अन् काय !..इथंच कुठंतरी रात्र घालवायला हवी. थकून तर बराच गेलोय !.. '' घोगऱ्या स्वरात म्हातारा पुटपुटला.

'' हे बघा, मग असं करा ना तुम्ही, आजोबा !..आमच्या घरी जा. आं ? '' ती तरूण स्त्री प्रेमळपणानं म्हणाली. '' असे अगदी सरळ जा. ती तिसरी हवेली दिसतेय् ना ?..हां ! तीच आमची. माझ्या सासूबाई मोठ्या आनंदानं आसरा देतील तुम्हाला. पुष्कळदा येतात असे कितीतरी वाटसरू आमच्याकडं. ''

'' आं ?..ती तिसरी हवेली? वा:! ती तर झिनोव्हेव्जूची!'' भुंवया आकुंचित करीत तो म्हातारा उद्‌गारला.

'' तुम्हाला काय माहीत ? ''

'' मी राहिलेलो आहे मागं तिथं ! ''

तेवढ्यात त्या तरुणीचं थोडं दुर्लक्ष झाल्यामुळं एकदोन लंगड्या मेंढ्या मागं रेंगाळू लागल्या, तेव्हा डाव्या हातात चमत्कारिकपणं काठी घेऊन नि मोडक्या उजव्या हातानं रूमाल सावरीत ती त्या लंगड्या मेंढ्यांमागं पळत गेली.

तो म्हातारा कॉर्नी होता; आणि ती तरुण स्त्री म्हणजे...सतरा वर्षांमागं जिचा हात त्यानं मोडला होता, ती अगाथा होती ती. ग्यी गावापासून चार मैल अंतरावर असलेल्या या गावातल्या एका श्रीमंत कुटुंबात तिला दिलेली होती.

एकेकाळचा मजबूत देहयष्टीचा, श्रीमंत व स्वाभिमानी कॉर्नी व्हॅसिलिव्ह, आता फाटकेतुटके कपडे पांघरलेला एक भिकारी बनला होता. लष्करातला सैनिकाचा बिल्ला आणि पाठीवरच्या पिशवीतले दोन सदरे यांखेरीज त्याच्यापाशी काहीएक शिल्लक उरलं नव्हतं. त्याच्यातला हा फरक इतका सावकाशपणं अन् सहज रीतीनं घडून आला होता, की, या एकंदर फरकाचं मूळ नि शेवट कधी अन् कसे काय घडून

आले, हे त्याचं त्यालाच सांगता आलं नसतं. फक्त एकाच गोष्टीबद्दल त्याची खात्री पटली होती; अन् ती म्हणजे...आपली ' ही अशी ' दुर्दशा व्हायला सर्वस्वी कारण आपली दुष्ट बायको होय !...ही अढी त्याच्या मनात पक्की बसली होती.

पूर्वीच्या एकेक गोष्टी नुसत्या आठवायच्या म्हटलं, तरी त्याला कसंसच, चमत्कारिक व दुःखदायक वाटे. आणि कधीतरी एखादा विचार मनात आला की, गेल्या सतरा वर्षांत आपणाला भोगाव्या लागलेल्या सगळ्या दुःखपूर्ण घटनांच्या मुळाशी असलेली एकच एक व्यक्ती त्याच्या मनःचक्षूंसमोर ठळकपणं उठून दिसे...मार्फा !...

' त्या ' दिवशी आपल्या बायकोला बेदम मारल्यावर तो, जंगलाचा काही भाग विक्रीला काढणाऱ्या त्या जमीनदाराकडे गेला. पण तो तिथं जाऊन पोचण्यापूर्वीच त्याची विक्री होऊन चुकली होती. त्याचा नाइलाज झाला.

मग तो मॉस्कोला गेला, आणि तिथूनच दारू पिण्याची घातक सवय त्याला जडली. थोडंफार — जरुरीपुरतं मद्यपान करण्याचा त्याचा नेहमीचाच सराव होता, पण आता तो सारखा पंधरवडा-पंधरवडाभर आपला दारूच्या धुंदीत असायचा. त्यात खळच पडायची नाही मुळी !.. शेवटी एकदाचा माणसांत आल्यावर, तो गुरं आणण्यासाठी म्हणून परत गेला. पण...पण त्या सौद्यात तो कमनशिबी ठरला !- चांगलीच खोट बसली त्याला त्यात ! त्यानंतर पुन्हा, आणखी एकदा त्यानं गुरं आणली, पण त्यातही त्याच्या नशिबानं पूर्ववतच चक्कर खाल्ली, आणि अशा प्रकारे एका वर्षाच्या अवधीत, त्याच्यापाशी असलेल्या तीन हजारांच्या पुंजीपैकी अवघे पंचवीसच रूबल काय ते शिल्लक उरले. आता, कुठंतरी नोकरीधंदा पत्करण्यावाचून त्याला गत्यंतर नव्हतं. आणि अशा स्थितीत तर त्याला मद्यपानाची अधिकच सवय जडली.

पहिल्यानं गुरांच्या एका व्यापाऱ्याकडे तो कारकून राहिला. पण...एकदा, वाटेत दारू पिऊन तो झिंगून पडल्यानं, त्या व्यापाऱ्यानं त्याला नोकरीवरून काढून टाकलं. पुढं...एका ओळखीच्या माणसाच्या साहाय्यानं, त्याला एका दारूगुत्त्यातच नोकरी मिळाली. पण तिथंही फार काळ टिकला नाही तो ! हिशेबात घोटाळे माजवल्यामुळं त्याला घालवून देण्यात आलं. घरी परतण्याची तर त्याला शरम वाटत होती, आणि शिवाय घरच्या आठवणींबरोबर संताप वाढत असे तो निराळाच.

'मी कशाला हवाय् त्यांना ?..चांगले ख्यालीखुशालीत मजा मारीत असतील ते !..मी नसलो म्हणून काय झालं ?..शिवाय ते पोरटंही माझं नसेल बहुधा !..' त्याच्या मनात असले एकेक विचार येत. पण कॉर्नीची अवस्था दिवसेंदिवस अधिकाधिक दुःखदायक होत होती. कारकुनीची जागा !..पण तेवढीही मिळणं कठीण झाल्यानं, गुरं वळणं त्याला भाग पडलं, आणि...पुढंपुढं तर तीही कामगिरी कुणी देईनासा झाला त्याला.

...अपयशाची कमान हळूहळू अधिकच वाढू लागली !...

साऱ्या दोषांचं खापर बायकोच्या माथ्यावर फोडण्यावाचून त्याला दुसरा उद्योग उरला नव्हता !— तिच्यावरचा त्याचा राग सारखा बळावत चालला होता, हे मात्र निश्चित !

शेवटी...एका नवख्या माणसानं त्याला गुरं राखायला ठेवलं. पण...त्या गुरांना कसलासा रोग जडला. आणि मालकाच्या रागाच्या भिरभिरीत कॉर्नीला, त्याच्या अपराधावाचून सोडचिठ्ठी मिळाली. त्याला आता कुठं म्हणजे कुठंच कसली नोकरी मिळेनाशी झाली. पायपीट करीत सारखं वणवण भटकायचं...एवढाच उद्योग उरला होता त्याला.

बुटांची एक जोडी नि एक बॅग त्यानं तयार केली. आणि थोडी चहा - साखर अन् फक्त आठ रुबल एवढ्या पैशांनिशी त्यानं कीव्ह शहर गाठलं. पण तिथंही त्याची काही डाळ शिजेना !...तेव्हा

कॉकेशस् पर्वतावरील नोव्हीअफन् गावाला तो निघाला. पण वाटेतच त्याला तापानं पछाडलं; अन् तो रोडावला - दुबळा झाला. एक रुबल अन् सत्तर कोपेक्स (दोनेक रुपये) एवढीच काय ती शिल्लक उरली होती त्याच्यापाशी. बरं, मागचे इष्टमित्र त्याला कुठंच कुणी भेटेनात. तेव्हा अखेर घरी - हो !..आपल्या मुलाच्या घरी जाण्याचं ठरवलं त्यानं. 'ती कपाळकरंटी बया एव्हाना मरूनसुद्धा गेली असेल !'- असं त्याला वाटलं. 'आणि अजून असलीच जिवंत, तर...तर तिनं मला कोणत्या दशेला आणून सोडलंय् हे चांगलं दाखवून देईन तिला !'- असा विचार करून तो घरच्या वाटेला लागला.

दोन दिवसांच्या अवधीत तापानं त्याला आपला चांगलाच प्रताप दाखवला. त्याच्या अंगातील ताकद आता खूपच ढासळू लागली. आणि दिवसभरात दहा-बारा मैलांपेक्षा अधिक चालणं त्याच्यानं होईना. घरापासून दीडेकशे मैल अंतरापर्यंत येईतोवर त्याच्याजवळचे सगळे पैसे संपुष्टात आले. आता, देवाच्या नावानं भीक मागून खाणं अन् कुणी आसरा देईल तिथं रात्र काढणं, यावाचून दुसरं गत्यंतर उरलं नाही त्याला. '..कोणत्या दशेला मला आणून पोचवलंस, हे पाहून तरी संतुष्ट हो आता !'- बायकोला उद्देशून तो स्वत:शीच पुटपुटे. आणि म्हातारपणाच्या सवयीनुसार आपले दुबळे, रोडावलेले हात आवळल्यासारखे करी !...पण त्याच्या मनगटांत आता जोरही उरला नव्हता. आणि आपल्याशीच मनगटं चावण्याखेरीज उपायही दुसरा काही नव्हता.

शेवटचं पंधराएक मैलांचं अंतर तोडायला त्याला तब्बल दोन दिवस लागले. अखेर दुबळ्या, खचलेल्या अवस्थेत तो घरापासून चारेक मैलांवर — अगाशा भेटली तेथवर येऊन पोचला. अगाशानं अर्थातच त्याला ओळखलं नाही; आणि सतरा वर्षांपूर्वी आपण अधू बनवलेली अगाशा ती हीच, हे तोही ओळखू शकला नाही.

[३]

कॉर्नी अखेर झिनोव्हेव्ज्च्या घरी गेला; आणि अगाफिया (अगाशाचं सासरचं नाव) बोलल्याप्रमाणं त्याला तिथं आसरापण मिळाला. आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणं त्यानं ख्रिस्ताला वंदन केलं, आणि घरधन्याचे मनापासून आभार मानून तो आत जाऊन बसला.

" तुम्ही अगदी गारठून गेलाहात, आजोबा !- असे या शेगडीपाशी येऊन बसा की !" अगाफियाची म्हातारी सासू, टेबल साफ करीत म्हणाली. तिचा चेहरा सुरकुतलेला, पण हसरा दिसत होता.

अगाफियाचा नवरा - एक तरुण शेतकरी - जवळच्याच बाकावर, दिव्याची वात साफ करीत बसला होता. तो म्हणाला - " बरेच भिजून गेलाहात की हो ! चला - या की !- या इथं बसा, अंग वाळवीत. "

कॉर्नीनं आपले कपडे उतरले, बूट काढले, आणि पायपट्ट्या शेगडीच्या शेजारी ठेवून, आपणही तिथंच बसला, अंग शेकवीत.

- गुरांना गोठ्यात सोडून, हातात एक डेरा घेऊन अगाफिया आत आली.

" इथं कुणी म्हातारबाबा आला होता का इतक्यात ?" ती म्हणाली, " यायला सांगितलं होतं त्याला मी इकडं."

" हां - हां !...तो - त्या तिथं बसलाय् !" आपले हाडकुळे, ओबडधोबड हात विस्तवावर शेकवीत बसलेल्या कॉर्नीकडे बोट दाखवीत, घरधनी बोलला.

चहाच्या वेळी त्यांनी कॉर्नीला आपल्यातच बसायला बोलावलं. हळूहळू चालत कॉर्नी कसातरी, बाकाच्या एका कडेला जाऊन बसला.

चहाचा एक कप आणि बरोबर साखरेचे काही खडे त्याला दिल्यावर, त्यांनी हवापाण्याच्या गोष्टी सुरू केल्या.

पाचव्यांदा चहा ओतून अगाफियानं कप कॉर्नीच्या पुढं केला. तो ' नको - नको ' म्हणाला. तेव्हा ती त्याला म्हणाली: " काही नाही ! घ्या - घ्या तुम्ही, आजोबा ! चांगली हुशारी येईल मग."

" आं ? हाताला काय झालंय् तुझ्या ?" चहाचा कप तिच्याकडून जपून घेत, भुवया उंचावत त्यानं विचारलं.

" मोडलाय् बिचारीचा हात — अगदी लहानपणीच. तिचा बाप जिवानिशीच मारणार होता तिला; पण सुटली आमची अगाशा त्यातनं,"बडबडी म्हातारी घडाघडा बोलली.

" पण...झालं होतं तरी काय असं ?" बोलता - बोलता कॉर्नीनं त्या तरुण स्त्रीच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिलं ! त्याला इव्हस्टिग्नी बेली नि त्याचे ते निळसर डोळे आठवले. आणि

- आणि त्याच्या हातातला कप, हात जोरानं कापू लागल्यानं.एवढा लटपटला की - तो कसाबसा टेबलावर ठेवीपर्यंत त्याच्यातला अर्धाअधिक चहा खाली सांडला.

" कॉर्नी व्हॅसिलिव्ह म्हणून बाप होता तिचा गयीला. तो श्रीमंत होता, तसाच आपल्या बायकोबद्दल त्याला अभिमानही मोठा होता. पण...एक दिवस त्यानं तिला बरीच मारझोड केली, आणि या मुलीला हे असं अधू करून टाकलं. "

आपल्या काळ्याभोर पण थरथरत्या भुवयांखालून, त्या तरुण शेतकऱ्याकडे व अगाशाकडे मधूनमधून आळीपाळीनं बघत कॉर्नी स्तब्ध बसला होता.

" पण एवढं हे व्हायला कारण तरी काय झालं ?" साखरेचा एक तुकडा चावत-चावत त्यानं विचारलं.

" कुणास ठाऊक !...नाहीतरी भलताच गैरसमज वाढत

चाललाय् आम्हां बायकांविषयी हल्ली,'' ती म्हातारी म्हणाली. '' त्यांच्याकडं एक गडी होता. त्याच्यावरनं झालं सारं हे !... आमच्याच गावचा होता तो...तिथं - त्याच्याच घरी मेला बिचारा शेवटी !''

'' मेला का ? '' खोकत – खोकत कॉर्नी उद्गारला.

'' म्हणजे...आता बरेच दिवस झाले त्या गोष्टीला. आमची ही अगाफियाही त्यांच्याच कुटुंबातली. किती चांगली माणसं !...बरी सुखात असायची. घरधनी जिवंत असताना गावात पहिल्या प्रतीचं गणलं जाई त्यांचं कुटुंब !''

'' तोसुद्धा मेला वाटतं, मग ?''

'' नाहीतर काय ? कुणी समजायचं तरी काय ? जवळपास पंधरा वर्षं झाली असतील नाहीतरी.त्याला बेपत्ता होऊन !... ''

'' पंधरा कशाला ? जास्तच होतील ! मम्मी सांगत होती की, नुकतचं कुठं दूध सुटलं होतं माझं, त्यावेळी.''

'' काय ग, तू त्याच्यावर खूप रागावली असशील, नाही ? हा हात... ''पण कॉर्नीला पुढं बोलवेच ना.

'' छे - छे: ! तो मला कुणी परका आहे थोडाच ? किती झालं तरी माझा बाप ना तो !... बऽरं...आणखी थोडा चहा हवा तर घ्या ना ! ओतू थोडा ? खूप तरतरी येईल बघा !''...

कॉर्नीनं काहीच उत्तर केलं नाही. मोठमोठ्यानं सारखा स्फुंदूच लागला तो.

'' का – काय झालं ?''

'' काही नाही !...देव भलं करो !.''

—आणि कापऱ्या - रोडावलेल्या हातांनी भिंतीचा नि खांबाचा आधार घेत तो शेगडीकडं जाऊन बसला.

“ बघितलंस ?...” कॉर्नीकडे एक नेत्रकटाक्ष टाकीत म्हातारी आपल्या मुलाला म्हणाली.

[४]

दुसऱ्या दिवशी कॉर्नी इतरांच्या अगोदरच उठला. सुरकुतलेल्या पायपट्ट्या त्यानं नीट केल्या. आणि विस्तवाच्या उबेनं आखडलेले बूट चढवून त्यानं आपली पिशवी पाठुंगळीला मारली.

“ आजोबा, न्याहरीला नाही थांबत ?”म्हातारीनं विचारलं.

“ देव तुमचं भलं करो !... पण गेलंच पाहिजे मला आता.”

“ मग कालच्यातल्या काही भाकऱ्या तरी घ्या बांधून. मी घालते तुमच्या पिशवीत थोड्या.”

त्यांचे मनापासून आभार मानून कॉर्नी जायला निघाला.

“ याबाजूनं परत कधी वळलात, तर या आमच्याकडे.”

सगळीकडे दाट धुकं पसरलं होतं. पण ती वाट कॉर्नीच्या चांगल्याच परिचयाची असल्यामुळं विशेष काही अडचण नव्हती. वाटेतलं प्रत्येक झाडझुडूप आणि एकूणएक चढउतार त्याच्या पुऱ्या माहितीचा होता. गेल्या सोळा - सतरा वर्षांत काही झाडं तोडली गेली होती, तर काही जुनाट झाडं नष्ट होऊन, काही ठिकाणी नवीन लहान झाडं उगवली होती. आणि कुठकुठल्या लहानसहान झाडांचे आता मोठाले वृक्ष बनले होते...एवढंच काय ते !

गयी गावात विशेष असा काहीच बदल घडून आला नव्हता. गावाच्या बाहेरच्या भागात काही नव-नवीन घरं उभारलेली होती. आणि पूर्वीची जुनी - लाकडांची काही घरं आता विटांची बनवलेली दिसून येत होती. कॉर्नीचं दगडी घर मात्र जसंच्या तसं होतं अगदी. थोडं जुनं दिसत होतं एवढंच. नाही म्हणायला, कोपऱ्याकोपऱ्याच्या काही दगडी विटा कोसळल्या होत्या. आणि उंबरठ्याचे दगडही थोडे

विस्कळीत झाले होते. तसेच छपराला बरेच दिवस डांबरपण लावलेलं दिसत नव्हत.

आपल्या कधीकाळच्या त्या घराजवळ कॉर्नी येतो तोच, दारं करकरा वाजली आणि एकदोन घोडे अन् तट्टं बाहेर आली. त्यांपैकी एका म्हाताऱ्या घोड्याला पाहताच कॉर्नीला मागल्या एका गोष्टीची आठवण झाली. घरून निघायच्या आदल्या वर्षी भरलेल्या जत्रेतून एक घोडी आपण विकत आणल्याचं त्याला आठवलं. हा म्हातारा घोडा तिचाच असावा असा तर्क त्यानं केला !...

..' तिचाच असावा हा !...तशाच भरदार मांड्या नि रुंद छाताड आहे याचं. केसाळ पण तसाच, अन् पाय तसेच खरबरीत...'

नवीनच उंच बूट घातलेला, काळ्याभोर डोळ्यांचा पोरगा त्या घोड्यांना पाणी पाजायला घेऊन जाऊ लागला. त्याला पाहून कॉर्नी आपल्याशीच उद्गारला: ' माझाच नातू हा ! शंकाच नाही. माझ्या फेडकाचाच मुलगा. त्याच्यासारखेच अगदी काळेभोर डोळे आहेत बेट्याचे.'

कॉर्नीकडे - एका नवख्या म्हाताऱ्याकडे एकदा वळून पाहत, तो पोरगा, चिखलातून उड्या मारीत जाणाऱ्या अवखळ घोड्यांमागं लगेच धावत गेला.

— त्या मुलाच्या मागून काळसरसा एक कुत्रापण धावत आला... ' व्होल्कॉकच असेल हा !' कॉर्नीला वाटलं. आपला तो कुत्रा आता वीसेक वर्षांचा तरी झाला असेल, असा त्याचा अंदाज होता.

' त्या ' रात्री कठड्यावरचं बर्फ खात जिथं तो बसला होता, त्या पायऱ्या धडपडत, अडखळत कशाबशा चढून त्यानं माजघराचं दार उघडलं.

" आडदांडासारखा, विचारल्यावाचून कुठं घुसतोस आत ?"- घरातून एका स्त्रीचा करडा आवाज आला.तो आवाज आपल्या

बायकोचा असल्याचं त्यानं ओळखलं. आणि, सुरकुतलेल्या, सुकून गेलेल्या चेहऱ्याची त्याची बायको दारात आली. पूर्वीची तरुण, देखणी रूपसुंदर मार्फा दिसेल, अशी त्याची भाबडी अपेक्षा होती. तिचाच तिरस्कार तो सारखा करीत आला होता. आणि तिलाच खडसून काढायची होती त्याला. पण - पण ही तर कुणी नवखीच, चमत्कारिक म्हातारी स्त्री दिसली त्याला.

" भीक मागायला आला असशील, तर असा - त्या खिडकीपाशी राहा बसून ! " ती कर्कशपणं ओरडली.

भीक मागायला नाही आलो मी ! " कॉर्नी उत्तरला.

" मग ? पाहिजेय् काय तुला ? " पुन्हा करडा सवाल.

— आणि एवढं बोलून ती अचानक थबकली. तिच्या चेहऱ्यांच्या आविर्भावावरून, आपणाला तिनं ओळखल्याचं कॉर्नी पुरता समजून चुकला.

" घराभोवती घोटाळणारे असे पुष्कळ चोर - भामटे पाहिल्येयृत आम्ही तुझ्यासारखे. चल् ! हो चालता आधी इथनं बऱ्या बोलानं !"

भिंतीच्या बाजूला कलंडत, कॉर्नी हातातल्या दंडुक्यावर टेकला, आणि तिच्याकडे अशा एकाग्र दृष्टीनं पाहू लागला, की - इतकी वर्षं तिच्याविषयी बाळगलेला त्याचा सारा संताप क्षणभरात पार नाहीसा झाला ! आपल्यातील या बदलाचं त्याचं त्यालाच नवल वाटू लागलं. त्याच्या वृत्ती अगदी बधिर होऊन गेल्या.

" मार्फा, आपण काही फार दिवस नाही जगणार आता !"

" चल् !- होतोस की नाही आधी चालता इथनं ?... का..." वस्कन् त्याच्या अंगावर येत ती ओरडली.

" तुला..आणखी...काहीच का नाही बोलायचं ?...'

" काहीएक नाही सांगायचं मला. बऱ्या बोलानं नीघ पाहू इथनं आधी ! चल्...चालता हो !...भटके, चोर मेले !..."

आणि ती झटपट आत निघून गेली; अन् आपल्यामागून लगेच तिनं दरवाजापण धाड्कन् लावून घेतला.

" शिव्या कशाला देतेस बिचाऱ्याला ?.." दारामागून कुणाचा तरी पुरुषी आवाज ऐकू आला, आणि कंबरेला आकडा - कोयता लटकावलेला एक काळासा शेतकरी इसम बाहेर आला. चाळीस वर्षापूर्वीचा कॉर्नीच दिसत होता तो हुबेहूब ! थोडासा ठेंगणा नी सडपातळ होता तेवढाच !...त्याचे डोळे अगदी तसेच काळेभोर व पाणीदार दिसत होते.

सतरा वर्षांपूर्वी ज्याला कॉर्नीनं चित्रांचं पुस्तक दिलं होतं, तो फेड्काच होता तो. दारावर आलेल्या म्हाताऱ्या भिकाऱ्याशी निर्दयपणं वागणाऱ्या आपल्या आईची तो कानउघाडणी करीत असल्याचं कॉर्नी ऐकत होता.

त्याच्या मागोमाग तो मुका पुतण्या बाहेर आला. त्याच्याही कंबरेला विळा-कोयता लटकावलेला होता. त्याला आता बारीकशी दाढी फुटलेली होती. उमदा शेतकरी तरुण बनलेला दिसत होता तो आता.

— दोघांचीही अंगलट मजबूत तशीच काटक दिसत होती, आणि नजरेत एक प्रकारच्या भेदकपणाची चमक मारत होती. न्याहारी आटोपून नुकतेच रानात जायला निघाले होते दोघेही.

" जरा थांबा हं, आजोबा !" म्हाताऱ्या कॉर्नीकडे बघत फेड्का म्हणाला; आणि आतल्या खोलीकडे बोट दाखवून, त्या मुक्या तरुणाला त्यानं खूण करून भाकरी आणायला सांगितली.

फेड्का रस्त्याला लागला, आणि तो मुका तरुण परत घरात निघून गेला. भिंतीला ओठंगून अन् हातातल्या काठीवर भार देऊन, खालच्या मानेनं कॉर्नी उभा होता. अतिशय थकवा आलेला दिसत होता त्याला. आलेले हुंदके त्यानं कष्टानं कसेबसे आवरले.

ताज्या गरम भाकरीचा मोठाला तुकडा आणून त्या मुक्या मुलानं

कॉर्नीपुढं केला, आणि घराच्या आतल्या भागाकडे मुखडा वळवून, तोंडावरून हात फिरवीत त्यानं असा काही आविर्भाव केला, की आपल्या चुलतीच्या वागणुकीविषयी त्याला नापसंती दर्शवायची होती, हे उघड दिसत होतं. पण...पण लगेच एकदम स्तब्ध झालेला दिसला तो. अगदी एखाद्या पुतळ्यासारखा निश्चल राहून, तो कॉर्नीकडं टकमका बघत राहिला. जणू त्याला ओळखच पटली होती कॉर्नीची ! ...डोळ्यांत तरारू पहाणारे अश्रू आवरणं कॉर्नीला आता मात्र अशक्य झालं. अश्रूंनी ओथंबलेल्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा, नाकातून दाढीपर्यंत ओघळू लागल्या. डोळे, नाक नि दाढी कोटाच्या बाहीनं पुसटून टाकीत, तो त्या मुक्या पुतण्याकडून मागं फिरला.

...आपल्या बायकोपुढं - नव्हे, साऱ्या मानवजातीपुढं हार खाल्ल्याची, हीनपणाची विलक्षण भावना कॉर्नीच्या प्रत्ययाला आली. त्या भावनेची तीव्र संवेदना त्याच्या हृदयाला खोलवर जाऊन भिडली.

— मार्फानं खिडकीवाटे बाहेर पाहिलं. आणि घराच्या कोपऱ्यावरून कॉर्नी - तो म्हातारा दिसेनासा झाला, तसा तिनं सुटकेचा दीर्घ सुस्कारा सोडला. आणि काहीतरी करायचं म्हणून, सुई घेऊन ती विणकाम करू लागली. पण तिचा हात कसा - तो मुळीच चालेना !.. ती तशीच थांबली. नुकतीच बघितलेली कॉर्नीची मूर्ती, मन:चक्षूंसमोर आणण्याचा प्रयत्न ती करू लागली.

– तो म्हातारा, आपल्याला मारझोड करणारा आपला नवरा कॉर्नीच असल्याचं ती ओळखून चुकली. आणि –

...आपण हे काय करून बसलो ? या जाणिवेनं ती कावरीबावरी होऊन गेली.

– करायला नको होती ती गोष्ट आपण केली का ? ...मग...आपण वागायचं होतं तरी कसं ?... आपण कॉर्नी असून, आपल्या घरी परत आल्याचं, काहीच का बोलला नाही

तो ?...

– आणि सुई घेऊन ती पुन्हा काहीतरी विणीत बसली संध्याकाळपर्यंत.

[५]

कसातरी धडपडत - चाचपडत कॉर्नी संध्याकाळी ॲन्द्रिव्हका गावी पोचला. झिनोव्हेव्ज्‌कडे त्याला लगेच आसरा मिळाला.

" विशेष लांबपर्यंत काही गेलेले दिसत नाही तुम्ही, आजोबा ?"

" जाववेनाच मुळी ! भारीच थकून गेलोय्‌ !...आलोय्‌ तसाच परत जाण्याची पाळी येतेसं दिसतंय. आजच्या रात्रीपुरतं जरा..."

" वा: ! एवढं आर्जव कशाला केलं पाहिजे, आजोबा ? तुम्ही आमचं घर घेऊन जाणार आहात थोडेच ? चला, या ना आत...बसा विस्तवापाशी जाऊन."

ती सबंध रात्र कॉर्नीनं तळमळत काढली. अंगात भरलेला ताप यातना देत भाजून काढीत होता त्याला. पहाटेच्या वायुलहरींबरोबर डुलकी येऊन कुठं त्याचा जरासा डोळा लागला.

झोपून उठल्यावर त्यानं सभोवार दृष्टी फेकली –

— घरातली सारी मंडळी आपापल्या कामधंद्याला निघून गेली होती. फक्त अगाशा काय - ती राहिली होती एकटी.

अगाशाच्या सासूनं दिलेल्या उबदारशा डगल्यावर कॉर्नी पडून राहिला होता.

...अगाशा शेगडीतून भाकरी बाहेर काढीत होती...

" मुलीऽऽ, इकडे ये बघू जरा !"..क्षीण स्वरात कॉर्नीनं तिला हाक मारली.

" मिनीटभर थांबा हं, आजोबा !" भाकरी खाली ठेवीत ती

म्हणाली, " प्यायला हवंय् का काही ? सरबत देऊ ?"

त्यानं काहीच उत्तर केलं नाही.

शेवटची भाकरी भाजून होताच, सरबताची मुरई घेऊन अगाशा त्याच्यापाशी गेली. पण ती घेण्यासाठीसुद्धा तो तिच्याकडे वळला नाही. आढ्याकडे नजर लावून उताणा – निश्चल पडून होता तो, बोलताना – पुटपुटतानाही तो मुळीच हालचाल करीत नव्हता. स्वस्थ !...अगदी स्वस्थ पडून होता तो !

" अगाशा..." तो हलक्या, मृदू स्वरात बोलला. " माझी वेळ आता भरत आलीय्. फार वेळ नाही जगत मी आता...उदार मनानं क्षमा कर हं मला !"

" हे काय ? मी कशाबद्दल करायची क्षमा तुम्हांला ? देव क्षमाशील आहे. तो करील हं क्षमा तुम्हांला !.. तुम्ही माझं...कधी काही वाईट इच्छिलंय् थोडंच !..."

कॉर्नी काही क्षण अगदी शांत – स्तब्ध राहिला. मग कळवळून बोलला: " तसं...नव्हे...मुली !..तसंच काही कारण !...हे बघ, तुझ्या आईपाशी जा अन् तिला सांग...की... तो पाहुणा भिकारी...तिला सांग...तो कालचा आगंतुक भिकारी...तिला सांग...सांग..."

पुढं त्याच्या तोंडून शब्द उमटेना. त्याला सारखे हुंदक्यावर हुंदके येऊ लागले.

" आजोबा, आमच्या घरी गेला होता वाटतं, तुम्ही काल मग ?"

" हां !..गेलो होतो. आणि म्हणूनच तिला सांग... की... काल तो भिकारी... पाहुणा... आला होता... तो...तिला सांग... तो..." पुन्हा त्याला हुंदके अनावर झाले. पण, अखेर सावरून तो पुढं म्हणाला: " तिला सांग... तो भिकारी... तिचा शेवटचा

निरोप... घ्यायला आला होता !'' आणि छातीशी हातानं चाचपीत तो चुळबूळ करू लागला.

'' सांगेन हं, आजोबा ! खचित पोचवीन मी निरोप तुमचा. अन् का काय... झालं ? काय शोधता आहात, आजोबा ?''

म्हातारा काहीच बोलला नाही. छातीच्या बाजूच्या खिशात खोचून ठेवलेलं जाड कागदाचं एक तिकीट त्यानं मोठ्या कष्टानं ओढून काढलं; अन् हळूच तिच्यापुढं केलं...

'' हे बघ... कुणीही काही विचारलं, तर त्याला... माझा हा शिपाईपेशाचा बिल्ला दाखव. झालं माझं काम !... पापातून सुटका होईल तेवढीच खरी !... देव पावला अन् मी इथं – या इथं...''

चेहऱ्यावरच्या आविर्भावावरून, भारी समाधान वाटत असलेलं दिसत होतं त्याला. भुवया उंचावून त्यानं आपली दृष्टी वर – आढ्याकडे लावली, आणि तो अगदी निश्चल – शांत पडून राहिला !...

'' वात !... वात !...'' ओठांची फारशी हालचाल न करता तो पुटपुटला.

अगाशा काय – ते समजून चुकली; आणि पेटत्या मेणबत्तीचा एक तुकडा ख्रिस्ताच्या तसबिरीपुढून घेऊन, तिनं त्याच्या हातात दिला. त्यानंही तो शक्य तेवढा घट्ट धरून ठेवला.

– आणि अगाशा (अगाफिया) ते तिकीट – तो शिपायाचा बिल्ला पेटीत ठेवून परतते. तो त्याच्या हातातली मेणवात गळून पडली होती. आणि त्याच्या निर्जीव डोळ्यांतील तेज नि उरातला श्वास... दोन्ही निमाली होती !..

अगाफियानं नम्रपणानं हात जोडले. गळून खाली पडलेली मेणवात विझवली. अन् एक शुभ्र, स्वच्छ टॉवेल त्याच्या मुखावर झाकला.

☆ ☆ ☆

ती सबंध रात्र मार्फानं जागून काढली. कॉर्नीविषयीच्या विचारांनी तिच्या मनात सारखा धुडगूस घातला होता. पहाट झाली, उजाडलं... तरी तिला झोप म्हणून नव्हती.

सकाळी ती बिछान्यावरून उठली, तोच तिनं कपडे केले, डोक्याला शाल गुंडाळली, आणि आदल्या दिवशीच्या त्या 'भिकारी पाहुण्या' च्या शोधार्थ ती बाहेर पडली.

थोडसं चालून गेल्यावर तिला कळलं. की तो म्हातारा – कॉर्नी शेजारच्या ॲंद्रिव्हीक गावात आहे म्हणून. हातात एक काठी घेतली. अन् ती तशीच पुढं – त्या गावाच्या दिशेनं चालू लागली. पुढंपुढं चालत जावं तसतशी तिला अधिकाधिक धास्ती वाटू लागली. तिचं मन स्वत:ची समजूत घालीत होतं... ' एकमेकांना क्षमा करू आम्ही ! ... मी त्याला आता घरी आणीन... आणि... आणि मग आम्ही दोघंही आपापल्या पापापासून मुक्त होऊ !... निदान आपल्या घरी – आपल्या मुलाच्या इथं तरी मरू दे त्याला !...'

ती आपल्या मुलीच्या घराजवळ येते, तो तिला घराबाहेर बरीच गर्दी जमलेली दिसली. अंगणात, मधल्या वाटेत, माजघरात ... सगळीकडे लोक घोळक्या–घोळक्यांनी जमले होते. प्रत्येकजण समजून चुकला होता, की – चाळीस वर्षांपूर्वी धनवान, देखणा नि पाणीदार नवजवान म्हणून त्या तेवढ्या प्रांतात नावाजलेला कॉर्नी व्हॅसिलिव्ह... बिचारा... शेवटी एक भटक्या भिकारी म्हणून, बेवारशासारखा मरून पडला होता. च्-च्-च्-च्-च् !...

मार्फा आलेली पाहताच, सगळ्या लोकांनी बाजूला होऊन तिला वाट काढून दिली.

मार्फा सरळ आत गेली.

एका मोठ्या दालनात, भिंतीशेजारी कॉर्नीचं शव, पांढऱ्याशुभ्र

चादरीनं झाकून ठेवलेलं होतं. बाजूलाच पाद्री लोक आणि ख्रिश्चन धर्माधिकारी बायबलातील अंतकाळच्या प्रार्थनेचे निवडक वेचे, स्तोत्रबध्द अशा शांत – गंभीर स्वरात म्हणत उभे होते.

मार्फानं दिङ्मूढतेनं आपली दृष्टी कॉर्नीकडे वळवली —

— कॉर्नीची नजर पूर्ण निश्चल नि निर्विकार होती. त्यानं आपल्याला उदार अंत:करणानं क्षमा केली, की... आपल्यावरचा त्याचा राग अंतकाळीही तसाच कायम होता, हे मार्फाला कळणं आता बिलकूल शक्य नव्हतं. तिनं क्षमेची याचना करणं आणि त्यावर त्यानं, मोठ्या मनानं तिचा अपराध पोटात घालणं... या गोष्टी आता पूर्णपणं कक्षेबाहेर होत्या !...

★ ★ ★

३ 'त्या' रात्रीनंतर ...

" एकूण तुमचं असं म्हणणं आहे, की – बरं काय अन् वाईट काय, याचा निवाडा माणूस स्वतंत्रपणे करू शकत नाही. तर, त्याच्याभोवतालची परिस्थिती ती गोष्ट घडवून आणते. म्हणजेच... माणूस हे परिस्थितीच्या हातचं कळसूत्री बाहुलं आहे. पण ती योगायोगाची गोष्ट आहे, असं माझं मत आहे. प्रत्यक्ष माझ्या बाबतीत सांगायचं म्हणजे "....

— व्यक्तीच्या सुधारणेबाबत कसलीही चर्चा करण्याआधी, माणसं ज्या परिस्थितीत राहतात ती, त्यांच्याभोवतालची परिस्थितीच बदलण्याची जरुरी आहे, याविषयी आमची चर्चा चालली होती. तर त्या चर्चेच्या शेवटी, आमचा आदरणीय मित्र आयव्हॅन व्हॅसिल्येविच यानं हे उद्‌गार काढले. खरं म्हणजे... बरं काय अन् वाईट काय, याचा निवाडा माणूस स्वतंत्रपणे करूच शकत नाही, असं कुणीच म्हटलेलं नव्हतं. पण चर्चेच्या ओघात स्वत:लाच स्फुरलेल्या विचारांना उत्तरं देण्याची खोड आयव्हॅन व्हॅसिल्येविच याला होती. एवढंच नव्हे, तर ह्या विचारांना अनुलक्षून स्वतःच्या जीवनातील अनुभव सांगायलाही तो प्रवृत्त होई. आणि तो अत्यंत उत्कटतेनं आणि प्रांजलपणं बोलत असल्यानं, सांगत असलेल्या गोष्टीत तो एवढा मग्न होऊन जाई की – ती सांगण्याचं कारणच तो विसरून जाई. या बाबतीतही अगदी तसंच घडलं होतं. तो सांगू लागला —

" निदान माझ्या बाबतीत तरी असं ठाम प्रतिपादन करता

येईल मला. माझं स्वत:चं जीवन याप्रकारं घडलेलं आहे. दुसऱ्या कोणत्याही प्रकारे – परिस्थितीमुळं नव्हे, तर काहीएका आगळ्यावेगळ्या प्रसंगानं ते पार बदललं. ''

'' कोणत्या प्रसंगानं ?'' आम्ही विचारलं.

'' ती बरीच लांबलचक गोष्ट आहे. तुम्हाला तिचा नीट उलगडा होण्यासाठी, ती सगळीच्या सगळी हकीकत सांगावी लागेल मला.''

'' सांग तर मग.''

आयव्हॅन व्हॅसिल्येविचनं क्षणभर विचार केला आणि मान डोलावली.

'' हां !'' तो बोलला, '' माझं सारं जीवन अवघ्या एका रात्रीनं, नेमकं सांगायचं म्हणजे... त्या रात्रीनंतरच्या सकाळनं पार बदलून टाकलं.''

'' असं झालं तरी काय ?''

'' झालं असं की – मी प्रेमात पडलो होतो. चांगलाच गुरफटलो होतो; पण इतका गाढ कधीच नाही. बराच काळ लोटला या गोष्टीला. म्हणजे असं, की – तिच्या मुलींचीही आता लग्नं झालेली आहेत, तिचं नाव होतं बी. म्हणजे वारेन्का बी. सध्या पन्नाशीत असूनही ती कमालीची रूपसुंदर आहे. मग तिच्या तरुणपणी – ती अठरा वर्षांची असताना तर ती म्हणजे जशी काही स्वप्नसुंदरीच होती: उंचेली, सडपातळ, मोहक तशीच राजबिंडी – होय, राजबिंडी. ती नेहमी ताठ मानेनं वागायची – जसं काही तिला वाकायला जमत नव्हतं. तिचं डोकं किंचित मागं झुकलेलं असायचं. खरं तर, ती एवढी बारीक होती, की – एकपरी हाडकुळी वाटावी ! पण तिची एकूण ढब, आणि तिच्या भरीला तिचं सौंदर्य आणि उंची यांमुळं तिला एखाद्या राणीचा डौल लाभला होता. एरव्ही या गोष्टीचा वचक वाटला असता.

पण तिचं लोभसवाणं, कुर्रेबाज स्मितहास्य, तिची जिवणी, तिचे तेजस्वी चमकदार डोळे आणि तिचं एकूणच भुरळ पाडणारं मुसमुसतं तारुण्य यांनी तिचा सगळा मोहराच बदलून टाकला होता.''

'' आयव्हॅन व्हॅसिल्येविच खात्रीनं जरा जादाच वाखाणणी करतोयूसं दिसतं !''

'' पण... मी केवढीही वाखाणणी केली समजा तरी प्रत्यक्षात, खरोखरी ती कशी लावण्यवती होती याची जाणीव तुम्हाला मी करून देऊ शकणार नाही. पण हे मुद्द्याला सोडून झालं. मी सांगणार असलेल्या घटना १८४० सालच्या सुमाराच्या आहेत —''

'' त्यावेळी एका प्रांतिक विद्यापीठातला विद्यार्थी होतो मी. आणि ही गोष्ट बरी की वाईट हे मला सांगता येणार नाही, पण त्या दिवसांत आजच्या सारखी चर्चामंडळं, तात्त्विक काथ्याकूट करणं, असे तुमच्यासारखे प्रकार आमच्या विद्यापीठात नव्हते. आम्ही अभ्यास करायचो अन् एरव्ही मजेत वेळ घालवायचो. म्हणजेच आम्ही तरणेबांड होतो, आणि तरुण पोरांसारखे राहत-वागत होतो. मी उमदा अन् भारी उत्साही तरुण होतो; आणि सौदेबाजीत तरबेज होतो. बगीचा एक तडफदार घोडा माझ्या मालकीचा होता. तर मी मुलींना घेऊन फेरफटका मारून आणायचा. (बर्फावरुन घसरण्याच्या खेळाची टूम तोवर आलेली नव्हती.) सहाध्यायींबरोबर मी मद्यपानाच्या समारंभांना जायचा. (मात्र एक – त्या दिवसांत आम्ही शाम्पेनखेरीज दुसरं कोणतंही मद्य प्यायचो नाही. पैशांची तंगी असली, तर आम्ही काहीच पीत नसू. पण आजकाल लोक पितात तशी. व्होडका दारू आम्ही कधीही प्यायलो नाही.) पण पार्ट्या अन् स्त्री-पुरुषांची जोडनृत्यं यांचा आनंद लुटण्यात मी खरा रमायचो. मी चांगला नर्तक होतो. आणि रूपानं काही कुरूप म्हणण्याजोगा नव्हतो खास.''





“ एवढा विनय बरा नव्हे, बरं का !” श्रोत्यांतला एकजण मधेच खोचून बोलला, “ आम्ही सगळ्याजणांनी तुझा जुना फोटो पाहिलाय्, चांगला देखणा तरुण होतास तू.”

“ असेनही कदाचित, पण तुम्हाला मला सांगायचंय् ते वेगळंच, माझं प्रेम शिखराला पोचलं होतं तेव्हा, स्त्री-पुरुषांच्या जोडनृत्यांच्या एका कार्यक्रमात मी सामील झालो होतो. पाहुणचार करण्याची आवड असलेल्या धनवान, तशाच सज्जन म्हाताऱ्या मार्शलनं, आपल्या वाड्यावर हा कार्यक्रम आयोजिला होता. त्याच्यासारखीच अगत्यशील असलेली त्याची पत्नी त्याच्याशेजारी उभी राहून आमचं स्वागत करीत होती. तिनं मखमली झगा पेहरला होता, आणि आपल्या केसांत हिऱ्याचा तारा खोवला होता. आणि तिची म्हातारी मान, अन् गुबगुबीत, गोरटेले खांदे, सम्राज्ञी एलिझावेता पेत्रोवना हिच्या चित्रातल्याप्रमाणं अनावृत दिसत होते. जोडनृत्यांचा तो कार्यक्रम वैभवशाली होता. नृत्याचा दिवाणखाना मनोहर होता. गायकवादक नामवंत होते. संगीताचा चाहता असलेल्या कुठल्यातरी जमीनदाराकडचे ते कलावंत होते. खाद्यपदार्थ मुबलक होते अन् शाम्पेनचा प्रवाह तर नदीसारखा वाहत होता. पण शाम्पेनचा मोठा भोक्ता असूनही मी तिचा एक घोटही घेतला नाही. कारण मी प्रेमानंच धुंद झालेलो होतो. पण मी दमछाक होईपर्यंत नाचत राहिलो. नृत्याचे सगळे प्रकार मी हाताळले. वारेन्का बरोबरही त्यातल्या जास्तीत - जास्त प्रकारांचं नर्तन मी केलं, हे सांगायलाच नको. तिचा पोशाख, गुलाबी कमरपट्टा असलेला पांढराशुभ्र असा होता. हातमोजे पांढरेच पण आखूड होते. त्यामुळं ते तिच्या बारीकशा निमुळत्या कोपरांपर्यंत नीटसे पोचले नव्हते. तसेच तिचे स्लिपर्स पांढऱ्या सॅटिनचे होते. मझुर्का या नृत्यप्रकाराच्या वेळी, ॲनिसिमॉव्ह नावाच्या नतद्रष्ट इंजिनिअरानं चलाखीनं मला चकवून माझ्यापासून तिला एक प्रकारे हिरावून नेलं. झालं असं, की तिनं

दिवाणखान्यात प्रवेश करताक्षणी त्यानं तिला आपल्याबरोबर नृत्य करायला आर्जवानं बोलावून घेतलं. त्यावेळी दुर्दैवानं केशकर्तनालयात माझा जरा जास्त वेळ गेल्यानं मला थोडा उशीर झाला होता. आणि म्हणून तिच्याबरोबर मझुर्कानृत्य करण्याऐवजी, पूर्वी एकदा जिच्याबरोबर मी नृत्य केलं होतं त्या जर्मन तरुणीबरोबर ते नृत्य मी पार पाडलं. पण त्या रात्री त्या तरुणीची मी, खरं म्हणजे उपेक्षा केली. मी तिच्याकडे धड बघितलं नाही, की बोललो नाही. कारण माझ्या डोळ्यांनी एकच ध्यास घेतला होता; गुलाबी कमरपट्टा असलेला पांढराशुभ्र पोशाख पेहरलेली, खळी पडलेल्या, लाजऱ्या लालचुटूक तुकतुकीत गालांची, आणि मऊसर, सौम्य डोळ्यांची, उंच, सडपातळ मालकीणच केवळ माझ्या डोळ्यांची एकमेव आकर्षण होती. एकटा मीच नव्हे, तर प्रत्येकजण तिच्याकडे आवर्जून बघत होता. आणि तिची वाखाणणी करीत होता. एवढंच काय, पण तिच्या सौंदर्यापुढे फिक्या पडलेल्या स्त्रियाही तिचं कौतुक करीत होत्या. तिची वाखाणणी करण्यावाचून मुळी गत्यंतरच नव्हतं कुणाला.''

'' मझुर्का - नृत्यात रीतसर असा तिचा जोडीदार मी नव्हतो, हे खरं असलं तरी, प्रत्यक्षात बराच वेळ ते नृत्य मी तिच्याबरोबर केलं. जरासुद्धा न गोंधळता, नृत्य करीत ती, तो लांबच - लांब दिवाणखाना ओलांडून माझ्या बाजूला आली; आणि तिच्या आमंत्रणाची वाट न बघता, झेप घेऊन मी जेव्हा तिला अलगद गाठलं तेव्हा, आपल्याला काय हवं ते अचूक हेरल्याबद्दल, सूचक स्मितहास्य करून तिनं माझे आभार मानले.

'' मझुर्कानंतर वॉल्झ हा नृत्य प्रकार सुरू झाला, तेव्हा झरझर उड्या मारीत तिच्याबरोबर मी बराच वेळ नाचलो. शेवटी धापा टाकीत तिनं स्मितहास्य केलं, आणि ती पुटपुटली; ' पुन्हा एकदा ? मग काय ?... माझ्या देहाचं मुळीसुद्धा भान न ठेवता, तो जसा

काही हवेचा बनलाय् या समजुतीनं मी तिच्याबरोबर एकसारखं उडतं नृत्य करीत राहिलो.''

'' देहभान विसरून अं ? मी खात्रीनं सांगतो – तिच्या कमरेभोवती तू तुझ्या हाताची वेंग घातलीस, तेव्हा तुला तुझ्या देहाचं तसंच तिच्याही देहाचं भान होतंच होतं.''— एका पाहुण्यानं लक्षात आणून दिलं.

आयव्हॅन व्हॅसिल्येविचचं तोंड एकाएकी लालबुंद झालं, आणि तो जसा काही कडाडलाच —

'' ते तुझ्यासारख्या आधुनिक तरुणाला लागू पडायचं ! कारण तुला देहाशिवाय दुसरं काही सुचत नाही. पण आमच्या काळी सारं काही वेगळं होतं. एखाद्या मुलीवर मी जेवढं जास्त प्रेम केलं, तेवढी ती मला जास्त अशरीरी वाटली. आजकाल तुम्हांला तंगड्या, घोटे, आणि अशाच इतर गोष्टींची जाणीव होते: ज्यांच्यावर तुमचं प्रेम जडलं असेल, त्या स्त्रियांना तुम्ही विवस्त्र करता. पण माझ्या दृष्टीनं, आल्फॉन्से कार या उत्कृष्ट लेखकानं म्हटल्याप्रमाणं माझ्या प्रेमाचा विषय नेहमी ब्राँझच्या वस्त्रात अवगुंठित केलेला असे. उघडं पाडण्याचं तर सोडाच. उलट नग्नता लपवण्याचा प्रयत्न आम्ही केला – नोहाच्या सद्गुणी मुलाप्रमाणं, पण ही गोष्ट तुमच्या समजण्यापलीकडची आहे ! ''

'' त्याच्याकडे काय लक्ष देताय् ? तुमची पुढची गोष्ट सांगू लागा कशी – '' श्रोत्यांपैकी दुसरा एकजण बोलला.

'' हं !...तर...बहुतेक वेळ तिच्याचबरोबर मी नृत्य केलं. किती वाजले त्याकडे माझं लक्षच नव्हतं. संगीतकारांची एवढी दमछाक झाली होती – अशा नृत्यकार्यक्रमाच्या अखेर कसा प्रकार घडतो ते तुम्हांला माहीतच आहे – की... त्यांनी मझुर्काचचं वादन चालू ठेवलं होतं. ममा - पपामंडळी, बाजूच्या दिवाणखान्यातील पत्त्यांची टेबलं सोडून भोजनाच्या अपेक्षेनं, भोजनगृहात जायला वळत

होती, नोकरांची धावपळ उडाली होती. तब्बल तीन वाजेपर्यंत ही धामधूम चालली होती. आता थोडीशी मिनिटं आमच्यापुरती शिल्लक होती, त्यांचा फायदा आम्हांला करून घ्यायचा होता. मी तिला आणखी एकदा नृत्याचं आमंत्रण दिलं. आणि मग शंभराव्या वेळी नृत्याची फेरी करीत, आम्ही तो दिवाणखाना उभा पालथा घातला.

" ' भोजनानंतर होणाऱ्या ' क्काड्रिले ' नृत्यात जोडीदार म्हणून मला स्वीकारणार का ?' तिच्या जागेवर तिला नेऊन पोचवल्यावर मी तिला विचारलं.

" ' होय ना !.. पण घरच्या माणसांबरोबर मला घरी जावं लागलं नाही तर...' स्मितहास्य करीत ती बोलली.

" ' त्यांना नेऊ नाही देणार मी, ' मी म्हणालो.

" ' माझा हातपंखा द्या जरा, ' ती म्हणाली.

" ' तो तुम्हांला परत देताना वाईट वाटतंय् मला. ' तिचा तो साधासुधा पंखा तिला परत करीत मी म्हटलं.

" पंख्यातलं एक पीस खुडून मला देत ती बोलली –' तुम्हाला वाईट वाटायला नको, म्हणून हे घ्या.

" ते पीस मी घेतलं. आणि मला वाटलेला हर्ष अन् कृतज्ञता व्यक्त करणं न जमल्यानं मी तिच्याकडे फक्त एक नेत्रकटाक्ष टाकला. मी केवळ आनंदित अन् संतुष्ट झालो होतो, असं नव्हे – मी सुखावलो होतो, हर्षभरीत झालो होतो, उदार वृत्तीचा बनलो होतो. मी माझा मुळी राहिलोच नव्हतो. तर, ज्याला अशुभाचं वावडं आहे अन् ज्याच्याहातून भल्या गोष्टीखेरीज दुसरं काही घडत नाही असा, या पृथ्वीवरचा नव्हे, तर बाहेरचा कुणीतरी प्राणी बनलेलो होतो मी.

" ते पीस मी माझ्या हातमोज्यात सारलं; आणि तिच्यापासून दूर सरणं अशक्य झाल्यानं, खिळल्यासारखा जागच्याजागी उभा राहिलो.

" बघा!— ते माझ्या पपांना नृत्य करायला सांगत आहेत.' आपल्या बाप म्हणून एका उंचापुऱ्या, डौलदार व्यक्तीकडे अंगुलि-निर्देश करीत ती म्हणाली. कर्नल असलेल्या त्या पोक्त माणसानं गणवेश पेहरला होता; आणि त्याच्या कोटावर रुपेरी मानचिन्हं शोभत होती. दरवाज्यापाशी यजमानीणबाई अन् इतर काही बाया उभ्या होत्या. त्यांच्याशेजारी ती व्यक्ती उभी होती.

" 'वारेन्का, इकडे ये बघू,' केसांत हिऱ्याचा तारा खोवलेल्या यजमानीणबाईनं तिला हाक मारली.

" वारेन्का दरवाजाकडे वळली आणि मीही तिच्या मागोमाग गेलो.

" तुझ्या पपाला तुझ्याबरोबर नृत्य करायला राजी कर, वारेन्का. पायोल व्हॅडिस्लाविच, अनमान करू नका ' यजमानीणबाईनं कर्नलला गळ घातली.

" वारेन्काचा बाप म्हणजे उंचापुरा, देखणा, डौलदार, आणि बांधेसूद अंगलट सांभाळलेला म्हातारा होता. त्याचा चेहरा गुलाबी होता; आणि पहिल्या निकोलससारख्या आकडेबाज मिश्या होत्या. पांढरे कल्ले मिश्यांना भिडलेले होते, तर विंचरलेले केस पुढं – कानशिलांवर रूळत होते. आणि त्याच्या कन्येसारख्याच त्याच्या स्मितहास्यानं त्याचे डोळे अन् ओठ उजळत होते. त्याची देहयष्टी चांगली दणकट होती. छाती लष्करी पेशाला साजेशी भरदार अन् रुंद असून तिच्यावर माफक प्रमाणात सजावट केलेली होती. खांदे दणकट होते, अन् तंगड्या लांब तशाच सुरेख होत्या. निकोलस परंपरेला साजेशी लष्करी ढब असलेला, जुन्या वळणाचा अधिकारी होता तो.

" आम्ही दरवाज्याशी पोचलो, तेव्हा कर्नलसाहेब, आपण नृत्याची कला आता विसरलो आहोत, अशी सबब सांगून आढेवेढे घेत होते. तरीसुद्धा किंचित हसून, आपल्या कमरेच्या म्यानातील

तलवार त्यांनी बाहेर काढली; आणि त्यांची सेवा करायला उत्सुक असलेल्या एका तरुणाकडे सोपवली. उजव्या हातावर हातमोजा नीट चढवला. (' नियमाप्रमाणं सगळं व्हायला हवं, ' स्मित करीत स्वारी बोलली.); आणि मग आपल्या कन्येचा हात आपल्या हातात घेत, नृत्याचा पहिला पवित्रा त्यानं घेतला.

'' मझुर्का नृत्यप्रकारची धून सुरू होताच, कर्नलसाहेबांनी उत्साहानं एक पाय आपटला आणि दुसरा पाय उंचावत झोका घेतला. मग त्यांची उंचीपुरी, वजनदार आकृती दिवाणखान्यात चौफेर गिरक्या घेऊ लागली. ते एक पाय दुसऱ्या पायाशी जुळवीत राहिले – कधी संथपणं अन् मोहकपणं; तर कधी जलदीनं अन् जोमानं. वारेन्काची आकृती त्यांच्याबरोबर तरंगत होती. नकळत अन् नेहमी वेळीच, ती आपल्या नाजूक तुकतुकीत पायांची पावलं, त्यांच्या पावलांशी जुळवण्यासाठी कधी लांबवत, तर कधी आखडत राहिली होती.

'' या जोडगोळीची प्रत्येक हालचाल सगळी पाहुणेमंडळी निरखीत उभी होती. मी मात्र कौतुकापेक्षा गाढ आनंदाची भावना अनुभवीत होते. कर्नलसाहेबांच्या बुटांच्या दर्शनानं मला चटका लावला होता. तसे ते मऊसर चामड्याचे होते; पण त्यांना टाचा नव्हत्या. शिवाय फॅशनेबल अशा निमुळत्या टोकांऐवजी त्यांची टोकं बोथट होती. लष्करातल्या चांभारानं ते बनवले असावेत हे उघड दिसत होतं. माझ्या मनात विचार आलाः ' आपल्या लाडक्या कन्येला बड्यांच्या समाजात नेता यावं यासाठी तिला उंची पोशाख करता यावा म्हणून स्वतः फॅशनेबल बुटांऐवजी सामान्य दर्जाचे बूट वापरीत असावी ही असामी. ' आणि म्हणून विशेषतः, बोथट टोकांचे ते बूट पाहून चमकलो मी.

'' पूर्वीच्या काळी ही स्वारी सुंदर नृत्य करीत असली पाहिजे, हे कुणाच्याही लक्षात येण्यासारखं होतं. पण आता स्वारी अवजड

बनली आहे, आणि तिच्या तंगड्या, ती प्रयत्न करीत असलेली जलद अन् मनोहर वळणं घेण्याइक्या लवचिक राहिलेल्या नाहीत. तरीसुद्धा त्या दिवाणखान्याभोवताली स्वारीनं दोन सरस फेऱ्या मारल्या. आणि जेव्हा स्वारीनं आपले पाय जलद फाकले, अन् मग झटकन् पुन्हा एकत्र जुळवले, तेव्हा स्वारी एकाच गुडघ्यावर भार पडून पडली हे खरं. पण त्यावेळी प्रत्येकजणानं टाळ्या वाजवल्या. आणि आपला अडकलेला झगा सोडवून घेऊन, त्याच्याभोवती ती मोहकपणं तरंगली, तेव्हा तिनं स्मित केलं. मग, स्वारी धडपडत आपल्या पायांवर सावरून उभी राहिली, तेव्हा स्वारीनं आपले हात कन्येच्या कानांवर हळुवारपणं ठेवले,अन् तिच्या कपाळाचं चुंबन घेतलं. मग तिच्या नृत्यातला जोडीदार मी असावा, या समजुतीनं स्वारीनं तिला माझ्याजवळ आणलं. पण तसा मी नसल्याचं मी स्वारीला सांगितलं.

'' 'काही हरकत नाही; नृत्य कर तू तिच्याबरोबर, ' आपली तलवार पुन्हा म्यानात सारीत स्वारी, उत्कटपणं स्मित करीत म्हणाली.

'' बाटलीतून ओतलेल्या पहिल्या थेंबापाठोपाठ प्रवाहाचा ओघ सुरू होतो त्याप्रमाणं, वारेन्काबद्दलच्या माझ्या प्रेमानं माझ्या आत्म्यामधलं सारं प्रेम उचंबळून बाहेर आलं. सगळ्या जगालाच मुळी मी प्रेमानं मिठी मारली. हिऱ्याचा तारा परिधान करणारी ती यजमानीणबाई अन् तिचा नवरा, तिचे पाहुणे, तिचे नोकरचाकर, एवढंच काय पण, माझ्यावर रागावलेला तो नतद्रष्ट ॲनिसिमॉव्ह —या सर्वजणांबद्दल मला प्रेम वाटू लागलं. आणि, बोथट टोकांचे बूट वापरणारा अन् हुबेहूब तिच्यासारखं स्मितहास्य करणारा तिचा तो बाप – त्याच्याबद्दल सांगायचं म्हणजे... त्याच्यावर माझा उत्कट लोभ जडला.

'' मझुर्का संपला आणि आमच्या यजमानांनी आम्हांला भोजनाच्या टेबलांपाशी बोलावलं. पण कर्नलसाहेबांनी नकार दिलाः दुसऱ्या दिवशी

भल्या सकाळी आपल्याला उठायचं आहे, अशी सबब त्यांनी सांगितली. जाताना ते आपल्याबरोबर वारेन्काला नेतात की काय, अशी धास्ती मला वाटली. पण ती तिच्या आईसोबत पाठीमागं राहिली.

" जेवणानंतर, कबूल केल्याप्रमाणं क्वाड्रील हा नृत्यप्रकार मी तिच्याबरोबर साजरा केला, आणि, माझ्या सुखात आता आणखी भर पडण्यासारखी नाही, असं वाटत असताना ते वाढत-वाढतच गेलं. आम्ही प्रेमाबद्दल काहीच बोललो नाही, माझ्यावर तिचं प्रेम जडलंय् किंवा नाही, याबद्दल मी तिला विचारलं नाही, की मलाही. मी तिच्यावर प्रेम करीत होतो, एवढं मला पुरेसं होतं. माझं हे सुख कशामुळं तरी कदाचित विस्कटलं जाईल, एवढीच धाकधूक मला वाटायची.

" मी घरी पोचलो, तेव्हा मी अंगावरचे बाहेरचे कपडे काढले, आणि झोपी जाण्याचा विचार केला. पण माझ्या असं लक्षात आलं की,– मला झोप येण्याचं कसलंच लक्षण नाही. तिनं मला दिलेलं तिच्या पंख्याचं पीस, आणि तिनं दिलेला तिचा एक हातमोजा मी माझ्या हातात धरून बसलो. हा हातमोजा, ती अन् तिची आई यांना त्यांच्या बगीत मी बसवून दिलं, तेव्हा तिनं मला दिला होता. या आठवणीच्या भेट-वस्तूंकडे टक लावून पाहत असताना, तिच्याबरोबर घालवलेल्या काही क्षणांची मला आठवण झाली; आणि माझ्या मनश्चक्षूंपुढं ती पुन्हा उभी राहिली. एक क्षण म्हणजे... दोघां जोडीदारांतून एकाची निवड करण्याचा. त्यापैकी तिनं माझ्या स्वभावाबद्दलची कल्पना करून मला मधुर स्वरात म्हटलं होतं – भारी गर्विष्ठ ? असंच की नाही ? ' मग उल्हासानं आपला हात तिनं माझ्यापुढं धरला. दुसऱ्या एका क्षणी... भोजनाच्या टेबलाशी बसल्यावेळी शाम्पेन चाखत असताना, ग्लासाच्या कडेवरून तिनं माझ्याकडे प्रेमभरल्या नजरेनं टक लावून पाहिलं होतं. पण मी तिला सर्वोत्कृष्ट अशी पाहिली ती, आपल्या बापाबरोबर ती नृत्य करीत होती

तेव्हा. त्याच्याबरोबर तिनं मोहकपणं तरंगत जाणं, तसंच वाखाणणाऱ्या प्रेक्षकांकडे. बापासाठी आणि आपल्यासाठीही तिनं हर्षानं अन् अभिमानानं पाहणं. आणि अभावितपणं ती दोघंही माझ्या मनात संमीलित होऊन, एका गाढ अन् नाजूकशा भावनेत लिप्त झाली होती.

" त्या काळी माझा (आता स्वर्गवासी झालेला) भाऊ अन् मी एकटे राहत होतो. माझा भाऊ समाजात मिसळत नसे. जोडनृत्याच्या कार्यक्रमांना तो कधीच जात नसे. एम्.ए.पदवी – परीक्षेला बसण्याची त्याची तयारी चाललेली होती. आणि तो एकपरी अनुकरणीय असं जीवन व्यतीत करीत होता. या वेळी तो झोपला होता, त्याचं डोकं उशीत खुपसलेलं, अन् अर्ध पांघरुणानं झाकलेलं होतं. ते पाहून मला त्याची कीव आली, कीव अशासाठी की मी ज्या सुखाचा धनी झालो होतो, त्याची त्याला कल्पना नव्हती, आणि त्याच्यात तो सहभागी झालेला नव्हता. आमचा गुलाम नोकर पेट्रुशा मेणबत्तीसह प्रथम मला सामोरा आला. माझा पोशाख उतरायला त्यानं मदत केली असती; पण मी त्याला जायला सांगितलं. त्या माणसाचा झोपाळलेला चेहरा अन् विस्कटलेले केस पाहून मला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटली. आवाज होऊ न देण्याचा प्रयत्न करीत मी चवड्यांवर चालत माझ्या खोलीत गेलो; अन् बिछान्यावर बसलो. मी एवढा सुखावलेला होतो, की मला झोपच येईना. खोलीत भारी उकाडा होत असल्याचं मला जाणवलं. आणि म्हणून माझा गणवेश न उतरता मी शांतपणं दिवाणखान्यात गेलो. माझा वरकोट चढवला, बाहेरचं दार उघडलं, आणि बाहेर पडलो.

" नृत्याचा कार्यक्रम आटोपून मी बाहेर पडलो, तेव्हा जवळ – जवळ पाच वाजले होते. त्यानंतर अजमासे दोन तास उलटून गेले होते. बाहेर धुकाळ हवा होती. ओलं बर्फ रस्त्यावर वितळत

होतं, आणि सगळ्या छपरांवरून पाणी ओघळत होतं. त्या काळी कर्नल आणि मंडळी शहराच्या बाहेरच्या भागात, एका उघड्या शेताच्या कडेला राहत होती, एका टोकाला मुलींची शाळा होती; तर दुसऱ्या अंगाला, सहलीसाठी वापरण्यात येणारी मोकळी जागा होती. आमची छोटीशी, शांत गल्ली पार करून मी मुख्य रस्त्यावर आलो, तिथं मला वाटसरू आणि लाकूड वाहून नेणाऱ्या घसरत्या गाड्यांचे गाडीवान भेटले. मानेवर गाडीचं जूं सावरीत चालताना तालबद्ध हलणारी घोड्यांची डोकी, भलेमोठे बूट घालून बर्फाळ चिखल तुडवीत, गाड्यांच्या बाजूनं चाललेले गाडीवान, रस्त्त्याच्या दोन्ही अंगांना उभी असलेली, धुक्यातून दिसणारी उंच घरं – सगळं – सगळं काही मला विशेष करून आवडत होतं आणि लक्षणीय भासत होतं.

" जिथं त्यांचं घर होतं, त्या शेतात मी पोचलो तेव्हा, सहलीच्या जागेच्या बाजूला मला काहीतरी मोठालं, काळसरसं दिसलं. त्याचप्रमाणं पावा अन् पडघमचे आवाजही माझ्या कानी पडले. ह्या वेळपर्यंत माझं हृदय गाण्यात गढलं होतं; आणि अधून – मधून मझुर्काची धून माझ्या मनात नाद उमटवीत होती. पण हे संगीत काही वेगळंच – कठोर आणि अशुभ होतं."

" ' काय असेल बरं हे ?'– असं नवल करीत, त्या आवाजांच्या दिशेनं मी चालू लागलो. शेतातल्या मधल्या निसरड्या वाटेनं पुढंपुढं जात राहिलो. काहितरी शंभरेक पावलं मी चालून गेलो, तेव्हा धुक्यातून मला लोकांचा जमाव ओळखता येऊ लागला. ते सैनिक असल्याचं उघड दिसत होतं, ' कवाईत चाललेली दिसते, ' असा विचार माझ्या डोक्यात आला, आणि, तेलाचे डाग पडलेला ॲप्रन अन् जाकीट घातलेला अन् मोठालं ओझं घेऊन चाललेल्या एका लोहाराबरोबर मी पुढं जाऊ लागलो. दुहेरी रांगेत उभे असलेले काळे डगलेवाले सैनिक समोरासमोर निश्चल ठाकले होते. त्यांच्या बंदुका

त्यांच्या अंगासरशी होत्या. त्यांच्यामागं एक पावावाला आणि पडघमवाला पोऱ्या असे उभे होते. तीच कर्कश धून पुन:पुन्हा वाजवण्याचा ठेका त्यांनी धरला होता.

" 'काय, करताहेत काय ते ?' माझ्या बाजूला उभ्या असलेल्या लोहाराला मी विचारलं.

" 'पळून जाण्याचा प्रयत्न केला म्हणून एका तातार माणसाची धिंड काढताहेत ते.' दुहेरी रांगेच्या पलीकडल्या टोकाशी उग्र नजरेनं पाहत तो लोहार बेपर्वाईनं उत्तरला.

" मी त्याच दिशेनं पाहिलं तेव्हा, त्या रांगांमधून माझ्याकडे भयानक असं काहीतरी येत असलेलं दिसलं. कमरेपर्यंत उघडा असलेला तो एक माणूस होता; आणि त्याला एका आडव्या बंदुकीला बांधलेला होता. तसंच त्या बंदुकीची दोन टोकं दोन सैनिकांनी धरलेली होती. त्याच्या शेजारी लांबडा कोट आणि लष्करी कॅप घातलेला एक उंचापुरा अधिकारी चाललेला होता. त्याची आकृती माझ्या परिचयाची असावीशी वाटली. तो कैदी – त्याचा सबंध देह गदगदत होता, त्याचे पाय वितळत्या बर्फात चेंगरत होते. अशा अवस्थेत, एकेका बाजूनं होणारा फटक्यांचा वर्षाव सोशीत तो पुढं पुढं चालला होता. कधी तो मागं दबला जात होता. त्यावेळी, त्याला बांधलेली ती बंदूक धरणारे सैनिक त्याला पुढं खेचीत होते. तर कधी त्याचा पुढं तोल जात होता, तेव्हा ते सैनिक त्याला मागं लकटून, पडण्यापासून सावरत होते. आणि त्याच्या पुढं, पाठीमागं जरासुद्धा न रेंगाळता, ताठपणं चालणारा तो उंचापुरा अधिकारी होता. तिचा बाप होता तो – गुलाबी चेहरा, पांढऱ्या मिश्या आणि बाजूला कल्ले असलेला.

" प्रत्येक फटक्याला तो कैदी, यातनांनी पिळवटलेला आपला चेहरा, ज्या बाजूनं फटका बसे त्या बाजूला चमकून वळवत असे.

आणि आपल्या उघड्यावाघड्या सफेद दातांतून काहीतरी शब्द तो पुन:पुन्हा सारखे बोलत राहिला होता. तो माझ्याजवळ येईपर्यंत त्याचे शब्द मला नीट समजू शकले नाहीत. खरं तर तो ते शब्द बोलण्यापेक्षा स्फुंदत पुटपुटत होता : ' भाईनो, माझ्यावर दया करा ! दया करा माझ्यावर !' पण त्या भाईलोकांना दयामाया ठाऊक नव्हती, आणि जेव्हा ती धिंड थेट माझ्यासमोर आली, तेव्हा त्या सैनिकांपैकी एकजण करडेपणानं पुढं सरसावला अन् त्यानं त्या ताताराच्या पाठीवर, एवढा उंच उगारून चाबूक हाणला, की – त्या चाबकाचा ' सूं ऽऽऽ ' असा आवाज हवेत उमटला. तो तातार, झुकांडी जाऊन पुढं पडला. पण त्या सैनिकांनी त्याला हिसकून वर खेचला. त्यानंतर विरुद्ध बाजूनं आणखी एक फटका बसला ! मग पुन्हा या बाजूनं अन् पुन्हा त्या बाजूनं ——— कर्नल त्याच्या बाजूनं संथ पावलं टाकीत चालला होता. तो कधी आपल्या पायांकडे दृष्टिक्षेप टाकीत होता, तर कधी त्या कैद्याकडे नजर फेकीत होता. खोलवर श्वास घेऊन गाल फुगवीत होता; आणि मग तोंडाचा चंबू करून संथपणं नि:श्वास बाहेर सोडीत होता. मी जिथं उभा होतो तिथून ती धिंड पुढं गेली तेव्हा, सैनिकांच्या रांगेमधून त्या कैद्याची पाठ मला ओझरती दिसली. वर्णन करता येणार नाही, अशी बाब होती ती : उघडी, ओली, निळीजांभळी, भलतीच विद्रूप. माणसाच्या शरीराचा तो एक भाग असेल, हे खरं वाटत नव्हतं.

" 'देवा रे देवा !' माझ्याशेजारी उभा असलेला लोहार पुटपुटला.

" ती धिंड पुढं जात राहिली. पिळवटलेल्या, आक्रसलेल्या त्या प्राण्यावर दोहों बाजूंनी फटके बसत राहिले होते, पडघम वाजत राहिला होता, पावा किंचाळत होता. आणि तो उंचापुरा डौलदार कर्नल, त्या कैद्याच्या बाजूनं कडवेपणानं चालत होता. अचानक कर्नल थांबला आणि तरातरा एका सैनिकाकडे गेला.

'' 'चुकला अं ? मी दाखवतो तुला !' —— संतापाच्या स्वरातले त्याचे उद्गार माझ्या कानी पडले. ' हं ! हे घे ! आणखी हे !' असं म्हणत त्यानं त्या किरकोळ, दुबळ्या सैनिकाच्या चेहऱ्यावर, कातडी मोजा घातलेल्या आपल्या दणकट हातानं लागोपाठ चपराक हाणली. कारण – त्या ताताराच्या निळ्याजांभळ्या पाठीवर त्या माणसाचा चाबूक पुरेशा जोसात बसला नव्हता.

'' 'नवीन चाबूक आणा !' कर्नल गरजला. हे शब्द बोलता - बोलता तो सहज वळला. तेव्हा त्याची नजर माझ्यावर पडली. पण मला ओळखलंच नाही, असा बहाणा करीत त्यानं कुटिल दहशतवजा, चिडखोर हुंकार भरला, आणि तो झट्कन दुसरीकडे वळला. मी एवढा ओशाळलो, की माझी दृष्टी कुठं वळवावी हेच सुचेना मला. जसं काही, कसलंतरी लाजिरवाणं कृत्य करताना मी पकडला गेलो होतो. खालमानेनं मी लगबगीनं घरी परतलो. वाटभर मला पडघमचा आवाज, पाव्याची कर्कश शीळ, ' भाईनो, माझ्यावर दया करा, ' हे शब्द, आणि ' हं ! हे घे ! आणखी हे.' असं गरजणाऱ्या कर्नलचा संतापी, गुर्मीचा स्वर... हे सारं सतत सारखं ऐकू येत होतं की मला उबगल्याची भावना होऊ लागली; अन् त्यापायी कित्येक वेळा मला थांबावं लागलं. ह्या प्रसंगाच्या दर्शनानं माझ्यात संचारलेली भीतीची सगळीच्या- सगळी भावना उधळून लावावी, असं मला वाटलं. मी घरी कसा पोचलो आणि बिछान्यावर पडलो, ते मला आठवत नाही. पण मला डुलकी येऊ लागली, त्याच क्षणी सगळं काही मला पुन्हा दिसलं अन् ऐकू आलं, त्यासरशी मी दचकून ताड्कन उठून बसलो.

'' कर्नलबद्दल विचार करताना मी स्वतःशीच उद्गारलो :–' मला ठाऊक नाही असं काहीतरी तो जाणून असला पाहिजे. त्याला ठाऊक असलेलं मला समजलं, तर मला सगळा उलगडा झाला असता; आणि

मी जे काही पाहिलं, त्याच्या एवढ्या मनोयातना मला झाल्या नसत्या.' पण माझा मेंदू मी कितीही खाजवला तरी, कर्नलला ठाऊक असलेली ती गोष्ट कोणती याचा बोध मला झाला नाही. आणि संध्याकाळपर्यंत मला झोपच आली नाही. आणि मग आली तीसुद्धा, माझ्या एका मित्राकडे जाऊन भरपूर मद्यपान करून, सगळं काही विसरून गेलो तेव्हा.

" मी जे काही पाहिलं ते वाईट असल्याचा निष्कर्ष मी काढला, अशी तुमची समजूत झाली आहे का ? तर, तसं मुळीच नाही. ' मी जे काही पाहिलं ते एवढ्या निःशंकपणं झालं असेल, आणि ते आवश्यक आहे, अशी प्रत्येकजणाची समजूत असेल, तर त्याचा निष्कर्ष असा निघतो, की – मला ठाऊक नसलेली काहीएक गोष्ट त्यांना ठाऊक आहे.' या निष्कर्षावर मी आलो तेव्हा, ती गोष्ट कोणती असावी हे शोधून काढण्याचा प्रयत्न मी केला. पण मला तो शोध कधीच लागला नाही. आणि तो शोध मला लागला नाही म्हणून मी, इच्छा असूनही लष्करातली नोकरी पत्करण्याच्या भरीस पडलो नाही. आणि केवळ लष्करी नोकरीच नव्हे, तर दुसरी कोणतीही नोकरी मुळी पत्करली नाही मी. आणि म्हणून, तुम्ही सध्या मला पाहताय् तसा कुचकामी बनून राहिलोय् मी."

" तू कसा कुचकामी बनून राहिलायस ते चांगलं जाणतो आम्ही, " पाहुण्यांतला एकजण बोलला. " खरं म्हणजे... कितीकजण कुचकामी बनायचे ते केवळ तुझ्यामुळं वाचले, हे सांगणं मुद्द्याला धरून झालं असतं."

" छे-छे !.. असं म्हणणं निव्वळ मूर्खपणाचं आहे," – आयव्हॅन व्हॅसिल्येविच खरोखरीच वैतागून म्हणाला.

" बऽऽरं !... तुझ्या त्या प्रेमाचं काय झालं पुढं ?" – आम्ही

उत्कंठेनं विचारलं.

" माझं ते प्रेम होय ?... त्या दिवसापासून माझ्या प्रेमाची उत्कटता कमी-कमी होत गेली. जेव्हा–जेव्हा ती अन् मी फिरायला गेलो, आणि तिनं ते विचारमग्न स्मितहास्य केलं, म्हणजे मला त्या धिंडीतल्या कर्नलची आठवण झाल्याखेरीज राहत नसे. साहजिकच त्यामुळं मी बेचैन अन् उदास होई. मग तिला भेटायला जायचंच हळूहळू बंद केलं मी. आणि माझं प्रेम विरत – विरत – विरून गेलं.

" तर... सांगायचा मुद्दा असा, की – असा प्रकार कधीकधी घडतो. आणि अशाप्रकारचे प्रसंग एखाद्या माणसाचं सबंध जीवन पार बदलून टाकतात – त्याच्या जीवनाला वेगळी कलाटणी देतात. आणि तुम्ही मंडळी भोवतालच्या परिस्थितीच्या गप्पा मारताय् !"... तो शेवटी बोलला.

★ ★ ★

टॉलस्टॉय - जीवनरेखा

लिओ निकोलायविच टॉलस्टॉय (लेव तल्स्तोय) या विश्वविख्यात रशियन लेखकाचा जन्म १८२८ साली तूला प्रांतातील यास्नया पल्याना येथे एका श्रीमंत सरदार घराण्यात झाला.

कझान विद्यापीठात १८४४ ते १८४७ पर्यंत शिक्षण घेतले. पुढे त्याने कॉकेशसमध्ये सैन्यात नोकरी केली. क्रिमीयन युध्दात सिव्हॅस्तपोलच्या लढाईत त्याने भाग घेतला.

टॉलस्टॉयच्या अनेक साहित्यकृती अजरामर झाल्या. आयुष्यात विविध प्रश्न सोडवण्याचे कलावंताचे ध्येय नसून मानवाला जीवनाच्या विविध अंगांवर प्रेम करायला प्रवृत्त करणे हे त्याचे ध्येय असते असे तो मानी.

टॉलस्टॉयची पहिली साहित्यकृती ' घेस्त्व ' (बालपण) १८५२ मध्ये प्रकाशित झाली. आत्मचरित्राच्या या पहिल्या भागानंतर ओत्रोचिस्त्व (किशोरावस्था) हे १८५४ मध्ये तर यूनस्त् (तारुण्य) हे १८५६ मध्ये प्रसिध्द झाले.

उत्रो पमेश्शिका (मॉर्निंग ऑफ अ लँडलॉर्ड) या पुस्तकांतून शेतकऱ्यांविषयीचे त्याने प्रश्न मांडले आहेत. क्रिमीयन युध्दाचा प्रत्यक्ष अनुभव सिवास्तो पल्स्कीये रस्काझीच्या (सिव्हॅस्तोपोलच्या कथा) निर्मितीसाठी महत्वाचा ठरला. या कथांतून त्याने युध्दाचे चित्रण तसेच सैनिकांच्या मनोव्यापारांचे विश्लेषण केले आहे. टॉलस्टॉयची

१८६३ मध्ये लिहिलेली ' कझाकी ' (कोसॅक्स) ही एक महत्वपूर्ण कांदबरी होय. कथा कांदबऱ्यांबरोबरच नाटके, लेख वगैरेंचाही त्याच्या विशाल साहित्यात समावेश होतो. त्याची ' काळोखाची शक्ती ' (दि पॉवर ऑफ डार्कनेस) ही शोकान्तिका तसेच ' प्रबोधनाची फळे ' ही सुखान्तिका या ही प्रभावी आहेत.

१८६२ मध्ये त्याचा सोफ्या नावाच्या तरुणीशी विवाह झाला. पुढे या दांपत्याला एकूण १३ मुले झाली. याच काळात वॉर ॲण्ड पीस (१८६२-१८६९), ' ॲना कॅरेनिना ' (१८७३-७७) यांसारख्या महान् कांदबऱ्या जन्मल्या. ' वॉर ॲण्ड पीस ' या जगप्रसिध्द कांदबरीत त्याने तत्कालिन रशियन समाजाच्या विविध स्तरांतील लोकांच्या ऐहिक व अध्यात्मिक जीवनाचे चित्रण आहे.

ॲना कॅरेनिना (१८७३-७७) यात एका सरदार घराण्यात जन्मलेल्या (पण महत्वाकांक्षा आणि वैयक्तिक अहंभावाने पछाडलेल्या) पण उच्चभ्रू समाजाच्या ढोंगी नितीमत्तेविरुध्द लढा देणाऱ्या रशियन स्त्रीची कहाणी आहे.

१८९९ मध्ये वस्क्रिसेनिये (' पुनरुत्थान ') ही कादंबरी प्रसिध्द झाली. उत्कृष्ट वास्तववादी चित्रण हे या कांदबरीचे वैशिष्ट आहे. एका खानदानी स्त्रीच्या अधःपतनाची व उन्नयनाची ही कहाणी आहे.

टॉलस्टॉय हा मोठा तत्त्वज्ञही होता. आपल्या लेखनातून अहिंसा, शांतता या तत्त्वांचा प्रसार केला. मानवाने या जीवनावर निस्सीम प्रेम केले पाहिजे असे त्याला वाटे.

जुन्या धर्मातील कर्मठ तत्त्वांना, अन्य वैगुण्यांना त्याने विरोध केला. त्यामुळे १९०१ मध्ये त्याला धर्मातून बहिष्कृत केले.

त्याच्या मते धार्मिक कला ही ईश्वरप्रेम आणि मानवप्रेम यांतून प्रेरित झाली असल्याने सर्वश्रेष्ठ असते. याचे प्रतिपादन त्याने ' कला म्हणजे काय ?' या पुस्तकात केले आहे.

टॉलस्टॉयने आयुष्यातली शेवटची वर्षे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वेचली. त्यांच्यासाठी शाळा काढली. शेतकऱ्यांवर, त्यांच्या प्रश्नांवर त्याने बरेच लिखाणही केले. याच काळात त्याच्या साध्या त्यागी राहाणीच्या आग्रहावरुन त्याचे व त्याच्या पत्नीचे पूर्ण बिनसले.

आयुष्याच्या उत्तरार्धात टॉलस्टॉयला रशियात तसेच इतर देशांतही खूप प्रसिध्दी, मानमरातब मिळाला. शांतता आणि एकांत मिळावा म्हणून १८८२ मध्ये त्याने स्वतःचे घर सोडले. १९१० मध्ये आस्तापोव्हो येथे एका स्टेशनमास्तरच्या घरी त्याने आपला अखेरचा श्वास सोडला.

□ □ □

विश्ववाङ्मयातील पुस्तकांचे
वाचनीय मराठी अनुवाद

कारमाझफ बंधू : दस्त्येवस्की
अनु : भाऊ धर्माधिकारी

शापित कोझाकीण : दस्त्येवस्की
अशोक डांगे

चेरीचा मळा : चेखोव
सुमती कानिटकर

माता धीराई : ब्रेश्ट
अविनाश बिनीवाले

काकांचे स्वप्न : दस्त्येवस्की
अविनाश बिनीवाले

आत्मकथा : पं. नेहरू
ना.ग. गोरे

भारताचा शोध : पं. नेहरू
साने गुरूजी